**सभापतीस्थानी माननीय सभापती**

(माननीय सभापती आसनस्थ होत असताना सभागृहात काही सन्माननीय सदस्य 'जय महाराष्ट्र' तर काही सन्माननीय सदस्य 'जय विदर्भ' बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे सभागृह आहे. या सभागृहात ज्यांना जय विदर्भ म्हणावयाचे असेल त्यांनी सभागृहाबाहेर जाऊन म्हणावे, त्याकरिता आंदोलन करावे, बोंब मारावी. या सभागृहात तसे म्हणू नये.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला आहे तो रास्त आहे. या सभागृहात जय महाराष्ट्र म्हणणे हे तात्विकदृष्टया 100 टक्के योग्य आहे. त्यामुळे सभागृहात इतर शब्द बोलणे टाळावे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबई आणि राज्यातील पटपडताळणीनंतर रात्रशाळा बंद करण्याच्या नोटीसा काढल्याबाबत**

**(१) * ४२९५६ श्री.कपिल पाटील, श्री.दिवाकर रावते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई आणि राज्यातील पटपडताळणीनंतर रात्रशाळा बंद करण्याच्या नोटीसा काढण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांची पटपडताळणी रात्री न घेता संध्याकाळी घेण्यात आल्याने पटपडताळणी सदोष असल्याच्या शाळांनी केलेल्या तक्रारीबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, दिवसा कष्ट करुन रात्री शिकणाऱ्या या अत्यंत गरीब विद्यार्थ्यांच्या पर्यायी शिक्षणाची सोय शासनाने केली आहे काय ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) होय.
(२) या संदर्भात स्वतंत्रपणे धोरणात्मक निर्णय घेण्याचा विचार करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबईमधील रात्रशाळांमध्ये शिकणारी मुले ही गरीब कुटुंबातील आणि स्वत: अर्थार्जन करणारी आहेत. उशिरापर्यंत ती मुले शिकण्यासाठी शाळेत येत असतात ही महत्वाची गोष्ट आहे. राज्यात पटपडताळणीनंतर मुंबईतील १९ रात्रशाळांना शाळा बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे. रात्रशाळेच्या माध्यमातून या राज्याला दोन मुख्यमंत्री लाभले आहेत. श्री.सुशीलकुमार शिंदे व श्री.नारायण राणे यांनी रात्रशाळेमध्ये शिक्षण घेतले आहे. रात्रशाळांना दिवसाच्या शाळांचे निकष लावून बंद करण्याची नोटीस देणे गैर आहे. रात्रशाळांना वेगळे निकष लावण्याचा शासन विचार करणार आहे काय?

सभापती महोदय, नोटीस पाठविण्यात आलेल्या रात्रशाळांमधील शिक्षकांचे वेतन थांबविण्यात आले आहे. मुंबई शहरातील रात्रशाळा या महानगरपालिकेच्या इमारतीत चालविल्या जात आहेत. या शाळा पुढे चालू राहणार आहेत का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर्षी रात्रशाळांमधून ९५ ते १०० टक्के विद्यार्थी एसएससी परीक्षेला बसले होते. परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. रात्रशाळेमध्ये शिकणारी एक मुलगी एसएससी परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवून राज्यात पहिली आली आहे. रात्रशाळांमधील शिक्षकांनी इतके देदीप्यमान यश मिळविणारे विद्यार्थी घडविले आहेत. त्यामुळे रात्रशाळा बंद करण्याबाबत नोटीस पाठविणे अतिशय दु:खद आणि क्लेशदायक बाब आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४२९५६......

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रात्रशाळांमध्ये गरीब कुटुंबातील विद्यार्थी शिकतात आणि ते महत्वाचे आहे. मुंबई शहरातील १३ शाळांना नोटीस पाठविण्यात आली आहे हे खरे आहे. परंतु कुठलीही शाळा बंद करण्याचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. रात्रशाळांबाबत शासनाचा विचार सकारात्मक आहे. रात्र शाळांमधील शिक्षकांचे पगार थांबविण्यात शासनाने आदेश दिलेले नाहीत. असा प्रकार घडला असेल तर ताबडतोब पगार सुरु करण्यात येईल. रात्रशाळा आज सुरु आहेत आणि पुढेही सुरु राहणार आहेत. फक्त १३ शाळांना नोटीस पाठविण्यात आली आहे.

नंतर बी.१....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 42956......

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,ज्या शाळांची अनुपस्थिती 50 टक्क्यापेक्षा अधिक आहे अशा रात्र शाळांच्या मान्यता काढून घेण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. रात्र शाळेमध्ये गोरगरिबांची मुले शिक्षण घेत असतात. रात्र शाळेची उपस्थिती ही दिवसाच्या शाळेसारखी असू शकत नाही. रात्र शाळेमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी कोठे तरी नोकरी करतात, मोल मजुरी करतात त्यामुळे रात्र शाळेच्या उपस्थितीचा निकष शिथिल करण्यात यावा. दिवसांच्या शाळेचे नियम रात्र शाळेला न लावता, रात्र शाळेच्या उपस्थितीचे नियम शिथिल करुन राज्यातील सर्व रात्र शाळा सुरु केल्या जाणार आहे काय ? 2-3 महिन्यांपासून रात्र शाळेच्या शिक्षकांचे पगार बंद आहे त्यामुळे रात्र शाळेच्या शिक्षकांचे पगार सुरु करण्याच्या संदर्भात आजच्या आज निर्णय दिला जाणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय,रात्र शाळेच्या शिक्षकांचे पगार बंद केलेले असतील तर ते ताबडतोब सुरु करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, रात्र शाळेची पटपडताळणी कमी आल्यामुळे रात्र शाळा बंद करण्यात आलेल्या आहेत. परंतु या संदर्भात अशी परिस्थिती नाही. रात्र शाळा बंद करण्याची अनेक कारणे आहेत. रात्र शाळांना ज्या नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये रात्र शाळा का बंद करण्यात आलेल्या आहेत याची कारणे दिलेली आहेत. रात्र शाळांमध्ये पायाभूत सुविधा नसणे अशा इतर कारणांमुळे रात्र शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. रात्र शाळेच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांच्या उपस्थितीत शिक्षक आमदारांसमवेत एक बैठक झाली होती त्या बैठकीमध्ये रात्र शाळेच्या संदर्भात अनेक महत्वाच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. रात्र शाळेच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. त्यामुळे रात्र शाळेच्या संदर्भात आदरणीय मंत्री महोदयांच्या स्तरावर सर्वांना विश्वासात घेऊन रात्र शाळेच्या संदर्भात निश्चितपणे धोरण ठरविण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "रात्र शाळेच्या संदर्भात स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल" असे म्हटलेले आहे. रात्र शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसाच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा खूप मर्यादित असण्याची शक्यता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

गरिबीमुळे तसेच रोजी रोटीसाठी काम धंदा करीत असल्यामुळे विद्यार्थी रात्र शाळेत शिक्षण घेत असतात. ही वस्तुस्थिती आपण मान्य केली आहे. या विद्यार्थ्यांना आठवडयातून एक दिवस तरी कामाला सुट्टी नक्की असू शकते. त्यामुळे या सुट्टीच्या दिवशी हे विद्यार्थी एक दिवस तरी शाळेमध्ये येऊ शकतात. रात्र शाळेचा धोरणात्मक निर्णय, पटपडताळणी संध्याकाळी करावी की, रात्री करावी या व्यतिरिक्त, रात्र शाळेच्या संदर्भात मुळातच धोरणात्मक निर्णय केला जाणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, रात्र शाळेच्या संदर्भात सर्व बाबतीत धोरणात्मक निर्णय केला जाणार आहे. रात्र शाळेच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. राज्यामध्ये एकंदर रात्र शाळांची संख्या 176 असून त्यामध्ये 22 हजार 334 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. रात्र शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित जरी असली तरी रात्र शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा असली पाहिजे, त्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, या सर्व बाबींचा विचार रात्र शाळेच्या धोरणामध्ये केला जाणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारण्यासाठी नव्हे तर त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. मराठी शाळा बंद करण्याच्या संदर्भात नोटीसेस देण्यात आल्या होत्या, त्या वेळी लोकांना तुरुंगात जाण्याची वेळ आली होती. परंतु मंत्री महोदयांनी अत्यंत संवेदनशीलपणे विचार करुन, कायद्यामध्ये बदल करुन मराठी शाळांना मान्यता दिल्यामुळे मी या ठिकाणी विभागाच्या दोन्ही मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, रात्र शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे हा प्रश्न या सभागृहात उपस्थित झालेला आहे. परंतु माननीय मंत्री महोदयांनी रात्र शाळांच्या संदर्भात ज्या नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत त्या मागे घेऊन रात्र शाळा सुरु ठेवण्यात येतील असा जो महत्वपूर्ण निर्णय घेतला, त्याबद्दल मी माननीय मंत्रीमहोदयांचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो. पूर्वी रात्र शाळेच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याची जी प्रथा होती ती पुन्हा सुरु केली जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, रात्र शाळेच्या संदर्भात धोरण ठरविण्याच्या संदर्भात प्रस्तावित बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना केलेली आहे त्याचा सुध्दा विचार करण्यात येईल.

-------------



**राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) योजना बंद केल्याबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(२) * ४१८३५ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री. शरद रणपिसे, श्री.संजय दत्त** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) योजनेअंतर्गत अर्ध्यावर शाळा सोडलेल्या अथवा शाळेत जाऊ न शकलेल्या गरीब मुलींना सकस पोषण आहार देण्याची केंद्र पुरस्कृत योजना कोणताही पर्याय न देता दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजी महिला व बालविकास विभागाच्या आदेशाने बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, ही योजना केव्हांपासून सुरु करण्यात येणार आहे ?

**प्रा.वर्षा गायकवाड** : (१) व (२) सबला योजनेअंतर्गत राज्यातील बीड, नांदेड, मुंबई (मुंबई शहर व उपनगर), नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या ११ जिल्ह्यातील ११ ते १८ वर्षे वयोगटातील शाळेतून गळती झालेल्या सर्व तसेच १५ ते १८ वर्षे वयोगटातील शाळेत जाणाऱ्या किशोरवयीन मुलींना या योजनेअंतर्गत लाभ मिळावा, यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत घरपोच आहार (Take Home Ration THR) पुरवठा करणाऱ्या ०३ महिला संस्थामार्फत तात्पुरत्या स्वरुपात THR चा पुरवठा करण्याची आदेश दिनांक ३०/०४/२०११ रोजी झाले होते. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ७.१ मध्ये भविष्यात टप्प्याटप्प्याने महिला बचत गटांमार्फत THR चा पुरवठा करण्याचे प्रयत्न करण्याबाबत तरतूद आहे. या तरतुदीनुसार स्थानिक स्तरावरुन THR चा पुरवठा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत दिनांक ०५/११/२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक ०३/१२/२०१२ च्या शासन पत्रान्वये ०३ संस्थांकडील THR बंद करुन केंद्र शासनाच्या दिनांक १४/१२/२०१० च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार THR किंवा गरम ताजा आहार (Hot Cook Meal) चा पुरवठा स्थानिक स्तरावर करण्याची कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय,या प्रश्नाच्या संदर्भात "या ठिकाणी निर्देश देण्यात आलेले आहेत" असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे हे निर्देश केव्हा देण्यात आले व या निर्देशाची अंमलबजावणी किती दिवसात केली जाणार आहे ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41835....

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, डेप्युटी सीईओ आणि सीडीपीओ यांना टेंडर प्रोसेस करण्यासंबंधी वारंवार निदेश दिलेले आहेत. तसेच, हॉट कुक मिल देण्यासंबंधी देखील वारंवार सूचना दिलेल्या आहेत. या संबंधातील तारखा देण्यास देखील मी तयार आहे. आम्ही सुरूवातीला आयुक्तांना दिनांक 5.11.2012, 1.12.2012, रोजी सूचना दिल्या आहेत. त्यानंतर सातत्याने आयुक्त कार्यालयाने दिनांक 3.12.2013, 6.12.2012, 10.1.2013, 15.1.2013, 26.2.2013, 15.3.2013, 18.3.2013 सूचना देऊन जिल्हा स्तरावर टेंडर प्रोसेस व्हावी म्हणून पाठपुरावा केलेला आहे. याबाबत डेप्युटी सीईओ, सीडीपीओ यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, आम्ही टेंडर प्रोसेस केली होती. पण त्यांना तशा प्रकारचा बचत गट अद्याप पर्यंत मिळालेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने जे निदेश दिले आहेत त्याचे पालन करून हे टेंडर सेंट्रल लाईज्ड करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, टीएचआर आणि हॉट कुक मिल संबंधातील हा प्रश्न आहे. हॉट कुक मिलचा विषय सध्या बिहार मुळे चर्चेत आहे. मला आपल्या मार्फत शासनाला असे विचारावयाचे आहे की, बिहार येथे घडलेल्या प्रकाराच्या अनुषंगाने राज्य शासनाने विचार करून काही धोरणात्मक निर्णय घेतल आहेत काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आपण सबलाचा जी.आर.दिनांक 30 एप्रिल 2011 रोजी निर्गमित केला आहे. त्यात हॉट कुक मिलचा उल्लेख आहे. त्यामध्ये केंद्र सरकारच्या गाईडलाईन्स आहेत. त्यात हॉट कुक मिल कशा प्रकारचे असले पाहिजे या संबंधातील निकष दिलेले आहेत. बिहार आणि तामिळनाडू येथील घटना पाहता कडक कार्यवाही करण्यासंबंधीच्या सूचना शासनातर्फे देण्यात आलेल्या आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41835....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पहिल्या लेखी प्रश्नालाच शासनाकडून उत्तर देण्यात आलेले नाही. पहिला प्रश्न असा आहे की, पोषण आहाराची योजना दिनांक 1 नोव्हेंबर 2012 रोजी बंद करण्यात आली आहे काय ? या प्रश्नाला शासनाकडून उत्तर देण्यात आलेले नाही. यातील वस्तुस्थिती अशी आहे की, महिला व बालविकास विभागाने 1 नोव्हेंबर 2012 रोजी सरकारी आदेशानुसार केंद्र पुरस्कृत योजनेला कोणताही पर्याय न देता ती योजना बंद केली. त्यामुळे नोव्हेंबर 2012 पासून राज्यातील तब्बल 11 लाख किशोरवयीन मुलींना पोषण आहार मिळत नाही, हे वास्तव आहे काय ? कॅगने अहवालात नमूद केले होते की, ही योजना चांगली चालली आहे. असे असताना सदर योजना बंद करण्याचे कारण काय आहे ? ही योजना कंत्राटदाराच्या हितासाठी बंद केली आहे काय, ही योजना बंद करण्याचे कारण काय आहे, ते कारण आम्हाला समजले पाहिजे. दिनांक 1 नोव्हेंबर 2012 पासून ही योजना बंद करण्याची कार्यवाही झाली, त्याची कारणे काय आहेत व त्यासंबंधी आपण चौकशी करणार आहात काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेता यांना सांगू इच्छिते की, सर्वोच्च न्यायालयाची रिट याचिका क्र.196/2001 आहे. नवीन सबला योजने अंतर्गत कोणतीही नवीन निविदा न काढता किंवा एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) न काढता डायरेक्ट संस्थांना काम दिले पाहिजे असा उल्लेख दिनांक 29.11.2012 रोजीच्या कोर्ट कमिशनमध्ये आहे. आपण सबलाचा जी.आर.काढला होता त्यामध्ये असे देखील नमूद केले होते की, हे काम टप्प्याटप्प्याने महिला बचत गटांना देण्यात यावे. त्याप्रमाणे आपण प्रोसेस देखील सुरू केली. आपण 5 नोव्हेंबर रोजी एक पत्र पाठविले. दिनांक 1 नोव्हेंबर 2012 रोजी योजना बंद करण्याचा निर्णय घेतला. तो त्यानंतर घेण्यात आला. डिसेंट्रलाईडज्ड करण्याच्या हेतूने जिल्हा पातळीवरचा मी उल्लेख केला आहे. त्यादृष्टीने डेप्युटी सीईओ आणि सीडीपीओ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून महिला बचत गटांना काम देण्यात यावे अशा प्रकारचा प्रयत्न आम्ही सातत्याने करीत आहोत. मध्यला काळात आमची डेप्युटी सीईओ आणि सीडीपीओ यांच्या समवेत बैठक झाली होती. तेव्हा आम्ही माहिती घेतली होती. त्यावेळी काही जिल्ह्यांमध्ये हॉट कुक मिल देण्याचे काम सुरू होते.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41835...

प्रा..वर्षा गायकवाड...

ते एप्रिल महिन्यात बंद झालेले आहे. या संदर्भात निविदा काढून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ठेकेदार 10 कामगार जमा करुन मजूर सोसायटी स्थापन करुन स्वत:च कामे घेतात त्याप्रमाणे येथे देखील असा प्रकार होणार आहे. ठेकेदार नावाला महिला बचत गट स्थापन करुन स्वत:कडे काम घेण्याची शक्यता आहे. जर असे प्रकार होत असतील तर ते थांबविण्यासाठी शासनाची काही व्यवस्था आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, महिला बचत गटांना आणि महिला मंडळांना अशी कामे देण्याचा सन 2004-2005 चा शासन निर्णय आहे. आय.सी.डी.सी.ची निविदा काढण्यात आली त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली एक कमिटी स्थापन करुन त्या समितीला सूचना देण्यात आल्या की, महिला बचत गटांना काम देण्यात येते किंवा कसे हे त्यांनी पाहिले पाहिजे. महिला बचत गटांना काम देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचेवर सोपविलेली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. आपण हे काम महिला बचत गटांना देणार आहोत. तेव्हा महिला बचत गटांनी मुलांना सकस आहार देण्याबाबत आणि स्वयंपाक घरात स्वच्छता ठेवण्याबाबत काही मार्गदर्शक सूचना देणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शाळांमध्ये पोषण आहार देण्यासाठी महिला बचत गटांना वेगळे स्वपांक घर देणार आहात काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, शाळेतील विद्यार्थ्यांना सकस आहार देणे ही शासनाची संकल्पना आहे. या संदर्भात महिला बचत गटांना प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच त्यांना स्वयंपाक घर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आपण महिला बचत गटांना सक्षम करु.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी बिहार राज्यामध्ये घडलेल्या घटनेचा उल्लेख करुन प्रश्न उपस्थित केला. त्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून मिळालेले नाही. याच प्रश्नाच्या अनुषंगाने मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41835...

डॉ.दीपक सावंत.....

दिलेली आहे. आपण प्राथमिक आणि उच्च प्राथमिक म्हणजे 11 वर्षापासून 18 वर्षापर्यंतच्या मुलांना आहार देतो. आपण शालेय पोषण आहार देतो, पूरक पोषण आहार देतो आणि किशोरवयीन मुलांना टी.एच.आर.आहार देतो, यातील एक आहार मुलींसाठी आहे तर उर्वरित दोन आहार हे मुले आणि मुलींसाठी देतो. हे तीन आहार शाळांमध्ये कशाप्रकारे डिस्ट्रीब्युट करण्यात येतात ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सहा महिन्यांच्या बालकापासून सहा वर्षाची मुले, स्तनदा माता, गरोदर मातांना आहार देण्यात येतो आणि किशोरवयीन मुलींसाठी सबलाचा आहार देण्यात येतो. 11 ते 18 वयोगटातील शाळेतील गळती झालेल्या मुलींना सबला आहार देण्यात येतो. तसेच 15ते 18 वयोगटातील मुलींना शालेय शिक्षण पोषण आहार मिळत नाही त्या मुलींना देखील सबला आहार देण्यात येतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न होता की, तीन प्रकारे आहार देण्यात येतो त्याचे डिस्ट्रीब्युशन कसे करण्यात येते ? हे तिन्ही आहार एकाच वेळी देण्यात येतात की वेगवेगळ्या वेळी दिले जातात ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या संदर्भात मी स्पेसिफीक उत्तर दिलेले आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत अंगणवाडीमध्ये आहार देण्यात येतो. शालेय शिक्षण विभागामार्फत शाळांमध्ये आहार देण्यात येतो. महिला व बाल विकास विभागामार्फत सबला अंतर्गत देण्यात येणार आहार हा शाळेतील गळती झालेल्या मुलींना देण्यात येतो. तसेच 15 वर्षावरील मुलींना शालेय पोषण आहारामध्ये आहार दिला जात नाही अशा मुलींना आहार देण्यात येतो.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने आपण अनेक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी देखील त्या प्रश्नांना प्रामाणिकपणे उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा प्रश्न गंभीर आणि व्यापक आहे. या प्रश्नावर सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. तेव्हा आपण या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनात एक बैठक बोलावावी अशी माझी प्रश्नरुपी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

ता.प्र.क्र.41835....

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, हा निर्णय आपला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या विनंतीबाबत आपण निर्णय घ्यावा. आपण जो निर्णय घ्याल तो मला मान्य आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी केलेल्या विनंतीला मी संमती दिली आहे. या विषयी माझ्या दालनात जरुर बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, महिला बचत गट सक्षम झाले पाहिजेत, बचत गटांना खऱ्या अर्थाने काम दिले पाहिजे. परंतु मी नम्रपणे सांगू इच्छितो की, मी 9 हजार महिला बचत गट स्थापन केले आहेत. एका बचत गटामध्ये 11 ते 20 सभासदांपेक्षा जास्त सभासद नाहीत. असे बचत गट खरोखरच 200-250 कोटी रुपयांचे टेंडर घेऊ शकतात काय ? माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी खऱ्या अर्थाने मूलभूत प्रश्न विचारला होता. परंतु त्या प्रश्नाला उत्तर देण्यात आले नाही. महिला बचत गटांना सक्षम केले पाहिजे, त्यांची प्रगती झाली पाहिजे हे मला मान्य आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, त्यांनी किती महिला बचत गटांना भेटी दिल्या आणि त्यांना किती बचट गट सक्षम असल्याचे आढळून आले या बाबतचा तपशील त्यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावा.

गेल्या आठवड्यात बचत गटांना 300 कोटी रुपयांच्या चिक्कीची ऑर्डर दिल्याचा प्रश्न प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये होता. परंतु त्यावर चर्चा होऊ शकली नाही. जे सचिव दुसऱ्या दिवशी निवृत्त होणार होते त्यांनी आदिवासी विभागामार्फत 300 कोटी रुपयांची चिक्की खरेदी करण्याची ऑर्डर पारित केली. माझे स्पष्ट मत आहे की, अशा प्रकारच्या खरेदीमध्ये पारदर्शकता नाही. तामिळनाडू आणि बिहार या राज्यात जे काही घडले त्याचे मूळ या ठिकाणी आहे. विभागामार्फत जी काही खरेदी होते त्याचे टेंडरींग बरोबर होत नाही. त्यामुळे प्रथम टेंडरींगमध्ये पारदर्शकता आणणे आवश्यक आहे. ठेकेदार मंडळी बचत गट आणि मार्केटींग फेडरेशन यांच्या माध्यमातून काम करतात. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, मी मार्केटींग फेडरेशनचा 25 वर्षे संचालक आहे. ही कामे ठेकेदारच करतात. त्या ठिकाणी ठेकेदार 1 टक्के मार्केटींग फेडरेशनला देतात आणि बाकीचे काम आपल्या मनाप्रमाणे करतात. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, धोरणात्मक निर्णय घेऊन या सर्व प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणून व ही ठेकेदारी पध्दत बदलून योग्य ठेकेदारांना हे काम देण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

ता.प्र.क्र.41835....

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी महिला बचत गटांना सक्षम करण्याचा मुद्दा मांडल्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. त्यांनी 9 हजार बचत गट स्थापन करुन त्या माध्यमातून महिलांची मोठी चळवळ स्थापन केली आहे. त्यांनी बोलताना 300 कोटी रुपयांच्या खरेदीचा उल्लेख केला. या अनुषंगाने सांगू इच्छिते की, मध्यंतरी टी.एच.आर.संबंधित टेंडर काढले होते. ज्यामध्ये 6 महिन्यांपासून 3 वर्षांची मुले, स्तनदा माता, गरोदर माता यांना द्यावयाच्या पदार्थांचे टेंडर काढत असताना जेवढी पारदर्शकता येईल तेवढी पारदर्शकता आणून टेंडर काढले. ज्या ठिकाणी महिला बचत गटाचे टेंडर मिळाले नाही त्या ठिकाणी पुन्हा टेंडर काढण्याचे निर्देश दिले. शिवाय जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की, त्यांनी कोणत्या बचत गटांना, महिला संस्था किंवा महिला मंडळांना काम दिले हे प्रमाणित करुन द्यावे. एकंदरीत या सर्व प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठीच राज्य सरकार प्रयत्न करीत आहे.

महोदय, महिलांच्या सबलीकरणाच्या बाबतीत आम्ही सातत्याने प्रयत्न केला आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सी.डी.पी.ओ. यांच्या माध्यमातून टी.एच.आर, टेक होम रेशन किंवा गरजेचा आहार यांच्या निविदा काढत असताना पारदर्शकपणे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही पाठपुरावा करीत आहोत की, बचत गटांनी पुढे येऊन आहाराच्या कामामध्ये पुढाकार घ्यावा. त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी पारदर्शकता आणण्याचे काम करीत आहोत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देते की, या संदर्भातील निर्णय झाल्यानंतर सरकारला न्यायालयाच्या आदेशानंतर घेतलेला निर्णय बदलावा लागला. त्यामुळे या तीन संस्थांच्या दृष्टीने ज्यांनी तात्पुरत्या स्वरुपात निर्णय घेतला त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या कोर्ट पिटीशन आम्ही वाचल्या आहेत.

नंतर श्री.बरवड.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41835 ..... डॉ. नीलम गोऱ्हे ....

माझा प्रश्न असा आहे की, एवढे मोठे टेंडर घेण्यासाठी महिला संस्थांमध्ये सक्षम संस्था नसेल आणि असेच जर नियम लावण्यात आले तर महिला संस्था टेंडर कशा भरतील ? सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जसे त्यांचे 9 हजार बचत गट आहेत तशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये 100, 200, 500 बचत गट असलेली बचत गटांची फेडरेशन्स आहेत दोन तीन संस्था मिळून टेंडर घेऊ शकतात. या संदर्भात आपल्या अधिकाऱ्यांनी किती प्रयत्न केले हे दालनातील बैठकीमध्ये आम्हाला कळले पाहिजे. यामध्ये दुसरा भाग असा आहे की, कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे हा खरा प्रश्न यामध्ये येतो. लोक निर्णय घेतात, निघून जातात, बदल्या होतात आणि मुलांना मात्र यापासून वंचित राहावे लागते. आताच्या उत्तरामध्ये सुध्दा अशी संदिग्धता आहे. उत्तरामध्ये शेवटच्या वाक्यात गरम ताजा आहार किंवा टेक होम रेशन असा उल्लेख केला आहे. आपण पर्याय म्हणू शकत नाही. आपण निश्चित कोणता तरी एक धोरणात्मक निर्णय घ्यावा की, लोकांना हे आवडते आणि त्या बाबत स्थानिक पातळीवर, जिल्हा स्तरावर निर्णय घेऊ. अशा बचत गटाच्या फेडरेशन्सला या पध्दतीची टेंडर्स मिळावीत यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सातत्याने सांगत आहे की, आम्ही सातत्याने प्रयत्न केला. आम्ही प्रकल्पनिहाय प्रयत्न केलेला आहे. आम्ही जिल्हानिहाय प्रयत्न केलेला आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सीडीपीओ यांनी खालच्या पातळीवर याचे टेंडर काढावेत यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे सुप्रीम कोर्टाचा काय निर्णय आलेला आहे हे आपल्याला माहीत आहे. म्हणून आम्ही त्या दृष्टीकोनातून सातत्याने प्रयत्न करीत आहोत. याचे टेंडर लवकरात लवकर काढण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात येतील. फेडरेशनला सुध्दा यामध्ये कसे सहभागी करुन घेता येईल या दृष्टीकोनातून सुध्दा नक्की प्रयत्न केला जाईल. आपण सबलाच्या संदर्भात पाहिले तर राजस्थानमध्ये, उत्तरप्रदेशमध्ये किंवा कर्नाटकमध्ये असेल, मधल्या काळामध्ये सबलाच्या बाबतीत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

ता. प्र. क्र. 41835 ..... प्रा. वर्षा गायकवाड ....

महिला संस्थांना मोठ्या प्रमाणावर टेंडर देण्यात आलेले आहे. यामध्ये बचत गटाचा सहभाग व्हावा या दृष्टीने आपण प्रयत्न करतो. जिल्हा स्तरावर आमचे प्रयत्न सुरु आहेत. आमच्या सहा महिन्याच्या सततच्या पाठपुराव्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीमध्ये आम्हाला असे उत्तर दिले की, तशा तऱ्हेचे बचत गट मिळणे फार कठीण होत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी प्रश्न विचारताना 300 कोटी रुपयांचे टेंडर फायनल केल्याचे सांगितले. एखादे टेंडर घ्यावयाचे आणि फायनल करावयाचे म्हटले तर त्यांची वित्तीय क्षमता किंवा अशा अनेक अटी घालण्यात येतात आणि त्यानंतर त्या बाबतीत विचार केला जातो. हे जे 300 कोटी रुपयांचे टेंडर फायनल केले त्यामध्ये अशा पध्दतीच्या काही अटी होत्या का, असतील तर कोणत्या अटी होत्या याची माहिती आपण सभागृहाला सादर करावी, असे मला वाटते.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, तो प्रश्न आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात होता. मी ही बाब माननीय आदिवासी विकास मंत्र्यांपर्यंत पोहोचवीन आणि त्यांना सांगेन.

**सभापती** : ठीक आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तरांना १ तारखेलाच वेतन मिळण्याकरिता**
**ऑनलाईन योजना सुरु करण्याबाबत**

**(३) * ४१८६९ डॉ. अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०४० ला दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना १ तारखेलाच वेतन मिळण्याकरिता ऑनलाईन योजना सुरु करण्याच्या अनुषंगाने अनुदानित संस्थांमधील वेतनाची तरतुद एकत्रितपणे योजना बाह्य स्वरुपात करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत कार्यवाही पूर्ण होऊन शिक्षक-शिक्षकेत्तरांना १ तारखेलाच वेतन मिळण्याकरिता ऑनलाईन वेतन योजना केव्हांपर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?
**श्री.राजेंद्र दर्डा** : (१) व (२) योजनाबाह्य तरतुदीबाबतचे आदेश दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच दिनांक ३ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षक-शिक्षकेतरांना १ तारखेलाच वेतन मिळण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाला असे उत्तर दिले आहे की, 1 तारखेला वेतन मिळण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, 90 टक्के शाळांमध्ये 1 तारखेला वेतन होते परंतु प्लॅनच्या ज्या शाळा आहेत, प्लॅनच्या ज्या तुकड्या आहेत, त्यांचे वेतन मात्र अनियमित होते. त्या तुकड्यांवरील शिक्षकांचे वेतन नियमित होण्यासाठी शासन तसे आदेश देणार का ? समाजकल्याण अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळा, आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांतील शिक्षकांचे वेतन शालेय शिक्षण विभागाकडून होत असते. परंतु त्यांचे वेतन तीन-तीन महिने होत नाही. या बाबतीत शासन काही उपाययोजना करणार आहे का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने 3 ऑगस्ट, 2012 ला महत्वाचा निर्णय घेतला की, सर्व शिक्षकांचा पगार ऑनलाईन पध्दतीने 1 तारखेला थेट त्यांच्या अकाऊंटमध्ये जमा होईल. त्याप्रमाणे वेतन वितरित करण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये आज मला सांगण्यास आनंद वाटतो की, 11 जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीयकृत बँकेच्या माध्यमातून, कोअर बँकींग प्रणालीच्या माध्यमातून पगार येतो. ज्या जिल्हा मध्यवर्ती बँका आहेत त्या संदर्भात आदरणीय मुख्यमंत्र्यांबरोबर एक बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी असा निर्णय घेतला होता की, जिल्हा मध्यवर्ती बँकेला सक्षम करण्यासाठी त्यांना सुध्दा आपण मुभा द्यावी.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41869.... प्रा.फौजिया खान....

या जिल्ह्यामध्ये 25 सहकारी बँका आहेत. त्यापैकी 12 सहकारी बँकांच्या सर्व शाखांनी 100 टक्के वेतन देण्याची सुरुवात केलेली आहे. उर्वरित 13 बँकांच्या काही शाखा राहिलेल्या आहेत. त्या सर्व शाखांमधून कोअर बँकिंग प्रणालीद्वारे वेतन वितरित केले जाते. 1 तारखेलाच वेतन दिले जात आहे. येणाऱ्या महिन्यामध्ये हे सर्व स्ट्रिमलाईन होईल. शासनाच्या एका महत्वाच्या निर्णयामुळे आज राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकामध्ये कोअर बँकिंगची व्यवस्था झालेली आहे. या माध्यमातून शिक्षकांचे वेतन दिले जात आहे. त्याचप्रमाणे शालार्थ प्रयोग या महिन्यात 4 जिल्ह्यात सुरु होत आहे. आज गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी सर्वांना शुभेच्छा देताना शासनाने हा महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाचे परिणामकारक काम होत आहे. त्यामध्ये काही टिडिंग प्रॉब्लेम्स आहेत. परंतु ते सुध्दा लवकरात लवकर सुटतील.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "योजनाबाह्य तरतुदीबाबतचे आदेश दिनांक 28 जानेवारी, 2013 रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु या आदेशामध्ये महाराष्ट्रातील सर्व अंशत: अनुदानित शाळा आहेत त्यांचा योजनाबाह्य वेतन देण्याच्या योजनेत समावेश झालेला नाही. शासनामार्फत उर्वरित शाळांचा समावेश करण्याकरिता कार्यवाही केली जाणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून पाहण्यात येईल. शासनाने योजनेतर सर्व शाळासंबंधी महत्वाचा जी.आर.इश्यू केलेला आहे. बाकीच्या शाळांची मोठी संख्या आहे. त्यांना सुध्दा या योजनेतर शाळांमध्ये घेतलेले आहे.

श्री.कपिल पाटील : सर्व प्रथम मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. या प्रश्नाच्या अनुषंगाने मला तीन महत्वाचे प्रश्न विचारावयाचे आहेत. राष्ट्रीयकृत बँकांद्वारे शासनाने शिक्षकांना पगार देण्याची व्यवस्था केलेली आहे. या बँकांकडून शिक्षकांचे वेतन वेळेवर होत आहे. शासनाकडून वेळेवर पैसे जमा होतात कोअर बँकिंगच्या अभावामुळे ते वितरित होत नाही. ही योजना नागपूर जिल्ह्यात सुरु केली, परंतु तेथे थांबविलेली आहे. कोकणातील ठाणे जिल्ह्यामध्ये ही योजना सुरु

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झालेली नाही. त्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? शालार्थ योजनेमध्ये अनेक त्रुटी आहेत. ही योजना सुरु झाल्यानंतर राष्ट्रीयकृत बँका सुध्दा वेळेवर पगार देऊ शकणार नाहीत अशी स्थिती आहे. म्हणून जोपर्यंत या योजनेतील त्रुटी दूर होत नाहीत तोपर्यंत ही योजना लागू करणार नाही असे आश्वासन मंत्री महोदय देणार आहेत काय, योजनाबाह्य शाळांमधील शिक्षकांचे पगार वेळेवर होतात. पण योजनेतर शाळांबाबत तरतूद अगोदर केली तर त्याचे वितरण सोपे होऊ शकेल. याबाबत शासन काही कार्यवाही करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या संदर्भात केंद्र शासन व नाबार्डची एक बैठक झालेली आहे. त्या बैठकीत नाबार्डने असे सांगितले आहे की, आम्ही एक कॉमन प्लॅटफॉर्म तयार करीत आहोत. इंटरनेटचे प्रश्न ग्रामीण भागामध्ये असू शकतात, असा सन्माननीय सदस्यांचा मुद्दा आहे. कॉमन प्लॅटफॉर्म तयार करुन हे सर्व स्ट्रिमलाईन करण्यासाठी त्यांनी त्या बैठकीत दिनांक 30.9.2013 पर्यंत वेळ देण्याची मागणी केलेली आहे. या कॉलन फ्लॅटफार्मचा सर्व प्रश्न हाताळण्यासाठी मदत होईल. त्यामुळे त्यांना तेवढा वेळ देण्याबाबत शासन विचार करु शकतो. त्यामध्ये अनेक तांत्रिक बाबी त्याद्वारे हाताळता येतील. शालार्थ योजनेचे सॉफ्टवेअर तयार होत असून ते शेवटच्या टप्प्यात आहे. त्याचे 90 टक्क्यापेक्षा जास्त काम पूर्ण झालेले आहे. सक्षम सॉफ्टवेअर तयार करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्यांसोबत एक बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये या सॉफ्टवेअरसंबंधी त्यांच्या काही सूचना असतील तर त्यांनी लेखी स्वरुपात द्याव्यात, त्या सूचनांबाबत विचार करता येईल, अशा प्रकारची सन्माननीय सदस्यांना मी विनंती केली होती.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41869.....

श्री. विक्रम काळे : आज गुरुपौर्णिमा आहे आणि शिक्षण विभागाच्या प्रश्नांचा आजचा दिवस आहे. आम्हा शिक्षकांना माननीय मंत्री महोदयांनी शुभेच्छा देखील दिलेल्या असून त्या आम्ही स्वीकारलेल्या आहेत. शिक्षकांचे वेतन दर महिन्याच्या 1 तारखेला व्हावे म्हणून अनेक वेळा या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित झालेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी सागितले ते खरे आहे. केवळ अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे हेड बदलण्याची कार्यवाही डिसेंबर 2007 पासून आजतागायत झालेली नाही. त्यामुळे एकाच शाळेतील एका शिक्षकाचे वेतन होते तर दुस-या शिक्षकाचे वेतन होत नाही. ही त्रुटी केव्हा दूर करण्यात येईल ? बजेट पाठविण्यासाठी वेतन पथकाचे अधीक्षक सक्षमपणे काम करीत नसल्यामुळे शिक्षक आणि कर्मचा-यांना 5 तारखेला देखील वेतन मिळत नाही. तेव्हा या सर्व गोष्टींचा आढावा घेऊन वेळेवर वेतन होण्यासाठी संबंधितांना सक्त ताकीद देण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी योजनेत्तरच्या संदर्भात मुद्दा मांडला. दिनांक 28 जानेवारी 2013ला ऑर्डर्स काढलेल्या आहेत. त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या तपासून घेण्यात येतील. अधीक्षक सक्षमपणे काम करीत नसल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. वस्तुस्थिती अशी आहे की, मुख्याध्यापकाकडून देयके लवकर सादर झाली पाहिजेत. शाळांनी वेळेवर देयके सादर केली नाहीत, ती उशिरा सादर केली असतील तर वेतन विलंबाने होईल. देयके 1 तें 7 तारखेपर्यंत सादर करण्याचा एक टप्पा आहे आणि 8 ते 15 तारखेपर्यंत देयके सादर करण्याचा दुसरा टप्पा आहे. देयके पहिल्या टप्प्यामध्ये म्हणजे 1 ते 7 तारखेच्या दरम्यान सादर केली गेली तर पगार वेळेवर होऊ शकतो आणि देयके 8 ते 15 तारखेच्या दरम्यान सादर केली गेली तर पगार विलंबाने होतो. यामध्ये कोणत्याही अधिका-याचा दोष नसून ज्या शाळेतून देयके वेळेवर पाठविली जातील त्या शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांचे पगार वेळेवर होतील.

श्री. रामनाथ मोते : शिक्षकांना वेळेवर वेतन मिळण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या संदर्भातील योजना आणलेली आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु प्रत्यक्षांत त्या योजनेची अंमलबजावणी होत नाही. माननीय मंत्री महोदय वेळेवर पगार देतो असे म्हणत असले तरी मी त्यांना रायगड जिल्ह्याची माहिती देतो. रायगड जिल्ह्यातील शिक्षकांचे मे महिन्याचे पगार जूनच्या 5 तारखेपर्यंत झाले नाहीत, जून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महिन्याचे पगार जुलै महिन्याच्या 5 तारखेपर्यंत झालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मी मागील वर्षभराची माहिती घेतलेली आहे. रायगड जिल्हयातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांचे पगार केव्हाही वेळेवर झालेले नाहीत. या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांची भेट घेऊन चर्चा देखील केली होती. पगार विलंबाने होत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही असेही त्यावेळी सांगितलेले होते. परंतु या परिस्थितीमध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. तेव्हा रायगड आणि ठाणे जिल्हयातील शिक्षकांचे पगार वेळेवर होण्याच्या संदर्भात शासन काय पावले उचलणार आहे ? शालार्थमध्ये अनेक त्रुटी आहेत. शालार्थमध्ये माहिती आलेली नाही. देयके परत पाठविण्यात आली. यासंबंधी ठाण्याच्या वेतन पथकाकडून माहिती घ्यावी. शालार्थ योजना परिपूर्ण होईपर्यन्त कोणत्याही शाळेच्या शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाची देयके अस्वीकृत करु नयेत अशा प्रकारचे आदेश मंत्री महोदय आजच्या आज देणार आहेत काय ?

प्रा. फौजिया खान : रायगड जिल्ह्यातील 57 शाखांचे कोअरप्रणालीच्या माध्यमातून पगार झालेले आहेत. आपल्या मिटींगमध्ये हा मुद्दा उपस्थित झाला होता. मी माननीय सदस्यांना पगाराच्या तारखा देते. 16.4.2012ला मार्च महिन्याचा पगार झाला, 7.5.2012ला एप्रिल महिन्याचा पगार झ ाला, 18.6.2013ला मे महिन्याचा पगार झाला, 10.7.2012ला जून महिन्याचा पगार झाला...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41869....

**सभापती** :. मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी प्रश्न विचारु नयेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये यासंदर्भात किती गैरपध्दतीने कारभार चालला आहे ही बाब माननीय राज्यमंत्री महोदयांच्या उत्तरावरुन दिसून येते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या बँकेचा उल्लेख केला गेला, परंतु त्यांनी त्यांच्या बँकेत कोअर बँकींग सिस्टीम सुरु केलेली आहे. शिक्षक अणि शिक्षकेत्तर कम्रचाऱ्यांना वेळेवर पगार दिले जात नाहीत त्याबाबतीत त्यांच्या बँकेचा काहीही दोष नाही. हा दोष शालेय शिक्षण खात्याचा आहे. खात्याच्या हलर्गीपणामुळे शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार दोन-दोन महिने दिले जात नाहीत ही गोष्ट बरोबर नाही. ज्या अधिकाऱ्याकडून शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याकामी हलगर्जीपणा केलेला आहे व केला जातो आहे अशा अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई झ ााली पाहिजे आणि रायगड जिल्हयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर कसे होतील याची काळजी शासनाच्या माध्यमातून घेण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, खरे म्हणजे आज गुरुपोर्णिमेचा दिवस आहे.गुरुपार्णिमेच्या निमित्त " गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु: गुर्रुदेवो महेश्वर: गुरु: साक्षात्परब्रह्म तस्मै श्री गुरवेनम: " सभापती महोदय, आपण देखील गुरुंना न्याय दिलेला आहे. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील 9 प्रश्न हे आमच्याच विभागाशी संबंधित आहेत. या ठिकाणी सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी तिन्ही प्रश्नांना सविस्तरपणे उत्तरे दिलेली आहेत. महिन्याच्या 1 तारखेस पगार देण्याबद्दल शासन वचनबध्द आहे. आज 11 जिल्हयामध्ये राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून शिक्षकांचा पगार महिन्याच्या 1 तारखेस होतो. 12 जिल्हयांमध्ये वेगवेगळया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माध्यमातून 1 तारखेस पगार होतो आहे. उर्वरित जिल्हयात 1 ऑक्टोबर पासून शिक्षकांचे नियमितपणे पगार होतील. या ठिकाणी सन्मानीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील, रामनाथ मोते यांना रायगड जिल्हयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पगार महिन्याच्या 1 तारखेस होत नाही अशा प्रकारचा प्रश्न विचारलेला आहे. रायगड जिल्हयात बँकेची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चूक नाही ही गोष्ट खरी आहे. त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा आहेत असे आम्हाला सांगून चालणार नाही. पण कोणत्याही परिस्थितीत पुढच्या महिन्यापासून महिन्याच्या 1 तारखेलाच पगार निश्चितपणे होतील.

श्री.निरंजन डावखरे : शासनाने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ऑन लाईनचे पगार देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे, तो स्वागतार्ह आहे. ठाण्याच्या पे युनीटने शासनाला या सॉफ्टवेअरमध्ये मोठया त्रुटी आहेत असे लेखी पत्राने कळविले आहे हे खरे आहे काय, ग्रामीण भागात उदाहरणार्थ ठाणे रायगड या जिल्हयात राष्ट्रीयकृत बँकामध्ये कोअर बॅकींग प्रणाली नाही. ज्या जिल्हयात राष्ट्रीयकृत बँकेत कोअर बँकींग प्रणाली नाही, त्या ग्रामीण भागातील जिल्हयात याबाबतीत सहकारी बॅकाना जास्तीत जास्त संधी देण्यात येईल काय, अलिबाग येथील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत नाही असा प्रश्न या ठिकाणी उपलब्ध झाली आहे.विशेषत: अलिबागचे पे युनीटच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर त्या युनीट मध्ये संगणक पुरेसे नाही, जे संगणक आहेत, ते हाताळण्यासाठी कर्मचारी नाहीत. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी महिन्याच्या 1 तारखेस शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार दिले जातील अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. परंतु त्या ठिकाणी ऑन लाईन पध्दीने पगार देण्यासाठी कर्मचारी वर्ग व इतर काही गोष्टींची आवश्यकता लागेल, त्या गोष्टींची पूर्तता शासनाकडून लवकरात लवकर करण्यात येईल काय ? शिक्षकांना 1 तारखेलाच त्यांची गुरुदक्षिणा मिळेल अशा प्रकारची योजना करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, सॉफ्टवेअर तयार करीत असताना ट्रायल आणि एरर बेसीसवर दुरुस्त होणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणच्या तक्रारी आल्या दुरुस्ती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ही प्रणाली 90 टक्के जरी झाली असेल तरी ती फूलप्रूफ झालेली नाही. ती सिस्टीम फूलप्रुफ्र करण्याचा शासनाचा प्रयत्न चालला आहे....

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41869..... प्रा.फौजिया खान.....

तोपर्यंत पगार थांबविण्यात येत नाही. पगार मॅन्युअल पध्दतीने देण्याचे काम सुरु राहील. नवीन पध्दत असली तरी ती सुंदर आहे. मॅन्युअल पध्दतीमध्ये काही त्रुटी येण्याची शक्यता असते. उदाहरण सांगायचे झाले तर एका शिक्षकाचे दोन ठिकाणी नाव असणे, 2 पार्ट टाईम शिक्षक एक फूलटाईम शिक्षकाचा पगार घेत असणे, या त्रुटी शालार्थ पध्दतीमध्ये दूर होणार आहेत. ही पध्दत खूप चांगली आहे. या पध्दतीमुळे खूप फायदा होणार आहे. शालेय शिक्षण विभागाची आर्थिक बचत होईल असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, रायगड जिल्हयाचा मुद्दा उपस्थित केला आहे. रायगड जिल्हयामध्ये किंवा अलिबाग तालुक्यामध्ये जी काही कमतरता असेल, पदे रिक्त असतील त्या बाबतीत मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, ताबडतोब दुरुस्ती करु. सर्व शिक्षकांना 1 तारखेला पगार मिळेल यासाठी शासन कटिबध्द आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर जिल्ह्यातील अशासकीय अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याबाबत**

**(४) * ४१७९६ श्री.नागो पुंडलिक गाणार, डॉ.रणजित पाटील, श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील अशासकीय अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याबाबत अद्याप पावेतो मान्यता प्रदान करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी अनेक वेळा शासनास पत्र देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची नस्ती (फाईल) शिक्षण सचिव स्तरावर प्रलंबित पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी मंजुरी प्रदान करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून केंव्हा मंजूरी आदेश देणे अपेक्षित आहे ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१), (२), (३), (४) व (५) नागपूर जिल्ह्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान राष्ट्रीकृत बँकेमार्फत करण्याबाबतचे आदेश दि.१८ जून, २०१३ रोजी निर्गमित करण्यात आले होते. परंतु सदर आदेशाला शासनाने स्थगिती दिली आहे.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, नागपूर जिल्हयातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान राष्ट्रीकृत बँकेमार्फत करण्याबाबतचे आदेश शासनाने दिले होते. या आदेशाला शासनानेच स्थगिती दिली. शासनाने स्वत:च्या आदेशाला स्थगिती देण्याची कारणे कोणती आहेत? नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ११९ कोटी रुपयांचा घोटाळा झाला. या बँकेला व्यवसाय करण्याकरिता रिझर्व्ह बँकेचा परवाना नाही हे खरे आहे काय? स्थगिती उठविली जाणार आहे काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मागील प्रश्नामध्ये याच विषयाबाबत मी विस्तृत स्वरुपाचे उत्तर दिले आहे. नाबार्ड आणि केंद्र शासनाने केलेल्या चर्चेनुसार नाबार्ड कॉमन प्लॅटफॉर्म म्हणून कोअर बँक झाल्याने सगळ्या बँकांना सक्षम करण्याची मुभा द्यावी. सगळ्या बँका सक्षम झाल्यानंतर त्यातील सक्षम बँक निवडून त्यांच्या माध्यमातून पगार देता येईल. असा निर्णय

..३..

ता.प्र.क्र.४१७९६....... प्रा.फौजिया खान........

राज्यात झालेला आहे. त्यामुळे आपण ३० सप्टेंबरपर्यंत त्यांना वेळ दिलेली आहे. त्यासाठी आपण हे थांबविले आहे. सगळ्या राज्यासाठी चांगली पध्दत होत असेल तर टेक्नॉलॉजीचा पुरेपूर वापर करुन ती अंमलात आणू अशा पध्दतीचा शासनाने निर्णय घेतला आहे.

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत जो मुद्दा मांडला आहे तो या प्रश्नाशी संबंधित नाही. शालेय शिक्षण विभागाचा देखील त्या मुद्याशी संबंध येत नाही.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, कॉम्प्युटर सिस्टीम लागू करीत आहोत त्याची छाननी सुरु आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आर्थिक घोटाळा झाला, ती बँक सध्या बंद आहे. अनेक जिल्हयातील शाळांमध्ये कॉम्प्युटरची सुविधा उपलब्ध नाही, त्याबद्दल शासन काय करणार आहे, त्या शाळांना कॉम्प्युटर उपलब्ध करुन देणार आहात काय? त्यांनी सॉफ्टवेअर वापर करण्याबाबत कोणता निर्णय घेणार आहात?

प्रा.फौजिया खान : शाळांमध्ये कॉम्प्युटर असणे किंवा नसणे याचा या प्रश्नाशी काही संबंध नाही. शिक्षकांच्या बँक खात्यामध्ये पगार जमा होण्याबाबतचा हा प्रश्न आहे. सर्व शिक्षकांचे पगार डायरेक्ट ऑनलाईन पध्दतीने बँक खात्यात जमा होतील. शाळांमध्ये कॉम्प्युटर असणे किंवा नसणे हा मुद्दा याच्याशी संबंधित नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नागो पुंडलिक गाणार यांनी विचारलेल्या प्रश्नाचा विषय डायव्हर्ट होत आहे, त्यामुळे मंत्री महोदय खूष दिसत आहेत. त्यांचा स्पेसिफिक प्रश्न होता.

नंतर के.1...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/ प्रथम श्री. भोगले....... 11:50

**ता.प्र.क्र.** : 41796......

श्री. विनोद तावडे ....

रिझर्व्ह बँकेने नागपूरच्या बँकेला बाद ठरविले असून तिचे लायसन सुध्दा रद्द केले आहे. राष्ट्रीयकृत बँकेतून जो पगार दिला जात होता त्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने नागपूरची बँक रद्द केलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण जी काही स्थगिती दिलेली आहे ती उठवली जाणार आहे का ? असा स्पेसिफिक प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. गाणार साहेबांनी विचारला होता त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर द्यावे एवढी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या बँकेतून पगार दिला जात होता तो बंद करुन दुसऱ्या बँकेतून पगार द्यावा यासंदर्भातील कोणताही निर्णय झालेला नाही. राज्यातील सर्व बँकेमध्ये आपण टेक्नॉलाजी इक्वीप्ट करणार आहोत. सर्व बँकाना सक्षम करुन नंतरच यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे. बँक सुरु आहेत, पगार सुध्दा दिले जात आहेत, पगार देण्याचे थांबवण्यात आलेले नाही त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेला प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये यासाठी मी सांगू इच्छितो की, नागपूर बँकेचे नेटवर्थ बरोबर नसल्यामुळे या बँकेला लायसन दिले गेले नाही. नागपूर बँकेचे लायसन रद्द झालेले नाही. सहकार कायद्याच्या संयुक्त समितीमध्ये मी काम केलेले आहे. या विषयाच्या संदर्भात संयुक्त समितीमध्ये हा मुद्दा जाणूनबुजून डेव्हलप करण्यात आलेला आहे. कोणतीही पतसंस्था आर्थिक अडचणीत आली तर अशा पतसंस्थेला राज्य शासनाकडून मदत केली जाणार आहे. राष्ट्रीयकृत बँकेचे या विषयाच्या संदर्भात कोणीही समर्थन करु नये असे मला वाटते. ज्या ज्या बँका बंद पडत होत्या अशा सर्व बँकाना राज्य शासनाने आर्थिक मदत दिलेली आहे. नागपूर बँकेला परवा 90 कोटी रुपये देण्यात आले असून नागपूर बँकेला लायसन मिळणार आहे. ठराविक कालावधीत बँकानी कोअर बँकीग केले नाही तर अशा बँका बंद केल्या जातील असे रिझर्व्ह बँकेने आदेश दिलेले आहेत. कोकणातील सर्व बँका या कोअर बँका असल्यामुळे कोकणातील बँकावर आपण अन्याय करु नका. कोकणातील सर्व बँकामध्ये पगार वेळेवर दिले जात आहेत. पे युनीटने पगार दिले नाही तर त्यामध्ये आमची काही चूक नाही. राष्ट्रीयकृत बँकेचे काही एजंट गावोगावी फिरत आहेत. शिक्षकांचे सर्व पगार जिल्हा बँकेमधूनच झाले पाहिजेत या मताचा

..2...

**ता.प्र.क्र.** : 41796......

श्री.जयंत प्र.पाटील ......

मी आहे. जिल्हा बँका या शेतकऱ्यांच्या आहेत. जिल्हा बँका टिकण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेचे समर्थन शिक्षक आमदारांनी करु नये अशी माझी विनंती आहे. कायद्याने तुम्हाला सर्व बँका कोअर बँकीगने जोडाव्या लागणार आहेत.

सभापती महोदय, शिक्षकांचे पगार आम्ही 31 तारखेला करीत असतो. या वेळेला एवढे एवढे पगार तुम्ही करावेत आणि तुम्ही पाच तारखेला पेमेंट दिले तरी चालेल असे आपण आम्हाला पत्र द्या. आम्ही पगार करण्यास तयार आहोत. तसेच कोकणातील चारही बँका यासाठी तयार आहेत. राष्ट्रीयकृत बँकेमध्ये सर्व पगार न जाता धोरणात्मक व कायमस्वरुपी निर्णय घेऊन जिल्हा बँकेमधूनच शिक्षकांचे पगार होतील हे बघितले जाईल काय ?

**सभापती** :आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये शिक्षकांच्या संदर्भातील प्रश्न आहेत. सर्व शिक्षक आमदारांना प्रश्न विचारण्याची इच्छा आहे. आता चौथा प्रश्न सुरु असून प्रश्नोत्तराचा वेळ संपण्यासाठी केवळ सहा मिनिटांचा वेळ शिल्लक राहिलेला आहे. एकाच प्रश्नावर आपण इतका वेळ चर्चा केली तर अन्य प्रश्न चर्चेला येणार नाहीत. अन्य प्रश्नांना चर्चेसाठी वेळच मिळत नाही हे पुन्हा पुन्हा दिसून आलेले आहे. त्यामुळे उद्या पासून कोणत्याही प्रश्नाला 10 मिनिटांपेक्षा जास्त वेळ दिला जाणार नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती**....

एका प्रश्नाला दहा मिनिटांचा अवधी दिला की किमान सहा तारांकित प्रश्न चर्चेला येण्याची शक्यता आहे. आपला प्रयत्न रोज दहा तारांकित प्रश्नांपर्यंत तरी चर्चा व्हावी असा आपला प्रयत्न आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, येथे सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. ते सर्व मुद्दे दृष्टीसमोर ठेवून आम्ही 30 सप्टेंबर पर्यंत कालावधी वाढविला आहे. कारण सहकारी बँका ह्या स्ट्रेंग्थन् झाल्या पाहिजेत हीच भूमिका शासनाची आहे. पण एक रेकॉर्डवर आणणे गरजेचे आहे की, शासन बँकेला वेळेवर पैसे देत नाही असे अजिबात नाही.शासनाकडून बँकेला वेळेवरच पैसे जात आहेत. त्यात बाकीचे अन्य काही प्रश्न असू शकतात. त्यामुळे थोडासा विलंब होत आहे. त्याचा उल्लेख मी यापूर्वीच केला आहे. शासनाकडून पैशाची कमतरता मुळीच राहत नाही.

............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेमधील शिक्षक व शिक्षकेत्तरांना जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करणेबाबत**

**(5) * 41530 श्री.वसंतराव खोटरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.भगवान साळुंखे, श्री.रामनाथ मोते, श्री.चंद्रकांत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 36662 ला दिनांक 15 मार्च, 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी विना अनुदानित व अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यावरील कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तरांना जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासन निर्णय निर्गमित झाला आहे काय,
(3) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) नाही.
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. या प्रश्नासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्याच प्रमाणे माननीय राज्य मंत्री महोदयांनी 9 तारखेला सर्व आमदारांची बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये या प्रश्नावर अतिशय चांगली चर्चा झाली. या बैठकीमध्ये आम्हाला मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले. परंतु, या प्रश्नामध्ये मात्र नकारात्मक उत्तर आहे. दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी जे शिक्षक विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेत लागले असतील त्यांना जुनीच पेन्शन योजना लागू रहावी असा माझा प्रश्न होता. त्यास सहमती देखील दर्शविण्यात आली होती. मी येथे एक उदाहरण सांगणार आहे.

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी उदाहरण न देता आपला प्रश्न विचारावा.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय प्रश्न असा आहे की, अमरावती विभागामध्ये एकूण 3513 शिक्षकांना 1 नाव्हेंबर 2005 पूर्वी मान्यता मिळाली आहे. त्यापैकी 1793 शिक्षकांना आपण खाते उघडण्यास परवानगी दिली आहे. त्यांचे खाते सुरू आहे. फक्त 1611 शिक्षकांना खाते उघडून दिलेले नाही. आमचा प्रश्न असा आहे की, यांना जुनी योजना लागू आहे. त्यांची खाती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41530...

श्री.वसंतराव खोटरे...

सुरू करण्यासाठी आपण संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देणार आहात काय ? कारण सहाव्या वेतन आयोगाची थकीत रक्कम अद्याप जमा झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या समोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, याबाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची खाती उघडण्यासंबंधी आपण अधिकाऱ्यांना सूचना देणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 31 ऑक्टोबर 2005 अन्वयेच्या जी.आर.नुसार दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पूर्वीचे जे शासकीय कर्मचारी आहेत त्यांना जुनी पेन्शन योजना लागू राहणार आहे. त्यानंतरचे जे शासकीय कर्मचारी आहेत त्यांना नवीन अंशत: पेन्शन योजना लागू झालेली आहे. त्यानुसार हा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक 29 नोव्हेंबर 2010 च्या शासन निर्णयान्वये अंमलात आणला. 1 नाव्हेंबर 2005 पूर्वी ज्या शाळा शंभर टक्के अनुदानावर आल्या आहेत त्या सर्व शाळांना जुनी पेन्शन योजना लागू राहणार आहे अशा पद्धतीचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानंतर आमच्या विभागाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. 100 टक्के अनुदानित शाळा असेल पण जे शिक्षक सेवक 2005 नंतर नियमित झाले असतील तर त्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू राहील या पद्धतीचा निर्णय घेतलेला आहे. सदस्यांची मागणी अशी आहे की, 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के, 80 टक्के आहेत त्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करावी. यासाठी अनेक लोक कोर्टात देखील गेले आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41530....

प्रा.फौजिया खान....

न्यायालयात अनेक निर्णय इंटेरिम झाले. नागपूर खंडपीठाने फायनल निर्णय दिलेला आहे. रिट पिटीशन क्रमांक 3458 प्रमाणे शालार्थच्या सर्व त्रुटी दूर होणार आहेत. या रिट पिटीशनमध्ये शासनाचा व्ह्यू अप-हेल्ड केलेला आहे. "In that view of the matter, we find that challenge as raised to the validity of the Government Resolution dated 29.11.2010 is without any substance and as such, Petition fails. Rule is accordingly discharged in all these Petitions with no order as to costs." सर्व पिटीशन्स एकत्रित करुन नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिलेला आहे. युनानी संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील निर्णय दिलेला आहे. यामध्ये देखील अप-हेल्ड करण्यात आलेले आहे की, 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वीच्या शंभर टक्के अनुदानित असलेल्या शाळांना जुनी पेन्शन योजना लागू राहील. अशंतः अनुदानित शाळांना लागू होणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सरकार लोकांच्या हितासाठी काम करते. दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी ज्यांनी दोन वर्षे शिक्षण सेवक म्हणून काम केले असेल व 1 नोव्हेंबर, 2005 नंतर एक वर्ष शिक्षण सेवक म्हणून काम केले असेल त्यांना देखील जुनी पेन्शन योजना सरकारने लागू केली आहे. खरे म्हणजे सरकारने हा क्रांतिकारी निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. परंतु दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी दहा वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांवर अन्याय होत आहे. तेव्हा अंशतः अनुदानित शाळांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासन पुनर्विचार करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्याला न्यायालयाने अप-हेल्ड केलेले आहे. त्यामुळे तसे करता येणार नाही. तेव्हा मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छिते की, अंशतः अनुदानित शाळांना जुनी पेन्शन योजना लागू करता येणार नाही.

ता.प्र.क्र.41530....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना सोईचे उत्तर देता येणार नाही. प्रश्नांना काय उत्तर द्यायचे हा त्यांचा अधिकार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय सोईचा नाही म्हणून त्याचा उल्लेख ते करीत नाही हे बरोबर नाही. शासनाकडे निधी नाही म्हणून आम्ही अनुदान देत नाही, जेव्हा आमच्याकडे पैसे येतील तेव्हा अनुदान देऊ असे प्रतिज्ञापत्र शासनाने वारंवार मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेले आहे हे खरे आहे काय ? म्हणजे शासनाकडे निधी नाही हे कारण आहे. तेव्हा शासनाला सर्वांना समान न्याय द्यावा लागेल.शासनाकडे निधी नाही म्हणून त्यांना उशिराने देत आहात एवढाच भाग आहे, त्याचा शंभर टक्के अनुदानाशी काही संबंध नाही. माननीय मंत्री महोदय चुकीच्या पध्दतीने आणि निषेधार्ह उत्तरे देत आहेत. तेव्हा माननीय मंत्री महोदय त्यांच्या उत्तरात सुधारणा करणार काय ? माझा प्रश्न आहे की, विनाअनुदानित शाळा अनुदानावर आल्यानंतर त्या शाळा 2005 पूर्वीच्या असतील तर 2005 पूर्वी नेमणूक झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयातील निर्णयाचा उल्लेख केला. माझ्याकडे अशी माहिती आहे की, मुंबईचे सर्व अंतरिम आदेश आहेत आणि अंतिम आदेश नागपूर खंडपीठाचा आहे. माननीय सदस्यांकडे अंतिम आदेशाची प्रत असेल तर त्यांनी ती माझ्याकडे द्यावी त्यावरुन अंतिम निर्णय घेता येईल. सन्माननीय सदस्यांनी येथे शासनाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले असे सांगितले. त्याबाबत सांगू इच्छिते की, शासनाचे जे धोरण असेल त्याप्रमाणे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात येईल. परंतु न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर सर्व अवलंबून आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांची मागणी करता येणार नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, गुरुपोर्णिमेच्या दिवशी माननीय मंत्री महोदयांकडून शिक्षकांवर अन्याय होत आहे. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराने आमचे समाधान झालेले नाही. तेव्हा आम्ही बर्हिगमन करीत आहोत.

(सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व वसंतराव खोटरे बहिर्गमन करतात )

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------- यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उप मुख्यमंत्री व माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन**

श्री.हेमंत टकले : महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आज सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचा वाढदिवस आहे. तसेच काल माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचा वाढदिवस झाला. सभागृहाने या दोन्ही नेत्यांचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा द्याव्यात, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांना मी सभागृहाच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

**सभापती** : आज सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब यांनी "बिहारमध्ये मध्यान्ह भोजनामुळे (मिड-डे मिल) शाळांमध्ये अन्नातून विषबाधा होण्याचे प्रकार निदर्शनास येणे, गोवा, चेन्नई तसेच महाराष्ट्रातील अनेक शाळांमध्ये अनेकदा पोषण आहार मध्यान्ह भोजनातून विषबाधा होण्याचे प्रकार निदर्शनास येणे" या विषयी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. ही सूचना स्वीकारुन व सभागृहासमोरील अन्य कामकाज थांबवून या प्रस्तावावर चर्चा करावी, अशी सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या माध्यमातून मागणी केलेली आहे. मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, हा विषय 289 च्या प्रस्तावाचा कसा होतो या विषयी त्यांनी एक मिनिटांत आपले म्हणणे मांडावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. बिहारमध्ये मध्यान्ह भोजनातून झालेल्या विषबाधेनंतर गोवा राज्यात सुध्दा तशीच घटना घडली. त्यानंतर महाराष्ट्रातील धुळे येथे सुध्दा तशाच प्रकारची घटना घडली. मध्यान्ह भोजनातून विषबाधा होण्याच्या घटना आपल्याला विविध ठिकाणी घडल्याच्या दिसून येतात. शालेय पोषण आहारातून मुलांना विषबाधा होते. हा विषय या सभागृहात वारंवार चर्चेला गेला आहे. सडलेले धान्य, धान्यात पाल आढळून येणे किंवा सन्माननीय सदस्य श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी पोषण आहारमध्ये साप आढळल्याबाबत नियम 93 अन्वये दिलेली सूचना अशा अनेक बाबी घडल्याचे दिसून येते.

महोदय, मध्यान्ह भोजन ही केंद्र सरकारची संकल्पना आहे. या योजनेसाठी केंद्र सरकार 75 टक्के आणि राज्य सरकार 25 टक्के अनुदान देते. केंद्र सरकार मध्यान्ह भोजन योजनेवर 10 हजार कोटी रुपये खर्च करते. परंतु ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. ते भोजन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचल्यास ते चांगल्या दर्जाचे नसते अशा अनेकांच्या तक्रारी असतात. माझी विनंती आहे की, या विषयावर सभागृहात सांगोपांग चर्चा होणे आवश्यक आहे. मी तर म्हणेन की, हा आजचा बर्निंग इश्यू आहे. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, आजचे सभागृहाचे कामकाज बाजूला सारुन या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सांवत....

विषयावर चर्चा करण्यास आपण परवानगी द्यावी. जिल्हा परिषदेच्या शाळा, महापालिकेच्या शाळांतील हजारो-लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा हा प्रश्न आहे. सध्या घडत असलेल्या घटनांमुळे मध्यान्ह भोजन ही संकल्पना आता वेगळ्याप्रकारे मांडण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या बाबतीत सभागृहातील सन्माननीय सदस्यांची मते आणि सूचना जाणून घेणे गरजेचे आहे.

महोदय, मी केलेल्या सूचनेचा आपण जरुर विचार करावा आणि या प्रस्तावावर चर्चा करण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये अत्यंत महत्त्वाच्या विषयावर प्रस्तावाची सूचना दिली आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून अशा पध्दतीने विषबाधा होत असेल तर योग्य नाही. परंतु दुर्दैवाने अन्य राज्यात आणि आपल्या राज्यांत सुध्दा काही ठिकाणी अशा घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे या विषयाकडेशासनाचे वेळीच लक्ष वेधणे हे आपले काम आहे. मी आजच या विषयावरील चर्चेला परवानगी देऊ शकणार नाही. परंतु मला असे वाटते की, या विषयावर सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे. म्हणून आज या प्रस्तावाला संमती न देता, नंतर एके दिवशी या विषयावर 2 तास चर्चा घेण्याचा मी निर्णय घेतला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

नंतर श्री.बरवड....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझी विनंती राहील की, या आठवड्यात या चर्चेला परवानगी दिली तर ते योग्य होईल.

**सभापती** : लवकरात लवकर म्हणजे या आठवड्यात सुध्दा ही चर्चा घेतली जाईल.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अत्यंत महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे आणि या विषयावर कधीही चर्चा घेण्यास शासनाची तयारी आहे. गेले तीन दिवस मी या संदर्भात प्रयत्न करीत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांच्याशी सुदा मी बोललो आहे तसेच विधान सभेतील विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथ खडसे यांच्याशी सुध्दा मी बोललो आहे. फक्त माझी अशी कल्पना होती की, या चर्चेच्या अगोदर जर दोन्ही सभागृहाच्या गट नेत्यांची माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एखादी बैठक घेऊन यामध्ये अधिक काय चांगले करता येईल असा जर कॉन्क्रीट प्लॅन आम्ही तयार करु शकलो तर या विषयावरील चर्चेला उत्तर देताना अधिक चांगले उत्तर देता येईल असे शासनाचे मत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : उत्तरापेक्षा निर्णय महत्वाचा आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हा विषय महत्वाचा असल्यामुळे मी सांगितले की, कोणत्याही क्षणी या विषयावरील चर्चेला शासनाची तयारी आहे. मी फक्त सभागृहाच्या माहितीसाठी सांगितले. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली एक दोन दिवसामध्ये सर्व गट नेत्यांची बैठक बोलविण्यात येईल.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी ज्या पध्दतीने या बाबतीत शासनाची भूमिका सांगितली ती स्तुत्य आहे. विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराच्या बाबतीत शासनही सर्वंकष चर्चा करील आणि या सदनामध्ये आपण सुध्दा या संदर्भात चर्चा करु अशा पध्दतीचा निर्णय मी घेतलेला आहे.

----

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पीक कर्ज वसुलीस मुदतवाढ

**मु.शी.** : पीक कर्ज वसुलीस मुदतवाढ यासंबंधी माननीय सहकार मंत्र्यांचे निवेदन

श्री. हर्षवर्धन पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

राज्यातील शेतकऱ्यांनी विविध बँकांकडून घेतलेल्या पीक कर्जाची वसुली दि. 30 जून पर्यंत केल्यास अशा शेतकऱ्यांना शासनामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ देण्यात येतो. सन 2012-2013 या वर्षात राज्यातील 16 जिल्ह्यात शासनाने टंचाई परिस्थिती जाहीर केली होती. अशा जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी पीक कर्जाची मुदतीत परतफेड करु शकले नाहीत.

सन 2012 च्या खरीप हंगामासाठी राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत राज्यात रु. 201.43 कोटी रुपये विमा नुकसान भरपाई जाहीर करण्यात आली आहे. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जुलै, 2013 मध्ये जमा होण्याची शक्यता आहे. राज्यातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ( धुळे-नंदुरबार, जालना व उस्मानाबाद) रिझर्व्ह बँकेकडून नुकताच बँकींग परवाना प्राप्त झाला असून परवाना मिळाल्यानंतर या जिल्ह्यातील कर्ज वसुलीस चालना मिळाली आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने चालू आर्थिक वर्षापुरती पीक कर्जाच्या परतफेडीसाठी दि. 30 जून, 2013 ऐवजी दि. 15 ऑगस्ट, 2013 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, या कर्जफेड योजनेची मुदत 30 जूनला संपलेली आहे. या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आणि राज्य सरकारने असा निर्णय घेतलेला आहे की, 15 ऑगस्ट पर्यंत शेतकऱ्यांना कर्जफेड करण्याबाबत मुदत वाढ करावी. जे शेतकरी या 15 ऑगस्ट पर्यंत कर्जफेड करतील त्यांना व्याज सवलत योजना लागू करण्यात येईल.

---

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

या औचित्याच्या मुद्याव्दारे मी सभागृहाचे आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. एका अर्थाने अतिशय सेन्सेटीव्ह गोष्ट आज पहाटे मुंबई शहरामध्ये घडलेली आहे. श्री. वसंत पाटील नावाचे एक आरटीआय कार्यकर्ते आणि भारतीय जनता पक्षाचे वॉर्ड क्रमांक 106 चे अध्यक्ष यांच्या घरात पहाटे 3.00 वाजता घुसून तलवारीने आणि तीक्ष्ण हत्याराने त्यांना मारण्यात आले. त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. कै. पाटील हे भांडूप पश्चिम विभागामधील वन खात्याच्या किंवा अन्य जमिनीवर होत असलेल्या अनधिकृत बांधकामाच्या विरोधात सातत्याने तक्रार करीत होते. आरटीआयमधून प्रश्न विचारणे, वन खात्याच्या आणि अन्य मोकळ्या सरकारी जागेवर जी अनधिकृत बांधकामे होत आहेत त्याला आडकाठी करण्यासाठी तक्रारी करणे अशा पध्दतीचे त्यांचे काम चालू असताना त्यांच्या घरात घुसून आरोपींनी त्यांना मारले. आरोपी पकडले गेले नाहीत. सर्वात वाईट गोष्ट अशी की, एक महिन्यापूर्वी सुध्दा या विभागामध्ये आरपीआयचे आणखी एक दलित कार्यकर्ते श्री. संजय पगारे, जे याच पध्दतीचे काम करीत होते, त्यांची सुध्दा हत्या केलेली आहे. अशा पध्दतीने ज्यांनी शासनाकडे व्हीसल ब्लोअरचे काम करावे

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.......

अशा व्यक्तींची मुंबई शहरामध्ये हत्या होणे ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांनी किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी गंभीर मुद्दा मांडलेला आहे. आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये म्हाडाच्या दोन भूखंडांचे रक्षण करण्यासाठी 75 सुरक्षा रक्षक नेमण्यासाठी काही निधीची मागणी केलेली आहे. सामाजिक व राजकीय कार्यकर्ते स्वत:हून शासकीय जमिनींचे संरक्षण करीत आहेत. मुंब्रा येथील वन जमिनीवर बांधण्यात आलेली जमीन कोसळल्यामुळे 72 लोकांचा जीव गेल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडलेली आहे. शासन स्वत:हून शासकीय जमिनींचे संरक्षण करीत नाही, परंतु सामाजिक किंवा राजकीय कार्यकर्ते शासकीय जमिनींचे संरक्षण करीत असताना त्यांची हत्या होत आहे अशा प्रकारची माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे शासनाने ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. याबाबत वस्तुस्थिती काय आहे, अशा विसल ब्लोअरच्या संरक्षणासाठी सरकार काय करणार आहे, यासंबंधी शासकीय विधेयक मांडण्याचा शासनाचा विचार सुरु होता, त्यासंबंधी शासनाने सभागृहाच्या माध्यमातून जनतेला माहिती द्यावी.

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या मुद्याची गंभीरपणे नोंद घ्यावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : होय.

-------

2.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गेल्या काही दिवसांपासून विशेषत: प्रसारमाध्यमांमध्ये लखनभैय्या एन्काऊन्टरसंबंधी पोलीस कर्मचाऱ्यांना सेशन कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या निकालावरुन अनेक तर्कवितर्क लढविले जात आहेत. काही नेते तर याबाबत सातत्याने वक्तव्य करीत आहेत. पोलिसांना कर्तव्य बजावत असताना कायद्याची चौकट घालून दिलेली आहे. ती चौकट मोडून त्यांच्याकडून वर्तन घडले असल्यास नक्कीच न्यायालयामध्ये जाण्याची वेळ येते. तसे पाहिले तर खालच्या स्तरावरील न्यायालयाने निकाल दिल्यानंतर वरच्या कोर्टामध्ये जाण्याची सोय आहे. परंतु विनाकारण या विषयी वादविवाद वाढवून वेगवेगळी वक्तव्ये करुन राज्यव्यवस्थेबाबतच संभ्रमाचे वातावरण निर्माण केले जात आहे. ही बाब फार गंभीर आहे. अशा प्रकारचे निर्णय आल्यानंतर पोलीस दलाचे मनोबल खच्चीकरण होत आहे अशाप्रकारची व्यक्तव्ये केली जातात. यामध्ये मुद्दाम असे धागे सोडून दिले आहेत अशा प्रकारच्या शंका व्यक्त केल्या जातात. हे योग्य नाही असे मला वाटते. याबाबत सभागृहाने गंभीरपणे दखल घेऊन न्यायालयाच्या चौकटीतून पुढे जात असताना ती पूर्ण होऊ द्यावी. त्यानंतरच अशा प्रकारची वक्तव्ये करावीत. अन्यथा सामान्य माणसांचा न्यायव्यवस्थेवरील व शासकीय व्यवस्थेवरील विश्वास उडून जाईल, ही काळजी घेणे आवश्यक आहे. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छित आहे.

-------

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

3.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत अनेक पदवी व पदविका परीक्षांचे आयोजन केले जाते. या विद्यापीठामध्ये सेवेत असलेले अनेक शिक्षक पदवी परीक्षेसाठी प्रवेश घेत आहेत. उच्च प्राथमिक शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी शासनाने पदवीधर होणे बंधनकारक केले असल्यामुळे अनेक शिक्षक या विद्यापीठात प्रवेश घेत आहेत. इ.12 वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी दोन वर्षांचा डी.एड.चा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर मुक्त विद्यापीठाकडे पदवी परीक्षेसाठी नोंदणी करतात. डी.एड.झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेच्या दुसऱ्या वर्गात आतापर्यंत प्रवेश दिला जात होता. परंतु या शैक्षणिक वर्षापासून डी.एड.झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेसाठी प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्यांना या विद्यापीठाने पहिल्या वर्गात प्रवेश घेण्याचे बंधनकारक केलेले आहे. आतापर्यंत डी.एड.धारकांना पदवी परीक्षेसाठी दुसऱ्या वर्गात प्रवेश दिला जात होता त्याप्रमाणे या वर्षीही या विद्यापीठामध्ये डी.एड.धारक विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षात प्रवेश दिला जावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, प्रवेश देण्याची मुदत 8 दिवसांनी संपणार आहे. त्यामुळे अनेक शिक्षक पदवी परीक्षेपासून वंचित होतील. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण शासनाला निदेश दिले तर शिक्षकांसाठी हा चांगला निर्णय होऊ शकेल.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे मी त्यांचे लक्ष माझ्या औचित्याच्या मुद्याकडे वेधू इच्छितो.

"पावसाळा सुरु झाल्यावर दरड कोसळून झोपडपट्टीवासी गाडले जाण्याच्या घटना दरवर्षी घडत असतात. अशा घटना घडल्यानंतर शासनाकडून पुनर्वसनाच्या घोषणा केल्या जात असतात. अद्यापही मुंबईतील 22000 झोपडपट्टीवासीय जीव मुठीत धरुन जगत असल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत 260 लोकांनी प्राण गमावले असून 270 पेक्षाही जास्त लोक जखमी झालेले आहेत. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने 17 एप्रिल 2000 रोजी मुंबई शहर आणि मुंबई उपनगरातील धोकादायक स्थितीमध्ये असलेल्या झोपडपट्टयांचे सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये 327 धोकादायक ठिकाणी 22480 झोपड्या असल्याचे उघड झाले होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 19 सप्टेंबर 2011 रोजी घेतलेल्या बैठकीत दरडी खालील व डोंगर उतारावरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने नगररचना तज्ज्ञांच्या मदतीने एक महिन्याच्या आत कृती आराखडा तातडीने करण्याचे आदेश दिले होते. तसेच विकासयोग्य जमिनीच्या उपलब्धतेबाबत मुंबई उपनगर जिल्हाधिका-यांना तातडीने सर्वेक्षण करुन अहवाल देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. अद्याप या बाबतीत ठोस उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे दरडीखालील 22000 झोपडपट्टीवासीयांचे जीव वाचविण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलून कारवाई करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. मी या मुद्याकडे माननीय मंत्री महोदयांचे पुनश्च लक्ष वेधीत आहे. धन्यवाद."

--

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. शशिकांत शिंदे (जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ) मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे याचा सन 2011-2012 यावर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2010-2011 या वर्षाचा अलग लेखापरीक्षण अहवाल क्रमांक : रिपोर्ट/एस.ए.आर./10-11/एम.के.व्ही.डी.सी./97, दिनांक 16 ऑगस्ट 2012 चा अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:20

<u>**घोषणा**</u>

**उप सभापती** : महाराष्ट्रचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त भारताचे राष्ट्रपती माननीय श्री. प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते दिनांक 1 जुलै 2013 रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या "चतुरस्त्र" या ग्रंथाचे वितरण माननीय सदस्यांकरिता त्यांचे हजेरीपट घेऊन बसणा-या कर्मचा-यांकडे वितरणासाठी उपलब्ध आहेत. सर्व माननीय सदस्यांनी आपली प्रत घ्यावी.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "दिनांक 2 मे 2013 रोजी दिल्लीहून मुंबई येथील वांद्रे टर्मिनस स्टेशनवर आलेल्या प्रीती राठी या तरुणीवर एका माथेफिरुने केलेल्या ॲसिड हल्ल्यात तरुणीचा उपचारानंतर झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "घाणेखुंट (ता.खेड, जि. रत्नागिरी) येथील गावामध्ये ग्रामसभेच्या विरोधात जाऊन काही लोकांनी धापलेवाडी नाव शासन दप्तरी असताना मधली वाडी म्हणून बोर्ड लावल्यामुळे ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबई आणि कोकण विभागात पटपडताळणीत कोणताही दोष नसताना आणि अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न नसताना शिक्षक भरतीला देण्यात आलेल्या स्थगितीमुळे हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त झाल्या असून विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंके, रामनाथ मोते व डॉ. रणजित पाटील यांनी "राज्यात शासनाने सन 2012मध्ये शाळांची पटपडताळणी करणे, या पटपडताळणीमध्ये विद्यार्थी संख्या कमी असलेल्या शाळांमधील अनेक शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री. शिगम 12:25

मा.उप सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील खरेदी विक्री संघ लिमिटेड, मुरुड या संस्थेने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड यांची परवानगी न घेता अनधिकृतरित्या एच.पी.गॅस गोडावूनचे केलेले बांधकाम " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे पिंपळगाव राजा व घोणेगाव (ता.खामगाव,जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा नदीतून सुरु असलेली अवैधरित्या रेती उपसा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे,ॲड आशिष शेलार, श्रीमती शोभाताई फडणवीस,श्री.चंद्रकांत पाटील यांनी "जुहू येथील मोक्याचा भूखंड अल्पदरात मिळवून त्यावर म्हाडातील उच्च पदस्थांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती सादर करुन जादा चटईक्षेत्र मिळवून "गृहस्वप्न" या गृहनिर्माण सोसायटीचे केलेले बांधकाम निष्कासित करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी "वांद्रे 2005 मध्ये पोलिसांबरोबर उडालेल्या चकमकीत रमेश पवार या गुंडाला पालिसांनी बनावट चकमकीत ठार मारल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबीयांनी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे केल्यामुळे आयोगाने ही तक्रार ग्राहय मानून त्याच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.उप सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी " मालाड मार्वे रोडच्या रस्ता रुंदीकरणासाठी सेंट ॲंथनी चर्चा या हेरिटेज वास्तूची जागा बाधित होत असून ही जागा मिळविण्यासाठी महानगरपालिकेने चर्चला दिलेली नोटीस" विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---------------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ D/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री. शिगम 12:25

**पृ. शी./ मु.शी.** :अटाळी जि.बुलढाणा येथील प्राथमिक आरोग्य केद्रांच्या नवीन इमारतीचे निकृष्ट दर्जाचे झालेले बांधकाम याबाबत श्री पांडुरंग फुंडकर, डॉ.रणजित पाटील, वि. प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( ग्रामविकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगाव तालुक्यातील अटाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र 1999 पासून एका गोदामामध्ये चालत होते. या केंद्रात 23 गावांचा समावेश होतो. या ठिकाणी 5 उप केंद्र आहेत. लोकसंख्येच्या मानाने अटाळी हे गाव फार मोठे आहे. या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र गोदामामध्ये चालत असताना तेथे रुग्णांसाठी कोणत्याही प्रकारच्या सुविधा नव्हत्या. कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया दुसऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात कराव्या लागत होत्या. आता अटाळे गावात प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन इमारत बांधली गेली आहे. त्या इमारतीचे 26 जानेवारी रोजी लोकार्पण झाले. पावसामुळे त्या इमारतीतील 9 खोल्या मोठया प्रमाणात गळत आहेत. हे माझ्या तालुक्यातील गाव आहे. पाऊस सुरु असतानाच मी त्या प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देण्यासाठी गेलो होतो. तेथील डॉक्टरांना भेटलो. त्या इमारतीतील 9 खोल्या आजही गळत आहेत. त्या गाळयांमध्ये कोणत्याही प्रकारचे काम करता येत नाही. त्या केंद्रात शस्त्रक्रिया करण्याचे काम बंद आहे तसेच ओ.पी.डी.सुध्दा बंद आहेत. अशा प्रकारची त्या केंद्राची परिस्थिती आहे. सदरहू इमारत 50 लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आली आहे. एका वर्षातच सदरहू केंद्राची नवीन इमारत मोठया प्रमाणात गळत आहे.

महोदय, त्या केंद्रात 150 ते 200 रुग्ण उपचार घेण्यासाठी ओ.पी.डी.येतात. ते ओ.पी.बंद आहे, शस्त्रक्रिया करणे बंद आहे. अशी परिस्थिती तेथे निर्माण झालेली असताना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, त्या ठिकाणी फक्त ओलावा निर्माण झालेला आहे. त्या ओलाव्याची दुरुस्ती संबंधित कॉन्ट्रक्टरने आता सुरु केलेली आहे. तेथील 9 खोल्या पूर्णपणे गळता आहे. ही गोष्टी मी स्वत: तेथे जाऊन पाहिली आहे. इतक्या निकृष्ट दर्जाचे बांधकाम करुन रुग्णाच्या आरोग्याशी खेळले जात आहे. या नवीन इमारतीच्या बांधकामाला 50 लाख रुपये खर्च केले आहे. सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीचे निकृष्ट काम ज्या कॉन्ट्रॅक्टरने केले आहे, त्याचे विरुध्द काय कारवाई केली जाणार आहे ? आजच्या परिस्थिती तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र बंद आहे. म्हणून तातडीने काम करुन ते केंद्र सुरु करण्याची गरज आहे. त्यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, जवळ जवळ 65 लाख रुपये खर्च करुन नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. कॉन्ट्रॅक्टरला

5...



श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साधारणपणे 30 महिने डिफेक्ट लायबिलिटी पिरियेडमध्ये काही दुरुस्ती असल्यास त्या दुरुस्त्या करुन देण्याची करारात अट टाकण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे सदरहू इमारतीच्या काही खोल्यांमध्ये ओलावा आढळून आला आहे. त्या खोल्यांमध्ये ओलावा असू नये संबंधित कॉन्ट्रक्टरने दुरुस्तीचे काम हाती घेतलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझ्या गावापासून अटाळी हे गाव फक्त 15 कि.मी.अंतरावर आहे. ज्यावेळेला यासंबंधीची माहिती मिळाली, त्यावेळी मी स्वत: त्या इमारतींची पाहणी करण्यासाठी गेलो. त्या इमारतीतीत सर्व 9 खोल्या पूर्णपणे गळत आहेत. माननीय मंत्री महोदय त्या ठिकाणी फक्त ओलावा आलेला आहे अशी माहिती या ठिकाणी देत आहेत. अधिकारी वर्ग खालच्या पातळीवरुन उत्तर पाठवितात, त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदय या ठिकाणी उत्तर देतात. मी स्वत: त्या इमारतींची पाहणी केली असल्यामुळे सदरहू नवीन इमारतीच्या बांधकामाची चौकशी करण्यात येईल काय ?

यानंतर श्री. भोगले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-1....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, निश्चितपणे सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत ती ग्राह्य धरुन चौकशी करु. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु जी वस्तुस्थिती आहे ती सभागृहाला सांगणे माझे कर्तव्य आहे. निश्चितपणे त्या संदर्भात चौकशी केली जाईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्यसाठा चोरीला गेल्याबाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2.....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मे-जून या दोन महिन्यात शासकीय गोदामातील गहू आणि तांदूळ चोरीला गेला होता, ट्रकमधून हा धान्यसाठा बाहेर नेण्यात येऊन तो कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकला गेला असल्याची तक्रार तहसीलदार, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि उप जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आली होती. त्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आले. 11 जून, 2013 रोजी मी स्वत: दूरध्वनी केला होता. 12 जून रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हा धान्यसाठा घेऊन जाणारा ट्रक पकडण्यात आला. पोलीस ठाण्यामध्ये चौकशी केल्यानंतर मालाची तपासणी करु आणि शासकीय वितरण व्यवस्थेतील धान्य साठा आहे का हे ठरवू असे सांगण्यात आले. निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे गोदामपालावर पोलीस ठाणे, मंगरुळपीर येथे गुन्हा दाखल केला आहे. फक्त गोदामपाल या घटनेला जबाबदार नाही. तहसीलदार, उप जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी या सगळ्यांची चौकशी करुन कारवाई करणार आहात काय? 55 लाख रुपयांचा धान्यसाठा एका तालुक्यातून गहाळ झाला. अशा अनेक तक्रारी वाशिम जिल्हयातून आलेल्या आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन कारवाई केली जाईल काय?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, वाशिम जिल्हयात सरकारी गोदामातून 2920 क्विंटल धान्य चोरीला गेले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तेथील गोदामपालाला निलंबित केले असून ईसी ॲक्ट आणि आयपीसी कलमाखाली कारवाई झाली आहे. उचित तपासणी करण्यासाठी 8 कर्मचा-यांचे पथक नेमले होते. त्यात तहसीलदार, उप निरीक्षक, निरीक्षक यांचीही जबाबदारी होती. त्या पथकाने व्यवस्थितपणे गोदामाची तपासणी केली नाही. त्यांच्याविरुध्द चौकशीचे आदेश दिले असून कार्यवाही सुरु आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालयाच्या इमारतीचे आधुनिकीकरण करण्याबाबत सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-3......

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, नागपूर शहरातील 150 वर्षे जूनी शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण झाल्याने तिचे आधुनिकीकरण करण्याचा प्रश्न 1990 पासून प्रलंबित आहे. प्रशासकीय विलंबामुळे या प्रकल्पाची किंमत 13.98 कोटीवरुन 25.21 कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. किती कालावधीत हा प्रकल्प मंजूर होईल?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, येत्या तीन महिन्यात पाठपुरावा करुन प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

-----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करणे

**मु. शी.** : पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे महानगरपालिकेने जून २०१० पासून येथील कचरा डेपोत ओपन डंपिंग बंद झाल्याचे घोषित होऊन आज तीन वर्षे पूर्ण हाऊनसुद्धा ओपन डंपिंग बंद झालेले नसणे, १००० टन कचऱ्यांवर रोजच्या रोज प्रक्रिया केली जाणार असून उघड्यावर कचरा कोठेही साचणार नसल्याचे पालिकेने दिलेले आश्वासन फोल ठरणे, या प्रकल्पात अतिशय अयोग्य पद्धतीने लाखो टन कचऱ्यांची उघड्यावरच साठवणूक होत असल्याने या ठिकाणी समांतर कचरा डेपो तयार होणे, कचऱ्याची जीवघेणी दुर्गंधी व झिरपणारे दुर्गंधीयुक्त काळे पाणी (लिचेट) नैसर्गिक ओढे-नाल्यांना जाऊन मिसळत असल्याने सर्व जलस्त्रोत दूषित होणे, यामुळे या भागात बारमाही भीषण पाणीटंचाई निर्माण होणे, नागरी घनकचरा २००० नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे हंजर कंपनीकडून वेळोवेळी होत असलेले उल्लंघन, हंजर बायोटेक व्यवस्थापनाकडून आरोग्यास धोका ठरणाऱ्या जीवघेण्या कचऱ्यांचा अशास्त्रीय पद्धतीने साठा करून ठेवणे, या प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांचा जीव धोक्यात असून त्यांना कोणतीही सुरक्षा उपकरणे पुरविण्यात आलेली नसणे, पालिका प्रशासनाने तत्काळ ओपन डंपिंग बंद करून हंजर प्रकल्पाची नि:पक्ष चौकशी करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची तेथील ग्रामस्थांनी केलेली मागणी, कोणतीच कारवाई होत नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

...7..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1......

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषयावर वारंवार विधानसभेमध्ये चर्चा झालेली आहे. दिनांक 4.1.2010 रोजी सरकारने जाहीर केले होते की, पुढील दोन तीन वर्षात निर्णय घेण्यात येईल.

नंतर टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ....

सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा माननीय मंत्री महोदय बदलल्यामुळे पुण्याच्या कचऱ्याचे व्यवस्थापन होऊ शकले नाही. या संदर्भात माझे अनेक प्रश्न आहेत परंतु त्यापैकी महत्वाचा प्रश्न असा आहे की, आता शहराच्या नियोजनाच्या विकास आराखडयाचे काम सुरु असून अशा वेळेला विक्रेंद्री पध्दतीने कचऱ्याच्या संदर्भात शासनाकडून कोणती पाऊले उचलली जाणार आहेत ? येथील कचरा डेपो तुळापूरला हलविला जाणार नाही, असे गेल्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्यामुळे तशा पध्दतीच्या सूचना संबंधित ग्रामपंचायतीला दिलेल्या असल्याने हा कचरा डेपो तुळापूरला हलविण्यात येऊ नये, यासाठी स्थानिकांनी विरोध केलेला आहे.

सभापती महोदय, घन कचऱ्याचे पृथ:करण करण्याच्या संदर्भात राज्य स्तरावर शासनाकडून कोणते धोरण स्वीकारण्यात आले आहे ? प्रत्येक ठिकाणी कचऱ्याच्या संदर्भात संघर्ष सुरु आहेत. जलस्त्रोत प्रदूषित झाल्यामुळे स्थानिक ग्रामंपचायतीमध्ये या संदर्भात वारंवार आंदोलने होत आहेत. त्यामुळे तुळापुरचा कचरा डेपो बंद कधी होणार आहे व इतर विकेंद्रित व्यवस्था कशा प्रकारे केली जाणार आहे ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, 1989 मध्ये राज्य शासनाने पुण्याच्या कचऱ्यासाठी जागा दिली होती. आता ज्या ठिकाणी कचरा टाकला जातो, तेथे सन 1991 ते सन 2010 या दरम्यान कचरा टाकला जात होता. सन 2007 मध्ये जी काही आंदोलने झाली त्यानंतर कचरा टाकण्याचे काम बंद झाले आहे. परंतु सन 2005 मध्ये वायुसेनेच्या सूचने प्रमाणे केंद्र शासनाच्या निधीतून एक प्रकल्प उभे करण्याचे काम सुरु झाले. सिलको नावाच्या कंपनीला 500 टनाचे काम देण्यात आले होते. परंतु या कंपनीला हे काम पूर्ण करता आले नाही. त्यामुळे या संदर्भात पुन्हा एकदा निविदा काढून 800 टनाचे काम हंजर कंपनीला देण्यात आले. तत्कालीन आयुक्त श्री. झगडे यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. तसेच जनरल बॉडीच्या बैठकीमध्ये या संदर्भात ठराव मंजूर झाला व तेथे 200 टन कचऱ्याकरिता अतिरिक्त प्रोजेक्ट करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे एकंदर 1000 टन कचऱ्याचे काम हंजर कंपनीला देण्यात आले होते व हा प्रोजेक्ट सन 2010 मध्ये पूर्ण झाला. पुण्याच्या कचऱ्याचे वजन 1500 टनापर्यंत जाते तसेच विविध ठिकाणी 500 टनाचे प्रकल्प उभारुन पुण्यामधील कचरा निर्मूलनाचे काम सुरु करण्यात आले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, कचऱ्याचा विषय हा काही एका शहरापुरताच मर्यादित आहे असे नाही. आता अनेक शहरांमध्ये विकास आराखड्याच्या कामाला सुरुवात झालेली आहे. यामुळे कचऱ्याच्या संदर्भात राज्य शासनाला आताच धोरण ठरवावे लागणार आहे. धोरण न ठरवल्यामुळे प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात आंदोलने होतात व कचरा या ठिकाणी टाकायचा की, त्या ठिकाणी टाकायचा याबाबतीत फार मोठे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे कचऱ्याच्या संदर्भात राज्य शासन काही धोरण आखणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, कचऱ्याच्या संदर्भात योग्य कारवाई करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न सुरु आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुण्याच्या कचऱ्यासाठी पुणे महानगरपालिकेने किंवा राज्य शासनाने काही उपाययोजना केली आहे काय असा प्रश्न विचारला आहे. तुळापूरच्या संदर्भातील निर्णय ग्रामस्थांना, लोकप्रतिनिधींना व संबंधित सर्व यंत्रणांना विचारल्याशिवाय महाराष्ट्र शासन घेणार नाही. परंतु यासंदर्भात पर्यायी जागा असावी, याकरिता महानगरपालिकेने आपल्या विकास आराखड्यामध्ये 9 हेक्टर जागेची तरतूद केलेली आहे. बाणेर, वडगाव खुर्द, आंबेगाव, कोंडवा आणि हडपसर अशा पाच ठिकाणी ही जागा निश्चित करण्यात आली आहे.

सभापती महोदय, ज्या पध्दतीने पुणे महानगरपालिकेने डीपीमध्ये कचऱ्याकरिता जागा ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे तशाच पध्दतीच्या सूचना बाकीच्या महानगरपालिकांना देण्यात येतील, असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, घन कचऱ्याची कशा प्रकारे विल्हेवाट लावावी यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाने नुकताच एक आदेश राज्य सरकारला दिलेला आहे, अशी माझी माहिती आहे. उच्च न्यायालयाने राज्य सरकारला कोणकोणते आदेश, निर्देश दिलेले आहेत ? उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, देवाची उरळी, फुरसुंगी येथील पाणी पुरवठा योजनेसाठी 76 कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. खरे म्हणजे या गावामध्ये पुणे महानगरपालिकेचा कचरा अनेक वर्षापासून टाकला जात आहे. या कचऱ्यामुळे तेथील ग्रामस्थांचे जीवन असहाय्य झालेले आहे. या कचऱ्याच्या संदर्भात अनेक आंदोलने झाली, अनेकदा नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागले. पुणे शहरातील लोकांसाठी उरळी व फुरसुंगी येथील नागरिकांनी त्रास सहन केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी...

त्यावेळी पुणे महानगरपालिकेने आश्वासन दिले होते. येथील ग्रामस्थांच्या पाण्याच्या व आरोग्याच्या प्रश्नांसंबंधी शासन खास प्रयत्न करणार आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांना शासनाच्या वतीने सांगितले होते. 76 कोटी रूपयाचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे असे उत्तरात नमूद करण्यात आला आहे. या प्रस्तावाला 3 महिन्याच्या आत मंजुरी देऊन शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, दोन गावांसंबंधी महाराष्ट्र शासनाने काय केले आहे यासंबंधी प्रश्न विचारला आहे. मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, 38 ते 40 कोटी रुपयांची विकासाची कामे म्हणजे रस्त्यांची, बांधकामाची कामे या दोन्ही गावांमध्ये सुरू आहेत. 76 कोटी 31 लाख 52 हजार रूपयांची नळ पाणी पुरवठा योजना आहे. यासंबंधीचा आराखडा जीवन प्राधिकरणाकडे तयार आहे. यातील दहा टक्के रक्कम महानगरपालिकेने भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यातील 3 कोटी 75 लाख रूपये दिलेले आहेत. उर्वरित रक्कम देखील महानगरपालिकेकडून जीवन प्राधिकरणाला देण्यात येणार आहे. तीन महिन्याच्या आत पाण्याचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जी काही कागदपत्रे लागतील त्याची पूर्तता केली जाईल व काम सुरू करण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न केले जातील. उच्च न्यायालयाने निकाल दिलेलाच आहे. तसेच, 2006 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देखील डंपिंग ग्राऊंड कसे असावे यासबंधी एक निकाल दिलेला आहे. त्यात कचऱ्याची कशा प्रकारे विल्हेवाट लावावी हे नमूद केलेले आहे. कचऱ्यापासून माशा होणार नाहीत, दुर्गंधी होणार नाही यांसंबंधीच्या सूचना देखील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत. सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाचा मान राखून नगरपालिका आणि महानगरपालिकांना सूचना दिल्या जातील.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, नीट कॅपींग आणि प्रोसेसिंग न केल्यामुळे माशा आणि दुर्गंधी तसेच लिचिड ट्रीटमेंट न केल्यामुळे वेगवेगळ्या जलस्रोतामध्ये पाण्याचे कंटेम्पनेशन या दोन गोष्टी झाल्यामुळे माझा पहिला स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एमपीसीबीने पुणे महानगरपलिकेला जून 2011 वॉटर (प्रीव्हेंशन ॲन्ड कंट्रोल ऑफ पोल्यूशन) ॲक्ट आणि एन्व्हॉयर्मेन्टल प्रोटेक्शन ॲक्ट आणि एम.एस.डब्ल्यू. 2000 अनुसार प्रॉसिक्यूशनची नोटीस दिली

ॲड.आशिष शेलार....

होती काय आणि त्यावर कोणती कारवाई करण्यात आली ? ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये देखील हंजर या कंपनीने काम करण्याचा प्रस्ताव दिला होता. हंजर कंपनीने नीट काम केले नाही त्यामुळे ठाणे महानगरपालिकेने हंजर कंपनीला डिस्क्वालिफाय केले आहे. हंजर संबंधी पुण्यामध्ये देखील हिच प्रतिक्रिया आहे. त्यामुळे हंजरचा पास्ट रेकॉर्ड बघता राज्य सरकार हंजरची एसआयटी मार्फत चौकशी करणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, ठाण्यात देखील हंजर कंपनीला काम देण्यात आले होते. परंतु, ठाण्यातील निगोसिएशनचे विषय वेगळे होते. हंजर कंपनीला पुण्यातील काम देण्यात आले होते. सुरूवातीला हंजर कंपनीला पुण्याचे 300 टनाचे काम देण्यात आले होते. त्यानंतर शेल्फोक कंपनीला काम देण्यात आले होते. शल्फोक या कंपनीने काम न केल्यामुळे केंद्र शासनाने पुन्हा एकदा 500 टनाचे टेंडर काढले. ते काम हंजर कंपनीला अलॉट झालेले आहे. नंतर जी.बी.ने ठराव करून 200 टनाचे काम देखील हंजर कंपनीला दिलेले आहे. पुण्याच्या कचऱ्या संदर्भातील काम हंजर कंपनीने सन 2010 मध्ये पूर्ण केलेले आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी एमपीसीबी संबंधातील प्रश्न विचारला आहे. ती वस्तुस्थिती खरी आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिका कारवाई करीत आहे.

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधातील ही लक्षवेधी सूचना आहे. आताच सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितलेली बाब खरी आहे. हंजर या कंपनीला हे काम देण्यात आले आहे. तेवढे काम करण्याची क्षमता हंजर कंपनीची नाही. तरी सुद्धा त्यांना काम करण्यास दिलेले आहे. या कंपनीची काम करण्याची पद्धत अत्यंत चुकीची आहे. येथील नागरिकांच्या फार मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहेत. येथील जमीन खणल्यानंतर आरोग्याला घातक अशा प्रकारचे घाणेरडे पाणी वर येते. असे वाईट वातावरण येथे आहे. हंजर कंपनी येथे काम करीत आहे. या कंपनीवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? या कंपनीची काम करण्याची क्षमताच नाही. त्यामुळे यासंबंधी शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती तपासून पाहण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, हा प्रश्न फक्त नगरपालिका आणि महानगरपालिकांपुरता मर्यादित नाही. "अ" वर्ग ग्रामपंचायतीमध्ये देखील हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये झपाट्याने नागरिकरण वाढत असल्यामुळे कचऱ्यारी विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा पुढील वीस वर्षाचे नियोजन करुन डंपिंग ग्राऊंडची जागा निश्चित करण्याचे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेने डी.पी.प्लानमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी काही तरतूद केलेली आहे. तशा प्रकारची तरतूद करण्याच्या सूचना "क"वर्ग नगरपालिकांपासून महानगरपालिकांपर्यंत देण्यात येतील.

श्री.मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा सर्वात मोठा महत्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रामध्ये दररोज वीस हजार टन कचरा निर्माण होतो. कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे काही नियम आहेत. या नियमांप्रमाणे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिका बीओटी तत्त्वावर किंवा पीपीपीवर काम देण्यासाठी निविदा काढते. परंतु राज्यामध्ये अशाप्रकारचे काम करणाऱ्या कंपन्यांची संख्या खूप कमी आहे. हंजर सारखी कंपनी मीरा-भाईंदर, ठाणे, पुणे महानगरपालिकेतील कामांचा ठेका घेते. परंतु या संदर्भातील अनुभव असा आहे की, दोन-तीन वर्षे नियमाप्रमाणे काम केले जाते. परंतु त्यानंतर नियमाप्रमाणे कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे त्याप्रमाणे काम केले जात नाही म्हणून महानगरपालिका किंवा गावाच्या हद्दीतील लोकांच्या तक्रारी येतात. तेव्हा हंजर कंपनीने नियमाप्रमाणे काम केले किंवा कसे याची तपासणी करण्यात येईल काय, नसल्यास त्या कंपनीवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी सर्वप्रथम सांगू इच्छितो की, पुणे महानगरपालिका आणि राज्य शासनामार्फत हंजर कंपनीला काम देण्यात आलेले नाही. हंजर कंपनीला केंद्र सरकारमार्फत काम देण्यात आले आहे. हंजर कंपनीला केंद्र शासनाकडून पैसे देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हंजर कंपनीची माहिती मागावून घेण्यात येईल.

तसेच हंजर कंपनीने माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे काम केले किंवा कसे हे तपासून पाहण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी क्रमांक दोन संदर्भात</u>**

**उप सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी क्रमांक -2 ही सन्माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे यांची आहे. सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. ही लक्षवेधी पुढे घेण्यात येईल.

------

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबइतील शासकीय व पालिका रुग्णालयातील निवासी डॉक्टराना कामाच्या वेळेपेक्षा अधिक वेळ काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर होत असलेला विपरित परिणाम

**मु. शी.** : मुंबइतील शासकीय व पालिका रुग्णालयातील निवासी डॉक्टराना कामाच्या वेळेपेक्षा अधिक वेळ काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर होत असलेला विपरित परिणाम या संबंधी श्रीमती अलका देसाई, सर्वश्री भाई जगताप, विनायक राऊत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबई येथील शासकीय व पालिका रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना कामाच्या वेळेपेक्षा अधिक काळ काम करावे लागत असणे, थोडीसुध्दा विश्रांती मिळत नसणे त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येणे, निवासी डॉक्टरांकरिता राहण्यासाठी केवळ 10 बाय 10 ची खोली देण्यात येऊन त्या खोलीत चार निवासी डॉक्टरांना रहावे लागत असणे, नुकतेच सायन हॉस्पिटलमधील 23 वर्षीय वयाच्या डॉ.समिधा खंदारे यांना टि.बी.ची लागण होऊन त्यांचे निधन होणे, यामुळे निवासी डॉक्टरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबईतील शासकीय आणि पालिका रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना कामाच्या वेळेपेक्षा अधिक तास काम करावे लागत आहे. तसेच दहा बाय दहाच्या खोलीत चार-चार डॉक्टर्स राहत आहेत. निवासी डॉक्टर्स यांच्यावर कामाचा पडणारा अतिरिक्त ताण आणि राहण्याची चांगली व्यवस्था नसल्यामुळे डॉ.समिधा खंदारे या डॉक्टराला टी.बी.ची लागण होऊन त्यांचे निधन झाले आहे.

सभापती महोदय, निवेदनातील शेवटचा परिच्छेद वाचल्यावर मला हसू आले. शेवटच्या परिच्छेदात नमूद केले आहे की, " रुग्णांच्या वाढत्या संख्येंमुळे निवासी डॉक्टरांवर कामाचा ताण येत असला तरी तो कमी करण्यासाठी योगा प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, तणाव मुक्ती शिबिरे आयोजित करणे, करमणुकीची साधने उपलब्ध करुन देणे इत्यादी उपाययोजना करण्यात येतात. तसेच सर्व निवासी डॉक्टरांची त्यांच्या नेमणुकीनंतर दर तीन महिन्यांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्याची योजना सुध्दा सुरु करण्यात आली आहे."

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

या निमित्ताने माझा प्रश्न आहे की, ही योजना कधी सुरु केली ?

डॉ.समिधा खंदारे या लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत होत्या. ज्या ठिकाणी त्या शिकत होत्या त्याच रुग्णालयात त्यांच्यावर उपचार का करण्यात आले नाही, त्या रुग्णालयात त्यांच्यावर उपचार झाले नसतील तर मुंबई महापालिकेच्या कर्तृत्वाला ही बाब भूषणावह आहे काय, डॉ.समिधा खंदारे यांना त्याच रुग्णालयात वैद्यकीय मदत का मिळाली नाही याची चौकशी करणार काय ? सायन, के.ई.एम. आणि नायर रुग्णालयात दररोज 20 हजार रुग्ण आपली तपासणी करुन जातात. परंतु निवासी वैद्यकीय अधिकारी आणि शिकाऊ डॉक्टर सोडले तर त्या रुग्णांना कोणी बघत नाही. ऑनररी डॉक्टर रुग्णालयात 1-2 तास येतात आणि निघून जातात. निष्ठेने काम करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे हे मला माहीत आहे. मी विचारु इच्छिते की, रुग्णांची संख्या वाढत असताना सुध्दा त्यांची तपासणी करण्यासाठी पुरेसे डॉक्टर का नेमले जात नाहीत ? आज मुंबई शहरामध्ये अस्वच्छ पाण्यामुळे, साथीमुळे निरनिराळे रोग थैमान घालत आहेत. टी.बी.सारखा आजार उपचारांती बरा होतो. अस्वच्छतेमुळे अनेकदा झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या किंवा चाळींमध्ये राहणाऱ्या लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. मुंबई शहरात उघड्यावर साचलेल्या कचऱ्यातून सुध्दा मोठ्या प्रमाणावर आजार होतात. या निमित्ताने मी स्पेसिफिक शेवटचा प्रश्न विचारते की, या सर्व बाबींवर राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांना सांगू इच्छितो की, डॉ.समिधा खंदारे ही विद्यार्थीनी इंटर्नशिप करीत होती. ती आजारी पडल्यानंतर तिला महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयामध्ये दिनांक 13 जानेवारी रोजी आय.सी.सी.यु.मध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर 13 फेब्रुवारीमध्ये तिच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यामुळे तिने सुट्टी घेतली. त्यानंतर सुध्दा तिला बरे वाटत नव्हते म्हणून ती साधारणत: 15 दिवसानंतर हिंदुजा रुग्णालयात दाखल झाली. डॉ.समिधा खंदारे हिला रक्त वाहिनीचा टी.बी. झाला होता. त्यातून तिला अपंगत्व आले आणि नंतर ती मृत्युमुखी पडली. वैद्यकीय शिक्षण घेणारा विद्यार्थी ॲडमिट झाला असल्यास त्याच्याकडून केवळ सर्टिफिकेट घेत होतो. ते सर्टिफिकेट सोडले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित.....

तर त्यांच्या तपासण्या करीत नव्हतो. कारण पूर्वी तशी प्रथा नव्हती. परंतु मागील तीन-चार महिन्यांत असे प्रकार घडत असल्यामुळे निवासी डॉक्टरांची दर तीन महिन्यांतून एकदा तपासणी करावी असा निर्णय घेतला आहे. सेन्सेटीव्ह प्रकरणाच्या बाबतीत दरमहा तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेच्या मेडीकल कॉलेजच्या नॉर्म्सप्रमाणे प्राध्यापक आणि इतर कर्मचारी काम करीत असतात. मेडीकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या नॉर्म्सप्रमाणे ऑनररी वा कायमस्वरुपी डॉक्टर असतात.

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित .....

डॉक्टर्स कमी होते हा प्रश्न नाही. जर कमी झाले तर मेडिकल कॉलेजेस बंद पडतील.

आता असे केले आहे की, 2009-2010 पासून प्रोफेसरला 2 विद्यार्थ्यांना पीजी देण्याचे एमसीआयने मान्य केल्यामुळे आता रेसीडेन्स डॉक्टर्स सुध्दा वाढलेले आहेत. आता ज्यांची परमनंट 9 वर्षे सर्व्हीस झालेली आहे त्यांनी सुध्दा दोन विद्यार्थ्यांना पीजी देण्याचा निर्णय झाला असल्यामुळे डॉक्टरांची संख्या कमी होण्यापेक्षा त्यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्या डॉक्टर्स कमी झाले असे जे म्हणत आहेत तशी परिस्थिती नाही. याउपर जे विद्यार्थी आहेत, जे निवासी डॉक्टर्स आहेत त्यांचा विमा काढला पाहिजे जेणेकरुन सर्व ट्रिटमेंट होईल, त्यांना त्रास होणार नाही, अशा पध्दतीची व्यवस्था करण्याचे धोरण आपण स्वीकारले होते परंतु विमा कंपन्या पुढे येत नाहीत. विमा कंपन्या विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त एक ते दीड लाख रुपयांपर्यंतचाच विमा काढतात. त्यामुळे शासन आता असा निर्णय घेत आहे की, शासनाने एक कॉर्पस फंड तयार करुन द्यावयाचा आणि जे विद्यार्थी दुदैवाने आजारी पडतील त्यांना शासकीय मेडिकल कॉलेजेस आणि महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये ज्या ठिकाणी फॅसिलिटी आहे त्या ठिकाणी प्रथम ट्रिटमेंट द्यावी आणि जर या ठिकाणी ती फॅसिलिटी नसेल तर बाहेर प्रायव्हेटमध्ये ज्या ठिकाणी ती फॅसिलिटी असेल तेथे त्यांना पाठविण्यात येईल आणि जे काही पैसे लागतील ते त्यांना कॉर्पस फंडातून उपलब्ध करुन देऊ.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, डॉ. समिधा खंदारे या मुलीचा मृत्यू झाल्यानंतर हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे 28 ते 40 डॉक्टरांना टी.बी. झालेला आहे. म्हणजे टी.बी. झालेल्या डॉक्टरांची संख्या 28 ते 40 च्या दरम्यान आहे हे खरे आहे का ? हे डॉक्टर्स सारखे पेशन्टच्या संपर्कात असतात आणि कोणत्या पेशन्टला टी.बी.आहे हे माहीत नसते. त्यामुळे त्यांना टी.बी. होतो हे प्रोफेशनल हजार्ड आहे. या डॉक्टर्सना ब्रेकफास्टसाठी फक्त 10 रुपये दिले जातात. ते वाढवून त्यांना कमीतकमी 50 रुपये ब्रेकफास्टसाठी देणार का ? सकाळच्या ब्रेकफास्टसाठी डॉक्टरांना 10 रुपये दिले जातात. 10 रुपये ही अत्यल्प रक्कम आहे. 10 रुपयांमध्ये काहीही मिळत नाही. ती रक्कम कमीतकमी 50 रुपये करणार का ? त्यांच्या ज्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

राहण्याच्या जागा आहेत त्या ठिकाणी व्हेंटीलेशन अतिशय कमी आहे. त्या ठिकाणी अजिबात व्हेंटीलेशन नाही. त्यामुळे फार झपाट्याने संसर्ग होतो. त्यामुळे त्यांच्या होस्टेलच्या रुम्स व्हेंटीलेटेड करणार का ? त्या ठिकाणी पुरेसा प्रकाश असेल, पुरेशी हवा असेल अशा रुम्स करणार का ? आपण सांगितले की, डॉक्टरांचे स्क्रिनिंग घेणार, इन्टर्नची तपासणी करणार. परंतु ज्यावेळी मेडिकल स्टुडंट सायन हॉस्पिटलमध्ये किंवा केईएम हॉस्पिटलमध्ये प्रवेश घेतो तेव्हाच त्याच्या ॲडमिशनच्या वेळी त्याला सकृतदर्शनी कोणकोणते आजार आहेत याची तपासणी केली जाणार का ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ज्यावेळी पहिल्यांदा आपण विद्यार्थ्यांना मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन देतो त्याचवेळी त्यांचे मेडिकल सर्टिफिकेट मागत असतो आणि ते मेडिकल सर्टिफिकेट आणून देतात. असे जरी असले तरी जे विद्यार्थी मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतील,मग ते युजी असेल किंवा पीजी असेल, त्या सर्वांची तपासणी केली जाईल. त्यांच्यामध्ये जी सेन्सीटी असेल त्या पध्दतीने त्यांना त्या त्या भागामध्ये पोस्टींग देऊन ट्रिटमेंट देण्याचे काम निश्चितपणे केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, जे विद्यार्थी होस्टेलमध्ये राहतात त्या ठिकाणी मी सांगितल्याप्रमाणे एका प्राध्यापकामागे दोन आणि ज्यांची सर्व्हीस 9 वर्षे झालेली आहे त्यांना दोन डॉक्टर्स घेता येतात त्यामुळे या मधल्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात रेसीडेन्ट डॉक्टर्स वाढल्यामुळे आपल्याला खोल्या कमी पडत आहेत. तरी सुध्दा शासन असेल किंवा महापालिका असेल यांनी मोठ्या प्रमाणावर होस्टेलचे बांधकाम करण्याचा कार्यक्रम आखलेला आहे. त्यामुळे या पुढच्या काळामध्ये निश्चितपणे जी नवीन होस्टेल्स बांधली जातील ती चांगल्या पध्दतीने व्हेंटीलेटेड असतील अशा पध्दतीची बांधण्यात येतील. सध्या जे दोन किंवा तीन डॉक्टर्स एका खोलीमध्ये ठेवावे लागतात, ज्युनिअर रेसिडेंट असतील किंवा सिनिअर रेसिडेंट असतील त्यांच्या बाबतीत एका रुम दोघांना देतो. जीआर थ्री आणि जीआर टू यांना सिंगल रुम कशी देता येईल या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 13:00

डॉ.विजयकुमार गावित.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 28 ते 40 रेसिडेन्टस् डॉक्टर्स किंवा मेडिकल ऑफिसर्सना टी.बी.झालेला आहे. परंतु 18 ते 19 डॉक्टर्सना टी.बी.झालेला आहे हे खरे आहे. त्यामुळे त्यांना ट्रिटमेण्ट उपलब्ध करुन दिली जात आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ब्रेकफास्टसाठी 10 रुपये देण्याची सुविधा उपलब्ध नाही. परंतु महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात ब्रेकफास्टसाठी ही रक्कम दिली जाते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्यामुळे याबाबत महानगरपालिकेच्या प्रमुखांशी बोलून या रकमेमध्ये किती वाढ करता येईल यादृष्टीने निश्चित प्रयत्न केले जातील.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाचे चांगले उत्तर दिलेले आहे. परंतु या निवेदनातील उत्तर पाहिले तर अधिकाऱ्यांनी तयार केलेले असत्य उत्तराचे उदाहरण यापेक्षा दुसरे असू शकत नाही. मी स्वत: त्या वसतिगृहाला भेट दिलेली आहे. निवासी डॉक्टर्स ज्या ज्यावेळी संपावर जातात त्या त्यावेळी सर्व पक्षातील आमदार वसतिगृहांना भेटी देत असतात. या निवेदनात 'करमणुकीची साधने' असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्या डॉक्टर्सना करमणुकीची साधने नाही पण निदान जगण्याची साधने तरी देण्यात यावी असे हे उत्तर तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्री महोदयांनी सांगावे.

त्या वसतिगृहामध्ये डॉक्टर्सना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळत नाही, शुध्द हवा मिळत नाही, चांगला आहार मिळत नाही. त्या डॉक्टर्ससाठी शिबिरे आयोजित करणार, करमणुकीची साधने देणार, डॉक्टरांना तणाव मुक्त करणार अशा प्रकारचे उत्तर तयार केले जाते. रुग्णालयात आलेल्या पेशंटस्‌ना डॉक्टर्स स्वच्छता राखण्यासाठी मार्गदर्शन करतात. त्याच डॉक्टर्सच्या वसतिगृहात चांगला माणूस गेला तर रोगी होऊन बाहेर पडेल अशी परिस्थिती आहे. ज्यांनी हे असत्य उत्तर तयार केले आहे त्यांना त्या वसतिगृहामध्ये पाठविले जाणार आहे काय,. या देशातून ब्रिटिश जाऊन किती वर्षे झाली आहेत ते सांगता येणार नाही. ब्रिटिश काळातील खाटा आजही बदललेल्या नाहीत. महाराष्ट्रातील लोकांच्या स्वास्थ्याबाबत डॉक्टर्सबाबत चर्चा केली जाते. त्यांचे राहणीमान इतके निकृष्ट दर्जाचे असावे. असत्य उत्तर तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? निवासी डॉक्टर्सच्या वसतिगृहामध्ये चांगली हवा, चांगला आहार, शुध्द पाणी मिळण्याची सभागृहात शाश्वती दिली जाईल काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, निवासी डॉक्टर्सच्या हॉस्टेलमध्ये शुध्द पिण्याचे पाणी मिळेल, शुध्द हवा राहील, याची निश्चितपणे काळजी घेतली जाईल. मी स्वत: अनेक वसतिगृहांना भेट दिलेली आहे. त्यामुळे त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. निवासी डॉक्टर्सची संख्या वाढत असल्यामुळे डॉक्टर्सची राहण्याची थोडीशी अडचण होत आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याचे काम चालू आहे. ब्रिटिश काळातील पलंग चांगले असतील तर ते वापरण्यास हरकत नाही. पण खराब झाले असतील तर त्याऐवजी नवीन पलंग देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, डॉ.समिधा खंदारे यांचे टी.बी.मुळे निधन झालेले आहे. काम करीत असताना इन्फेक्शन झाल्यामुळे त्यांना टी.बी.झाला होता का, सायन रुग्णालयात इन्फेक्शन कंट्रोल कमिटी आहे काय, असल्यास या कमिटीद्वारे दर आठवड्यात, पंधरा दिवसात, एक महिन्यामध्ये आढावा घेतला जातो. त्याद्वारे पुढे कोणती कारवाई केली जाते ?

डॉ.विजयकुमार गावित : डॉ.समिधा खंदारे ह्या विद्यार्थीनी होत्या. त्यामुळे काम करीत असताना त्यांना टी.बी.झालेला नव्हता. कदाचित त्यांना त्यापूर्वी टी.बी.झालेला असावा, याबाबत बोलणे उचित नाही. त्या शिकत असताना त्यांना टी.बी.झालेला आहे. सायन रुग्णालयात इन्फेक्शन कंट्रोल कमिटी आहे किंवा नाही याबाबतची माहिती घेऊन मी पटलावर ठेवीन.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन : शासकीय रुग्णालयामध्ये हजारोंच्या संख्येने रुग्ण येत असतात. त्या ठिकाणी शासनाची इन्फेक्शन कंट्रोल समिती आहे की नाही याची माहिती माननीय मंत्री महोदयांना नसणे ही बाब अतिशय गंभीर आहे. या बाबतची माहिती मंत्री महोदयांनी पटलावर ठेवावी.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : एका डॉक्टर मुलीचा टी.बी.मुळे मृत्यू होणे ही बाब अतिशय गंभीर आहे. सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण हे विभाग पूर्वी एकत्र होते. त्यामुळे दोन्ही विभागांना पुरेसा निधी मिळत होता. परंतु आता शासकीय रुग्णालयांना, महापालिकेच्या रुग्णालयांना पुरेसा निधी उपलब्ध होत नाही असे चर्चेअंती दिसून आलेले आहे. या रुग्णालयातील क्वार्टर्स मोडकळीस आलेल्या आहेत. जे.जे. हॉस्पिटलच्या डीनला देखील बंगला नाही तर अन्य डॉक्टरांच्या सोयीसुविधेबाबत न बोलणेच बरे अशी परिस्थिती आहे. निवासी डॉक्टर्स 15-20 तास काम करीत असतात. त्यांना आपण पुरेसा पगार देत नाही, मार्डला वारंवार संप करावा लागतो. क्वॉर्टर्स अशा आहेत की तेथे चांगले वातावरण नाही. कर्मचारी देखील भरले जात नाहीत. तेव्हा या निवासी डॉक्टरांना योग्य त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी काय तजवीज करण्यात येणार आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना योग्य त्या सुविधा दिल्या जात नाहीत. त्यांना सुविधा देण्याचा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत. शासनाच्या आर्थिक परिस्थिती नुसार ज्या सुधारणा करण्याची गरज आहे त्या शासन निश्चितपणे करीत आहे. निवासस्थाने मोडकळीस आलेली आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आम्ही निवासस्थानांसाठी नवीन बांधकाम सुरु करीत आहोत. काही प्रपोझही केलेली आहेत. त्यामुळे असुविधा होणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत. निवासी डॉक्टरांची संख्या वाढत असल्यामुळे नवीन होस्टेल प्रस्तावित करीत आहोत. दोन-तीन वर्षाच्या काळात रेसिडेण्ट पोस्टग्रज्युएटची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. रेसिडेन्स हॉस्टेल बांधण्यासाठी थोडा वेळ लागेल. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी इन्फेक्शन कंट्रोल समिती बाबत विचारणा केली होती. अशी इन्फेक्शन कंट्रोल समिती असून दर 15 दिवसांनी रिव्ह्यू घेतला जातो. आपल्याकडे एअरबोर्न डिसिजचे एक्स्पर्ट उपलब्ध आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी या लक्षवेधी सूचनेवरील सन्माननीय सदस्यांचे प्रश्न आणि मंत्री महोदयांची उत्तरे काळजीपूर्वक ऐकलेली आहेत. या प्रश्नाचे स्वरुप अत्यंत गंभीर आहे. या संदर्भात मी असे सुचवू इच्छितो की, माननीय मंत्री महोदय, मी आणि प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य आपण सर्वांनी येत्या 8-15 दिवसामध्ये या हॉस्पिटलला भेट देऊन पाहणी करु आणि काय उपाययोजना करता येतील यासंबंधी निर्णय घेऊ. माननीय मंत्री महोदयांनी भेटीची तारीख व वेळ आम्हाला कळवावी. ही भेट अधिवेशनाच्या दरम्यान की अधिवेशन संपल्यानंतर करायची हे माननीय मंत्री महोदयांनी ठरवावे.

डॉ. विजयकुमार गावित : उप सभापती महोदय, आपण तारीख ठरवावी, त्याप्रमाणे आपण भेट देऊ.

**---**

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील मालाड येथील स्पेंसर स्टोअर्स आणि इनॉर्बिट मॉलमध्ये काम करणा-या माथाडी कामगारांना मजुरी न मिळणे

**मु. शी.** : मुंबईतील मालाड येथील स्पेंसर टोअर्स आणि इनॉर्बिट मॉलमध्ये काम करणा-या माथाडी कामगारांना मजुरी न मिळणे यासंबंधी श्री. नरेंद्र पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील मालाड येथील स्पेंसर स्टोअर्स आणि इनॉर्बिट मॉल याठिकाणी ग्रोसरी बोर्डातील नोंदीत माथाडी कामगार तात्पुरते काम करीत असून उक्त कंपन्यांनी माथाडी कामगारांची कामाची मजूरी वसई येथील माथाडी बोर्डाच्या कार्यालयात धनादेशाद्वारे जमा केली असणे, तथापि, सदर कामगारांना केलेल्या कामाची मजूरी अद्यापही न मिळणे, एकूण २४,७०० रुपये ची ही मजूरीची रक्कम ग्रोसरी बोर्डाकडे थकीत राहणे, परिणामी सदर माथाडी कामगारांवर आलेली उपासमारीची पाळी, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील : मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर मॉल संस्कृती वाढत चालली आहे. या मॉल संस्कृतीद्वारे उच्चवर्गीय लोकांना ब्रॅण्डेड स्टोअर्स उपलब्ध होऊन तेथे फार मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असते. या मॉलमध्ये काम करणा-या कामगारांच्या संदर्भात आणि विशेषत: माथाडी कामगारांच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना दिलेली आहे.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

मालाड येथील स्पेंसर स्टोअर्स् आणि इनॉर्बिट मॉलमध्ये अथवा विविध मॉलमध्ये काम करणाऱ्या माथाडींची माथाडी कामगार मंडळात नोंद होते आणि कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता मालक वर्गाकडून अचानकपणे तेथील माथाडी कामगारांना कामावरुन काढून टाकले जाते. ते मालक दुसरे कामगार टोळी क्रमांक 1070 हे बेकायदेशीरपणे त्या ठिकाणी कामावर ठेवतात. या मॉलमध्ये अन्नधान्य, भाजीपाला, कपडे इत्यादी वेगवेगळया प्रकारचा व्यवसाय होतो. मुंबई,उपनगरे,ठाणे,नवीन मुंबई या ठिकाणी मोठया प्रमाणात मॉल कार्यरत आहेत. त्या मॉलमधील कामगारांसाठी हितासाठी शंभर टक्के माथाडी कायदा लागू झाला आहे काय? काही ठिकाणी कामागार नेते जातात, माथाडी कामगारांचे दर ठवितात, काही ठिकाणी अंगावर मजुरीचे दर ठरविले जातात, काही ठिकाणी पगारावर मजुरीचे दर ठरविले जातात, यामध्ये मोठ्या प्रमाणात कामगारांचे शोषण होते. मॉलमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांसाठी कामगार विभागाने मजुरीचे दर निश्चित केलेले आहेत काय, ?

महोदय,स्पेन्सर स्टोअर्स आणि इनॉर्बिट मॉलच्या मालकांनी तेथील जुन्या माथाडी कामगाराच्या टोळीला कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता कामावरुन कमी केले. 15 ते 20 तेथील कामगारांना कामापासून वंचित ठेवले. जेवढे दिवस पूर्वीचे कामगार कामावरुन बाहेर होते, त्यावेळेला त्या ठिकाणी एक दुसरी टोळी कामावर कार्यरत होती. त्या कामगारांना ठेवण्याचे अधिकार कोणी दिले आणि त्या कामगारांच्या मुजरीचे पैसे त्यांना मिळाले काय? मॉलमधील बरीच दुकाने माथाडी बोर्डामध्ये नोंदीत होत नाहीत, काही कॉन्ट्रॅक्टर माथाडी कामगार बोर्डात नोंदीत होतात आणि त्या कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून खऱ्या कामगारांना मिळणारी मजुरी मिळत नसते. कामगार कायद्याप्रमाणे मॉल मधील सर्व दुकानांना माथाडी कामगार बोर्डामध्ये नोंदीत केले जाईल काय आणि ते कधीपर्यंत करणार ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, स्पेन्सर स्टोअर्स आणि इनॉर्बिटमध्ये दि ग्रेट होलसेल क्लबचे स्टोअर आहे. यामध्ये टोळी क्रमांक 521 ही त्या ठिकाणी 2006 पासून कार्यरत होती. परंतु 2012 मध्ये सदर मंडळाने त्यांना काम करण्यास नाकारले. त्यावेळी टोळी क्रमांक 1070 ने तेथे बेकायदेशीपणे काम करण्यास सुरुवात केली. या बाबतीत माथाडी कामगार मंडळाने हस्तक्षेप केला आणि पुन्हा त्यांना काम मिळवून देण्यात यशस्वी झाले. सन्माननीय सदस्यांनी टोळी क्रमांक

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

1070 च्या बाबतीत प्रश्न विचारला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, सदरहू टोळी बेकायदेशीर होती, त्या टोळीने तेथे दादागिरीने प्रवेश केला होता. त्यांना कामगार मंडळाने रोखलेले आहे. त्यांचा जो पगार आहे, तो आस्थापनेकडून नियतवाटप केला नसल्याने त्यांचा पगाराचा धनादेश मंडळाच्या खात्यावर जमा झालेला आहे. त्या ठिकाणी आता काम व्यवस्थितपणे सुरु आहे. मॉल मधील दुकाने कामगार बोर्डात नोंदीत होत नाहीत, त्या गोष्टीस वेग येण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांना आणि यामध्ये काम करणाऱ्या सगळया प्रतिनिधी, विभागाचे अधिकारी यांच्या बरोबर संपूर्ण मॉलच्या संदर्भात एक बैठक घेण्यात येईल व मॉलमधील सर्व दुकाने नोंदीत करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी एका दुर्लक्षित प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, या बाबतीत एक बैठक आयोजित करुन या मॉलमध्ये काम करणाऱ्या सर्व संबंधित संघटनांच्या प्रतिनिधींना बोलाविण्यात येईल. घर कामगारांच्या संदर्भात विभागाने पुढाकार घेऊन शासनाने काही ठोस पाऊले उचलली आहे. बांधकाम व्यवसायिकांमधील कामगारांच्या बाबतीत पाऊले उचलली आहेत. यासाठीचा निधी अखर्चित राहिलेला आहे असे माननीय मंत्री महोदयांनी स्वत: सभागृहात सांगितले आहे. मुंबई प्रमाणेच पुणे, नाशिक तसेच विविध मोठया शहरातील मॉलमधील कामगारांचे प्रश्न आहे. तेथीलही कामगार संघटनाच्या प्रतिनिधींचा बैठकीत समावेश करण्यात येईल काय, तसेच आम्हाला देखील या बैठकीस बोलाविण्यात येईल काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तसे आम्हाला पत्र दिले तर बैठक लावण्यात येईल आणि संबंधितांना बैठकीला बोलावले जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मॉलचे मालक बोर्डाकडे रजिस्टर होतात त्यावेळी त्यांच्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे सुध्दा रजिस्टर होतात. मंत्री महोदयांनी सांगितले की, धनादेश मंडळाकडे जमा केला आहे. ही धनादेशाची रक्कम 1070 टोळीतील कोणत्या कामगारांना वाटप करायची आहे? कोणत्या कामगारांना रक्कम द्यायची या संदर्भात कामगार संघटनेकडे का विचारणा केली जात आहे? मालक रजिस्टर झालेले असतील तर त्यांच्या कामगारांची नावे सुध्दा रजिस्टर झालेले असतील, आपल्या रेकॉर्डमध्ये काही तफावत आहे का? नसेल तर त्या कामगारांना रक्कम वाटप केली पाहिजे. त्याप्रमाणे रक्कम केव्हा वाटप केली जाईल?

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशी सांगितले की, काही लोक अनधिकृतपणे काम करीत होते. त्यांच्या पगाराची ती रक्कम आहे. ती अनधिकृत टोळी असल्यामुळे त्यांना वाटप करणे शक्य नाही. त्यामुळे ज्यांनी काम केले आणि ज्यांना पगार मिळाला नाही त्यांची मी स्वत: बैठक घेऊन त्यांचा पगार देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, 19 ते 20 दिवस हे कामगार अनधिकृतपणे काम करीत होते. माथाडी बोर्डाच्या निरीक्षकांनी 22 दिवसानंतर तेथे भेट दिली. त्यामुळे 22 दिवस ते अधिकृत कामगार कामापासून वंचित राहिले. बोर्डाच्या निरीक्षकांना योग्य ती समज दिली जाईल काय? जेवढे दिवस कामगार बाहेर होते त्या काळातील मजुरीचे काय? जी रक्कम बोर्डाकडे जमा झाली आहे ती ज्यांनी बेकायदेशीरपणे काम केले त्यांना वाटप करता येणार नाही. ज्यांना अधिकार आहे त्यांनाच ती रक्कम वाटप केली पाहिजे. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे तेथील कामगार नेते श्री.पवार आहेत, त्यांनी मॅनेजमेंटकडून या सगळया कामाचे पैसे उचलले आहेत. याची शासनाला माहिती आहे काय? प्रत्यक्ष काम करणाऱ्या कामगारांच्या हातात पैसा नाही, परंतु कामगार नेत्याचा याच्याशी संबंध नसताना त्यांच्याकडे पैसे देण्यात आले आहेत. कामगार नेत्यांनी कामगारांना संरक्षण दिले पाहिजे. त्यांनी संरक्षण न देता कॉन्ट्रॅक्ट घेणे कितपत उचित आहे, ज्या कामगारांनी मजुरीचे पैसे घेतले नाहीत ती रक्कम किती आहे?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.....

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशीच सांगितले की, टोळी क्रमांक 521 मधील कामगारांना कामावरुन कमी केल्यानंतर मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन कारवाई केली. त्या कामगारांना पुन्हा कामावर घ्यायला लावले. 8 महिन्याच्या पगाराबाबत मंडळ कारवाई करीत आहे. जे कामावर नव्हते त्यांना घ्यावे, टोळी क्रमांक 1070 चे कामगार नेते श्री.नवनाथ पवार व श्री.गोरखनाथ पवार हे भाऊ आहेत. यांनी मे 2012 ते जून 2013 पर्यंतचे 3.10 लाख रुपये व 2.91 लाख रुपये पगाराची रक्कम म्हणून उचलले आहेत. त्या टोळीत अनधिकृतपणे जे कामगार काम करीत होते त्यांना मात्र दीड ते सव्वा लाख रुपयांपर्यंत मजुरी मिळाली. याचा अर्थ पुढाऱ्यांनी जास्त पैसे उचलले आहेत आणि कंपनीने त्यांना ही रक्कम अनधिकृतपणे दिलेली आहे.

श्री.नरेंद्र पाटील : अशा कामगार नेत्यांविरुध्द माथाडी मंडळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करणार आहे का? अयोग्य व चुकीचे वर्तन करणा-या कामगार नेत्यांवर कारवाई व्हावी अशी माझी विनंती आहे.

श्री.हसन मुश्रीफ : तपासून कारवाई करु.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिकलसेल आजाराचे समूळ उच्चाटन करण्याकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात या आजाराचा समावेश करणे

**मु.शी.**: सिकलसेल आजाराचे समूळ उच्चाटन करण्याकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात या आजाराचा समावेश करण्याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(माननीय सदस्या अनुपस्थित)

-------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**पृ. शी./मु. शी.** : मुंबई शहर व उपनगरात डेंग्यू, मलेरिया व गॅस्ट्रो या रोगाचा वाढत असलेला प्रादुर्भाव याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुंबई शहरात व उपनगरात डेंग्यू, मलेरिया व गॅस्ट्रो या रोगांचा प्रादुर्भाव वाढणे, या रोगांच्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असणे, मुंबईत तुंबलेली गटारे व कचऱ्याचे ढीग वाढत असल्यामुळे रोगराईचा प्रादुर्भाव वाढणे, दूषित पाण्यामुळे या आजारांवर नियंत्रण करण्यास प्रशासनाला येत असलेले अपयश, त्यामुळे येथील नागरिकात पसरलेले चिंतेचे व भीतीचे वातावरण, या आजारावर त्वरित नियंत्रण आणून रुग्णांवर योग्य ते औषधोपचार करण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

------------

नंतर 2सी..1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबई वॉर्ड क्र. 1, फॅशन स्ट्रीटवर 350 स्टॉलला पिच लायसन्स दिलेले असतांना तेथे पक्के स्टॉल्स बांधण्यात येणे, याबाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामदास कदम ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुंबई वॉर्ड क्र.1 फॅशन स्ट्रीटमध्ये एकूण 350 स्टॉलला फक्त पिच लायसन्स दिलेले आहे, वास्तविक नियमाप्रमाणे सकाळी रस्त्यावर व्यापार करुन सायंकाळी सदर जागा खाली करुन दिली पाहिजे मात्र महानगरपालिकेचे अधिकारी व पोलीस यांना हप्ता देऊन तेथे पक्की दुकाने 350 स्टॉल्स बांधण्याचे काम प्ररप्रांतियांनी केलेले आहे. तसेच पिच लायसन्स ज्यांच्या नावे आहे त्यांना भाडे देऊन सदर स्टॉल्स चालविणाऱ्या व्यक्ती परप्रांतीय आहेत, एका लालचंद नावाच्या व्यक्तीकडे व त्यांच्या नातेवाईकांकडे 30 ते 40 दुकानांचे पिच लायसन्स आहेत. लालचंद यांच्याकडे जी लायसन्स आहेत, त्यांचे खरे लायसन्स धारक कोठे आहेत ? जे 350 स्टॉल पिच लायसन्स धारक आहेत त्यापैकी 95 टक्के लायसन्स धारक गायब आहेत. पिच लायसन्स व मूळ मालकांकडून भाडयाने जागा घेऊन तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व पोलीस यांना हप्ता देऊन सदर पक्के स्टॉल बांधले गेलेले आहेत.

सभापती महोदय, अतिक्रमण निर्मूलन विभागात हॉकर्सचे सामान 'ए' वार्डाच्या ऐवजी 'एफ' वार्ड (वडाळा) येथे नेले जाते. गोदामातील शासकीय कर्मचारी, सुरक्षा रक्षक 'ए' वॉर्ड मधील वरिष्ठ अधिकारी, पोलीस यांच्या संगनमताने बिना पावती सामान परस्पर विकले जाते. प्रति दिन सदर गोदामामध्ये 5 ट्रक माल नेला जातो व तो बेकायदेशीपणे विकला जातो. बिना पावती सदर सामानाची विक्री रात्री 7 ते 12 वाजेपर्यंत होते. आझाद मैदानाच्या बाजूला श्री.कलामुद्दीन शेख यांची 3 अनाधिकृत दुकाने असून बडया अधिकाऱ्यांना व गोदामांना श्री.विजू आणि श्री.कलामुद्दीन शेख पैसा पुरविण्याचे काम करतात. या संदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी, यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :यवतमाळ जिल्हयाला वारंवार निसर्गाच्या प्रकोपाचा सामना करावा लागत असल्याने तेथील शेतकऱ्यांनी पिकांचा विमा उतरवलेला असूनही त्यांना विमा कंपनीकडून लाभ न मिळणे याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

यवतमाळ जिल्हयाला वारंवार निसर्गाच्या प्रकोपाचा सामना करावा लागतो. निसर्गाच्या प्रकोपामुळे होणारे नुकसान भरुन निघावे म्हणून जिल्हयातील 79 हजार शेतकऱ्यांनी गतवर्षी विविध पिकांचा विमा उतरवला. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने केंद्र आणि राज्य शासनाने या योजनेत आर्थिक हातभार लावलेला आहे. सदर योजनेतील 70 टक्के रक्कम सरकारने भरली व विमा कंपनीकडे पीक संरक्षित केले.

सन 2012-13 मध्ये जिल्हयातील 78 हजार 846 शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत आपला सहभाग नोंदवून 70 हजार 699 हेक्टरवरील पीक संरक्षित करण्यात आले आहे. यामध्ये कापूस, सोयाबीन, तूर, मूग आणि उडीद इ.पिकांचा समावेश आहे.

गतवर्षी कापूस उत्पादकांसह सोयाबीन उत्पादकांना निसर्ग प्रकोपाचा जबर फटका बसल्यामुळे शेतकऱ्यांना वार्षिक उत्पादनात 300 कोटींची घट आली आहे. 78 हजार 846 शेतकऱ्यांनी 2,53,97,000 रुपयांची रक्कम विमा कंपनीकडे जमा केली आहे व 3,46,8,000 रुपयांची रक्कम केंद्र आणि राज्य शासनाकडून भरण्यात आलेली आहे. यामधून 122,28,37,000 रुपयांचे पीक संरक्षित करण्यात आलेले आहे.

झरी जामणी तालुक्यातील शिबला विभागाच्या फक्त 33 शेतकऱ्यांना 73 हजार 74 रुपयांचा पीक विमा मंजूर करण्यात आलेला आहे. यामुळे निसर्गाच्या प्रकोपामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीच्या मदतीला मुकावे लागणार आहे. यामुळे निसर्गाच्या प्रकोपामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून मदत मिळण्यासाठी शासनाचे लक्ष वेधावे, यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGJ/ D/ KTG/ प्रथम श्री. भोगले....... 13:20

**पृ. शी./मु. शी.** : मुलुंड (प.)येथील नागरिकांनी स्मशान भूमीसाठी केलेली मागणी याबाबत श्री. चरणसिंग सप्रा,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चरणसिंग सप्रा ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबई मधील मुलुंड- पश्चिम या भागात एकमेव स्मशानभूमी अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे. जेव्हा या स्मशाभूमीची निर्मिती झाली तेव्हा या ठिकाणची लोकसंख्या 1 लाखाहून कमी होती. आज येथील लोकसंख्या 4 लाखाहून अधिक आहे, मात्र स्मशानभूमी एकच आहे. मुलुंडची वाढती लोकसंख्या विचारात घेता येथील रहिवाशांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. मुलुंडचे विस्तारीकरण झाल्यामुळे लोकांना फार दूरवरुन येथे यावे लागते. शासनाने या भागात आणखी एका स्मशाभूमीची तजवीज करावी, अशी स्थानिक रहिवाशांची मागणी असल्यामुळे येथील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने मागणी केली आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या या मागणीकडे मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु. शी.** : अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत ठाकूर महाविद्यालयाच्या हलगर्जीपणामुळे कु. अनेकरी चव्हाण या विद्यार्थीनीला ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेतून बाद व्हावे लागणे, याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत ठाकूर महाविद्यालयाच्या हलगर्जीपणाने कु.अनेकरी चव्हाण या 91.09 टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थीनीला प्रवेश मिळू शकला नाही. ठाकूर महाविद्यालयाने सदर विद्यार्थीनीची माहिती अपलोड न केल्याने तिला ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतून बाद व्हावे लागले असून संपूर्ण प्रवेश प्रक्रिया रितसर पूर्ण करुनही तिला तिच्या पसंतीचे कॉलेज मिळाले नाही. ठाकूर महाविद्यालयामध्ये विना अनुदानित जागेवर भरमसाठ शुल्क भरुन त्या विद्यार्थीनीला प्रवेश घ्यावा लागला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

ठाकूर महाविद्यालय व्यवस्थापनाने मानवी चुकीमुळे (हयुमर एरर) चूक झाल्याचे सांगणे, त्याच प्रमाणे शिक्षण उप संचालकांकडून कसल्याही प्रकारची मदत न मिळणे, परिणामी चांगले गुण मिळवूनही प्रवेश प्रक्रियेत बाद झाल्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये घोर निराशेचे वातावरण असणे, याबाबत कारवाई करून चव्हाण सारखे इतरही विद्यार्थी जे या प्रक्रिये मधून दूर झाले आहेत किंवा ज्यांना त्रास झाला आहे अशा विद्यार्थ्यांना शिक्षण उप संचालकांकडून तातडीची मदत करण्यात यावी अशा पद्धतीची विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

.............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : जात पडताळणी संबंधी महाराष्ट्र शासनाने दिनांक 18 मे 2013 रोजी काढलेल्या शासन निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत श्री.रणजित पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

जातपडताळणी संबंधी महाराष्ट्र शासनाने 18 मे 2013 रोजी काढलेल्या शासन निर्णयाचा पुनर्विचार करावा अन्यथा त्याचा राज्य शासनाच्या सुमारे 10 लाख मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना आणि 1 लाख निवृत्त कर्मचाऱ्यांना फटका बसेल अशी भीती महाराष्ट्र राज्यात मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व्यक्त करणे, सदर शासन निर्णय स्थगित करण्याच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात दिनांक 22 जुलै 2013 रोजी निदर्शने व आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, जातपडताळणी ही शैक्षणिक अर्हतेची बाब नसल्याने 2001 साली घेतलेल्या निर्णया आधी शासनाच्या सेवेत जे मागासवर्गीय कर्मचारी अधिकारी आहेत त्यांना 18 मे 2013 रोजी काढलेला शासन निर्णन लागू करू नये अशीही मागणी करण्यात येणे, त्यामुळे सदर मागणीबाबत शासनाने पुनर्विचार करून तो स्थगित करण्याबाबत तसेच सादर जातपडताळणी कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांचा अभाव असणे व विद्यार्थ्यांना जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्याकरिता 1 वर्षाच्या वर अवधी लागणे, पेन्शन धारकांना व पेन्शन धारकांच्या विधवा पत्नींना सुद्धा यामधून वगळण्याबाबत होत असलेली मागणी याकडे शासन करीत असलेले दुर्लक्ष, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मौजे इंदापूर, जि.पुणे येथील इंदापूर तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

पुणे जिल्ह्यातील मौजे इंदापूर येथे शिक्षक सहकारी पंतसंस्था आहे. या पंत संस्थेला चांगली कामे विशेषत: कार्यालयीन इमारत, सभागृह, विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल बांधण्यासाठी सन 1975 मध्ये सर्व्हे क्रमांक 271/1/अ/3 क्षेत्र 6 हेक्टर 23.04 आर ही जमीन जमीन देण्यात आली. ही जमीन गायरान संवर्गातील आहे. ती जमीन या कामासाठी बदल करून देण्यात आली. प्रत्यक्षात या संस्थेने तेथे व्यापारी संकुल उभे केले. या व्यापारी संकुलाला मंत्रिमहोदयांचे नाव दिलेले आहे. यासंबंधातील प्रश्न विधान सभेत देखील उपस्थित केला होता. माननीय आयुक्त, पुणे विभाग यांनी मह-2/जमीन-पुणे/सीआर6258,दिनांक 12.2.2011 रोजी चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. शैक्षणिक उपयोगासाठी असलेल्या जमिनीवर व्यापारी संकुल बांधण्यात आले आहे. हे संकुल अगदी ठळकपणाने जाताना दिसून येते. कुठेच न्याय न मिळाल्यामुळे मी हा विशेष उल्लेख उपस्थित केलेला आहे.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे याबाबत डॉ.दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

नव्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणानुसार राज्यात सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन झाल्या असून डिसेंबर 2012 च्या आकडेवारीनुसार राज्यात यासंस्थांची संख्या 8202 आहे. या माध्यमातून सुमारे 122560 सुशिक्षित बेरोजगार सभासद जोडले गेले आहेत. या संस्थांना शासकीय कामे मिळाल्यास त्या आर्थिक सक्षम होतील या हेतूने शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाने दिनांक 17.8.2002 रोजी शासन निर्णय निर्गमित करून विविध विभागांतर्गत शासकीय / निमशासकीय कामे अशा संस्थांना प्राधान्याने देण्याच्या सूचना दिल्या. तथापि, शासन निर्णयात किती कामे द्यावीत याबाबतचे आरक्षण निश्चित न केल्यामुळे सादर कामे प्रत्यक्षात मिळत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 31.3.2005 रोजीच्या निर्णयान्वये नोंदणीकृत कंत्राटदार 34 टक्के, सुशिक्षित बेरोजगार अभियंते 33 टक्के व मजूर सहकारी संस्थांना 33 टक्के अशा प्रकारे कामाचे वाटप केले जाते. आरक्षित टक्केवारीत सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांचा समावेशच नसल्याने राज्यातील सुमारे 1 लाख 22 हजारांहून अधिक सुशिक्षित रोजगारांपासून वंचित आहेत. याबाबत वारंवार शासनाचे लक्ष वेधल्यानंतर 11.9.2008 रोजी रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. तथापि, या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही. त्यामुळे या संदर्भात पुन्हा 25.9.2011 रोजी मा.सहकार मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितां समवेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत सदरहू संस्थांना मजूर सहकारी संस्था आणि बेरोजगार अभियंत्यांच्या धर्तीवर शासकीय कामात कोटा निश्तिच करण्याचे ठरविण्यात आले. तथापि, याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारचा शासन निर्णय घेण्यात आला नसल्याने राज्यातील लाखो सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्याचे स्वप्न भंगलेले आहे. त्यामुळे या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा असे मी विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करीत आहे.

...............................

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : पुणे शहरातील शिवाजी नगर न्यायालयात मेकॅनाईज्ड पार्किग व्यवस्था करणे या बाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

पुणे शहरातील शिवाजीनगर न्यायालयात पक्षकार, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस, वकील व संबंधित नागरिक असे दररोज 8 ते 10 हजार लोकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरु असते. न्यायालयात येत असलेल्या वाहनांना वाहनतळ उपलब्ध करुन देण्यात आला आहे. परंतु तो अपुरा पडत असल्यामुळे तेथे डबल पार्किंग केले जाते. त्यामुळे आरोपिंना घेऊन येणाऱ्या गाड्या बाहेर काढताना पोलिसांना अडचणी येतात. मेकॅनाईज्ड पार्किंगची व्यवस्था केल्यास एकाचवेळी हजाराहून अधिक दुचाकी वाहने पार्क करता येतील आणि त्याचा फायदा पक्षकारांना होणार आहे. अशाप्रकारचे मेकॅनाईज्ड पार्किंग उभारण्यासाठी 4 ते 5 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून तसा प्रस्ताव माननीय उच्च न्यालयाकडून राज्य सरकारला प्राप्त झालेला आहे. परंतु शासनाने अद्याप यावर निर्णय घेतलेला नाही. तरी मेकॅनाईज्ड पार्किंगच्या प्रस्तावास राज्य शासनाने तातडीने मान्यता देऊन निधी द्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे.

------

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.31 ते दुपारी 2.15 पर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यंतरानंतर

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आता पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार आहे. परंतु ज्या मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे त्यातील एकही मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.विनोद तावडे : महोदय, पुरवणी मागण्या या अतिशय महत्त्वाच्या असताना सुध्दा संबंधित विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. ज्या मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे त्यातील केवळ एक-दोन राज्यमंत्री उपस्थित आहेत.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : माननीय मंत्र्यांना सभागृहात येण्याबाबत निरोप पाठविलेला आहे. तो पर्यंत माननीय उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री यांनी निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत

**मु.शी.**: औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत
उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि.18 जुलै, 2013 रोजी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित झालेल्या चर्चेदरम्यान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या मुद्याबाबत नियम-46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ पूर्वी श्री.अजित.... 14:15

**पृ.शी./मु.शी.: सन 2013-2014 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा**

**तालिका सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चा आज व मंगळवार, दिनंक 23 जुलै, 2013 रोजी घेण्यात येणार आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांनी भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व मंगळवार, दिनांक 23 जुलै, 2013 रोजी असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा मंगळवार दिनांक 23 जुलै, 2013 रोजी पूर्ण करावी लागेल.

**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.

1. उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री - के-8, के-10
2. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री - एच-3, एच-4, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, झेडडी-4
3. गृह मंत्री - बी-1, बी-4, बी-5, बी-10
4. वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री - सी-6
5. कृषी व पणन मंत्री - डी-3
6. ग्रामविकास मंत्री - एल-2, एल-4, एल-5
7. सहकार आणि संसदीय कार्य मंत्री - पी-1, व्ही-2
8. अन्न व औषध प्रशासन मंत्री - एस-1
9. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री -एम-2, एम-3

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**....

10.वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्री - डी-3, एस-1, एस-3

11.जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री - आय-3, आय-4

12.महसूल व खार जमीन मंत्री - सी-1, सी-2, सी-5, आय-5

13.कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री - के-4,

14.रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री - एल-3, एल-7

आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने एक बाब निदर्शनास आणून देतो की, विधानसभा सभागृह दिवसभरासाठी स्थगित झालेले आहे. तरी सुध्दा अनेक मंत्री महोदय या सभागृहात उपस्थित नाहीत. या मंत्रिमंडळामध्ये जबाबदार कॅबिनेट मंत्री असतो आणि पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने मांडण्यात येणाऱ्या मुद्यांना उत्तरे देण्यासाठी ते सभागृहात धावून आले असते तर ती बाब सभागृहाच्या प्रतिष्ठेला धरुन झाली असती. सध्या सभागृहामध्ये रोष्टरनुसार सन्माननीय मंत्री सर्वश्री नारायण राणे आणि राजेंद्र दर्डा यांच्या व्यतिरिक्त कोणीही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत, हे खेदाने नमूद करुन पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात करतो.

महोदय, अर्थ व नियोजन विभागाच्या मागण्या उद्या चर्चेला आहेत. शिवाय आज माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचा वाढदिवस असल्यामुळे त्यांच्या विभागाचे अंदाजपत्रक किती होते, अगोदर शिलकीत असलेले अंदाजपत्रक कितीने कमी झाले आणि दोन महिन्यानंतर ते किती तुटीचे झाले या बाबतची चर्चा उद्या सर्वांसमोर करीन.

महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची पुरवणी मागणी क्रमांक एच-7, पृष्ठ क्र.71, या बाबी अंतर्गत राज्यातील पोलीस निवास इमारतींच्या दुरुस्तीचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, पोलीस विभागात सध्या 19 हजार 8 पोलीस अधिकारी व 1 लाख 90 हजार 435 पोलीस कर्मचारी अशा एकूण 2 लाख 9 हजार 443 अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मंजूर संख्याबळ आहे. सदरच्या मंजूर संख्याबळाच्या 80 टक्के समाधानाचे उद्दिष्ट आहे. म्हणजे अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता अनुक्रमे 15 हजार 206 आणि 1 लाख 52 हजार 348 इतक्या निवासस्थानाची आवश्यकता आहे. सध्या 5641 अधिकारी व 80,150 कर्मचारी यांच्यासाठी एकूण 86 हजार 491 निवासस्थाने उपलब्ध आहेत. तथापि, प्रत्यक्ष पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी अनुक्रमे प्रत्येक निवासस्थानासाठी 15 लाख रुपये याप्रमाणे 1434.75 कोटी रुपये व प्रत्येकी 10 लाख रुपये याप्रमाणे 7149.80 कोटी रुपये अशी एकूण 8584.55 कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे.

उपलब्ध निवासस्थानापैकी पोलीस अधिकाऱ्यांची 475 व पोलीस कर्मचाऱ्यांची 8459 निवासस्थाने राहण्यायोग्य नाहीत. त्यामुळे त्यांची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. ही सर्व आकडेवारी आपल्याच विभागाकडून मला प्राप्त झालेली आहे. या करिता अनुक्रमे पोलीस अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाकरिता 71.85 कोटी रुपये व पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाकरिता 845.90 कोटी रुपये अशा एकूण 917.15 कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. आपण ज्या पोलिसांच्या भरवशावर कायदा व सुव्यवस्था ठेवण्याचा विचार करतो त्यांना आपण यामध्ये काही न्याय देऊ शकतो अशी स्थिती नाही. अधिकाऱ्यांच्या निवास्थानाकरिता 1506 कोटी रुपये व पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाकरिता 7995.70 कोटी रुपये अशा एकूण 9501.70 कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, 80 टक्के समाधानाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता पुढील दोन वर्षात व आगामी पंचवार्षिक योजनेत व पोलीस दलाच्या आधुनिकीकरणांतर्गत निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे. 10 वर्षात निवासी बांधकामासाठी सरासरी 90 कोटी रुपये इतक्या निधीची मागणी करण्यात आली असून 53 कोटी रुपये इतका सरासरी निधी प्राप्त झाला आहे. उपलब्ध निवासस्थानांपैकी पोलीस अधिकाऱ्यांची दुरुस्त करावयाची निवासस्थाने 1404 व पोलीस

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

कर्मचाऱ्यांची दुरुस्त करावयाची निवासस्थाने 18,601 अशी एकूण 20,005 निवासस्थानांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता 300.05 कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे. त्यापैकी चालू वित्तीय वर्षात दुरुस्तीसाठी 75 कोटी रुपये इतक्या निधीची मागणी करण्यात आली असून एकूण 40 कोटी रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. यातील 20 कोटी रुपयांची तरतूद मूळ अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. यापैकी जरी 20 कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला असला तरी तो निधी अत्यंत अल्प आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचा प्रश्न अद्यापपर्यंत पूर्ण होऊ शकत नाही.

माननीय गृह मंत्र्यांनी पोलीस वसाहतींना भेटी दिलेल्या आहेत. तेथील अवस्था त्यांनी पाहिलेली आहे. तेथील घरांची छप्परे कशी पडत आहेत आणि घरांची काय स्थिती झालेली आहे हे त्यांना माहीत आहे. या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचा प्रश्न अद्यापर्यंत पूर्ण होऊ शकला नाही.. तथापि शासनाच्या विविध विभागांकडे घरांची लँड बँक आहे. त्याव्दारे पोलिसांच्या घराचा प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग होऊ शकतो. आज आपण पाहतो की, ही उपलब्ध असणारी घरे रिकामी पडलेली आहेत. काही लोक घरे घेत नाहीत. त्या ठिकाणी पोलिसांची व्यवस्था होऊ शकते का याचा विचार करण्याची गरज आहे.

चेंबूरला माहूल येथे एसआरए तर्फे 7 मजल्यांच्या 71 इमारतींमध्ये 17 हजार सदनिका उपलब्ध आहेत. प्रत्येक सदनिका 225 चौरस फुटाची आहे. गेली काही महिने ती घरे कोणीही ताब्यात घेत नाहीत. ती घरे लांब असल्यामुळे आम्ही त्या ठिकाणी जाणार नाही असे प्रकल्पग्रस्त लोक म्हणतात असे एमएमआरढीएचे अधिकारी सांगतात. महापालिकेच्या सुध्दा अशाच तक्रारी आहेत. त्यामुळे ही घरे अक्षरशः सडत आहेत. अशा प्रकारची घरे ताबडतोब ताब्यात घेऊन पोलिस कर्मचाऱ्यांना देऊ शकतो का याचा विचार करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

तरच हा प्रश्न सुटू शकतो.

सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी शासकीय कोट्यातून सदनिका घेऊनही शासकीय निवासस्थानात राहत आहेत, त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल असे माननीय गृह मंत्र्यांचे वक्तव्य वारंवार ऐकत आहोत. या अधिकाऱ्यांची जवळपास 100 ते 125 कोटी रुपयांची मिळकत झालेली आहे याची आकडेवारी मी शासनाला दिलेली आहे. तरीही हे अधिकारी शासकीय निवासस्थानात राहत आहेत. काही अधिकाऱ्यांनी तर मुंबईत, सांगलीत, औरंगाबाद येथे शासकीय कोट्यातून घर घेतलेले आहे. तरीही ते शासकीय निवासस्थानात राहत आहेत. यासंबंधी वक्तव्यांपेक्षा कृतीची आम्हाला अपेक्षा आहे. पण ती होताना आम्हाला दिसत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना मी सांगितले आहे की, अधिकाऱ्यांना शासकीय कोट्यातून एकच सदनिका मिळाली पाहिजे. अधिकारी असोत किंवा राजकारणी असोत त्यांना आयुष्यात एक सदनिका मिळाली पाहिजे, ती त्यांना मिळू नये असे माझे म्हणणे नाही. पण संपूर्ण महाराष्ट्रात कोठेही एकच सदनिका मिळाली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय कोट्यातून सदनिका मिळू नये किंवा शासकीय भूखंडावर उभ्या राहिलेल्या प्रत्येक सोसायटीमध्ये आपले नाव घुसवितो. हे कोठे तरी थांबले पाहिजे. जे.ए.पाटील समितीला याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा आदेश दिलेला आहे. त्या आदर्श प्रकरणाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते. तो अहवाल सभागृहासमोर यायचा तेव्हा येईल. तोपर्यंत त्या इमारतीतील सर्व फ्लॅटस् हे अधिकारी काबिज करुन घेतील. या विषयी लवकर निर्णय घेण्याची आमची अपेक्षा आहे.

गृह विभागाच्या पृष्ठ क्र.16 वरील बाब क्रमांक 21 वर मी बोलणार आहे. शहर पोलिसांसाठी साधन सामग्री खरेदी करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. ही बाब निश्चित चांगली आहे. परंतु नुकताच शहर पोलिसांसंबंधी कोर्टाचे निकालपत्र आलेले आहे. सदरहू निकालपत्रात अंडरवर्ल्ड डॉन, छोटा राजन याचा मदतनीस असलेल्या लखनभैय्याचा 2006 साली एन्काऊन्टर केल्याच्या प्रकरणी 13 मुंबई पोलीस कर्मचाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. एन्काऊन्टर झाला तर पोलिसांना दोषी धरले जाते. कोणत्या तरी प्रकरणात एन्काऊन्टर झाल्यामुळे मुख्य सचिवांना दोषी धरले आहे. त्यांनी 5 लाख भरल्याचे आज वर्तमानपत्रातून आम्ही

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

वाचले आहे. अबू सालेमवर जेलमध्ये हल्ला होतो. कोणाला पकडून जेलमध्ये ठेवले तर त्या आरोपीला सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी गृह खात्याची आहे. त्यानुसार अबू सालेमला सुरक्षित ठेवू असे गृह विभागाने 50 ठिकाणी लिहून दिलेले आहे. जेलमध्ये अंडा सेलमध्ये त्याच्यावर हल्ला होतो. त्यामुळे ना मुख्य सचिव सुरक्षित आहेत, ना गुन्हेगार सुरक्षित, शासन इंटरनॅशनल ट्रिटी पाळू शकत नाही. कोणाच्याही आदेशाशिवाय एन्काऊन्टर झाला नसेल. त्याचा पुरावा न्यायालयात पोलीस सादर करु शकले नाही तर पोलिसांना दोषी धरले जाते. अशामुळे आपण पोलिसांचे मनोबल संपवित चाललो आहोत.

मानवाधिकार आयोगासमोर गृह विभागाच्यावतीने कोणी व कशी बाजू मांडली, याची माहिती घेतली आहे काय ? मानवाधिकार आयोगापुढे आल्यानंतर बघू, निपटून घेऊ असे सांगून कोणते तरी वकील पाठवून दिले. या प्रकरणांमध्ये योग्य वेळी लक्ष घालून शासनाची बाजू मांडण्यासाठी वरिष्ठ वकील नेमले पाहिजेत, माहीतगार नेमले पाहिजेत. राज्याच्या मुख्य सचिवांना 5 लाख रुपये भरुन जेल वाचविण्याची नामुष्की सरकारवर आली आहे. याबाबत आम्हाला चिंता वाटते. हे कोठे तरी थांबविण्याची आवश्यकता आहे. जेन्युईनली झाले तरी हे थांबेल की नाही याबाबत शंका वाटते. गुन्हेगाराने गोळी झाडली म्हणून पोलिसांनी त्याच्यावर गोळी झाडली असे म्हटले जाते, हे खरे आहे. परंतु उद्या कोर्टासमोर सिध्द कोण करणार ? हे सिध्द करण्यासाठी त्यांना उभे राहता येत नाही, त्यांच्या वकिलांनी ते सिध्द केले नाही तर काय करणार ? त्यामुळे शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला तर पोलीस दलाचे मनोबल वाढू शकेल.

अबू सालेमच्या विषयावर बोलत असताना मी असे सांगेन की, श्री.शृंगारपुरे हे जेलचे डीआयजी होते. त्यांच्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांचा जेलबाबत दबदबा होता तो आता संपलेला आहे. जेलरने जेलची तपासणी करावयाची असते ते करतात की नाही ते मला माहीत नाही. जेलचे अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक भेट देण्यासाठी येतील अशी जेलच्या अधिकाऱ्यांना भीती वाटली पाहिजे. परंतु ती आता वाटेनाशी झालेली आहे. ज्या दिवशी अबू सालेमवर हल्ला झाला त्या दिवशी ती रिव्हॉल्व्हर 300 रुपयांच्या बदल्यात जेलमध्ये गेले होते. आता जेलमध्ये काहीही

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मॅनेज करु शकतो.  कालपासून संजय दत्तचा ब्लडप्रेशर लो झाल्याच्या बातम्या येत आहेत.  त्याला मुंबईला आणून डॉ.तात्या लहाने यांच्या ताब्यात द्यावयाचे आहे काय ? त्यामुळे त्याच्या घरच्यांना त्याला आरामात भेटण्याची सोय होण्याच्या या हालचाली सुरु आहेत काय अशी लोकांमध्ये चर्चा सुरु आहे.  रोज पुण्याला जाऊन भेटण्याऐवजी आता येथे त्याला हॉस्पिटलमध्ये ए.सी.त आरामात ठेवता येईल. म्हणजे पुढील काही वर्षे तेथे ठेवल्यानंतर त्याला शिक्षा पूर्ण करता येईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

या जेलच्या बाबतीत फार अविश्वास निर्माण झालेला आहे. आर्थररोड जेल असो, नवी मुंबईतील जेल असो, नागपूरमधील जेल असो या सर्व जेलच्या बाबतीत अविश्वास निर्माण झालेला आहे. नाशिकमधील जेलच्या बाबतीत आपण या सभागृहामध्ये चर्चा देखील केली होती. आज जेलमधील आरोपी सुरक्षित नसतील तर मग सामान्य माणसावर कधीही आणि कुठेही हल्ला होऊ शकतो. जेलची जी काही प्रोसिजर आहे ती पाळली जाते की नाही, या जेलवर गृह खात्याचा काही वचक आहे की नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे. आता अबू सालेमवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी एक जेलर आणि दोन कॉन्स्टेबल्सना निलंबित करण्यात आले. यांना निलंबित केले म्हणून परिस्थिती काही सुधारणार नाही. खालपासून वरपर्यंत बसलेले सर्वजण यामध्ये आहेत. हे निलंबित केलेले तीन कर्मचारी अधिवेशन संपल्यानंतर तीन महिन्यामध्ये पुन्हा कामावर रुजू होतील. मग सांगितले जाईल की, मॅट ऐकत नाही मानवाधिकार ऐकत नाही. हे गृह खाते सर्व बाजूंनी हतबल झ ाालेले आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 16 वरील बाब क्रमांक 22 मध्ये जिल्हा पोलीस दलाकरिता साधनसामग्री खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही चांगली बाब आहे. परंतु पोलीस दलामध्ये साधनसामग्री खरेदी करताना भ्रष्टाचारही होतो, तो होता कामा नये. भ्रष्टाचार कसा होतो याचे मी एक उदाहरण देतो. 1999मध्ये 11700 एसएलआर मॅगझीन्स आणि 2000मध्ये 14500 एसएलआर मॅगझीन्स जयसन इंडस्ट्रीकडून खरेदी करण्यात आल्या. या मॅगझीन्सची गुणवत्ता तपासून न घेता कंपनीला 60 कोटी रुपये अदा करण्यात आले. नागपूरचे तत्कालीन पोलीस महानिरीक्षक श्री. अरुप पटनायक यांच्या असे निदर्शनास आले की नक्षलवाद्यांचा सामना करण्यासाठी पोलीस दल सदर रायफलचा वापर करीत नाहीत..(अडथळा)...सदरचे मॅगझीन रायफलमध्ये बसत नसल्यामुळे त्याचा वापर करण्यात येत नाही असे सांगण्यात आले...(अडथळा) सभापती महोदय, आर्मामेण्ट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेण्ट इन्स्टिटयूट, पुणे यांनी या संदर्भातील अहवाल देखील शासनाला दिलेला आहे. निकृष्ट मालाच्या पुरवठ्या बाबतीत तब्बल 14 वर्षानंतर दंडसंहिता 420 (6) सीआर/61/13 नुसार तक्रार दाखल करण्यात आली आणि आर्थिक गुन्हे विभागाकडे या केसचा तपास सोपविण्यात आला. निकृष्ट दर्जाचे एसएलआर रायफलचे मॅगझीन्स

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आणि काडतुस पुरविणा-या कंपनी विरुध्द फसवणुकीचे आरोप पत्र दाखल करण्यात यावे. परंतु त्यांना शासनाकडून जी रक्कम अदा करण्यात आली ती रक्कम 14 वर्षाचे व्याज आकारुन वसूल करुन ती शासनाच्या तिजोरीमध्ये जमा करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. निकृष्ट दर्जाचा माल पुरविल्याबद्दल 14 वर्षानंतर त्या कंपनीवर गुन्हा दाखल केला जात आहे. सदर कंपनी ही शासनाच्या ई-निविदा प्रक्रियेच्या काळया यादीत टाकावी आणि कोणत्याही कंत्राटामध्ये सदर कंपनीला सहभागी करुन घेऊ नये अशी मी मागणी करीत आहे. हे केले तरच आपण भ्रष्टाचार रोखण्याच्या बाबतीत काही तरी पावले उचलेली आहेत असे वाटेल.

सभापती महोदय, तक्रार केल्यावर देखील त्याची दखल घेतली जात नाही असे प्रकरण आहे. हायकमिशन ऑफ इंडियाने सिनियर पोलीस इन्स्पेक्टर, भांडूप पोलीस स्टेशन यांच्याकडे एक फसवणुकीबाबतची तक्रार केली होती. लंडनचे श्री. चंगुराम देवरुखकर यांनी शैलेश पडावे यांच्या विरुध्द तक्रार केली होती. या संबंधी पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती. रॉचा अधिकारी दाखवून त्याने कसे लुटले यासंबंधी तक्रार केलेली आहे. अधिकारी म्हणतात की आमच्याकडे अशी तक्रार नाही. जेव्हा लिखित तक्रार येईल त्यावेळी त्याची दखल घेण्यात येईल. तक्रारीच्या सर्व प्रती माझ्याकडे आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, ब्रिटीश हाय कमिशनच्या पत्राची दखल घेतली जात नसेल तर ती अतिशय दुर्देचाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 46, पृष्ठ क्रमांक 35- वतनेतर प्रयोजनासाठी बी-बियाणे चाचणी, रासायनिक खत नियंत्रण आणि किटकनाशक चाचणी प्रयोगशाळा यासाठी अतिरिक्त तरतूदकरण्यात आलेली आहे. राज्यातील शेतकऱ्यांना चांगले पीक यावे याकरिता उत्कृष्ट दर्जाचे बियाणे मिळाणे आवश्यक आहे. बियाणे उत्कृष्ट असताना ते एम.आर.पी.च्या दरात मिळावे अशी स्वाभाविकपणे शेतकऱ्यांची अपेक्षा असते. तशी अपेक्षा शेतकऱ्यांनी ठेवली तर त्यात काही वावगे नाही. परंतु बियाण्यांमध्ये होणाऱ्या काळ्या बाजारामुळे गत वर्षी माननीय कृषी मंत्र्यांनी चर्चेला उत्तर देताना ॲडव्हान्स बुकींग बाबतीत काही घोषणा केल्या होत्या. परंतु त्या घोषणांची अंमलबजावणी अद्यापही करण्यात आलेली नाही. माननीय कृषी राज्यमंत्री महोदय श्री.सावकारे साहेब, आपण या विभागाचा पदभार नव्याने घेतलेला आहे. त्यामुळे माझ्या सूचनांची आपण नोंद लिहून घ्यावी. सद्य:स्थितीत शासनाच्या अनास्थेमुळे शेतकऱ्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे. सीड कंपन्यांमधील भ्रष्टाचारास शासनाचे सरंक्षण आहे. सन 2011 मध्ये बियाण्यांच्या वितरणामध्ये काळाबाजार होत असल्याची टीका आम्ही केल्यानंतर कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील साहेबांनी ॲडव्हान्स बुकींगमुळेच बियाण्यांमध्ये काळाबाजार होत असल्याचे सभागृहात मान्य केले होते. ही बाब लक्षात आल्यानंतर बियाणे कंपन्यांना ॲडव्हान्स घेण्यास बंदी आणली आहे व ज्या बियाणे कंपन्या ॲडव्हान्स घेतील त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येईल असेही आश्वासन त्यावेळी माननीय कृषी मंत्र्यांनी दिले होते. सदर आश्वानानुसार कणक 7351 या कापसाच्या बियाण्याचे गैरव्यवहार करणाऱ्या महीको कंपनीवर तात्पुरती थातूर-मातूर कारवाई करण्यात आली. कारवाई केल्यानंतर यावर्षी महीको कंपनीला पुन्हा परवाना देण्यात आला व महीको कंपनीने या वर्षी देखील मराठवाडयामध्ये कणक 7351 ही व्हरायटी काळया बाजारामध्ये 1100 ते 1200 रुपयांना विकली हे वास्तव आहे. अशा रितीने शासन प्रत्येक भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देत असेल तर शेतकरी आत्महत्या नाही तर काय करणार ? महीको कंपनीवर कोणत्या प्रकारची कारवाई

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

करण्यात आली आहे, केली असेल ती कारवाई या वर्षी मागे का घेतली या प्रश्नाचे उत्तर राज्यातील शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. कारवाई करावयाची आणि नंतर सेटलमेंट करावयाचे अशी सरकारची प्रवृत्ती आहे काय याची माहिती राज्यातील जनतेला जाणून घ्यावयाची आहे.

सभापती महोदय, कृषी मंत्र्यांनी सभागृहात घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात ज्या वितरकांनी ॲडव्हान्स बुकींग केले त्यांनाच कंपन्यांकडून बियाणे उपलब्ध होत होते. त्याचाच परिणाम म्हणून बियाण्यांमधील काळाबाजार आज सुध्दा कमी झालेला नाही. बियाण्यांमध्ये काळाबाजार होत असल्याची बाब गतवर्षी काही शेतकऱ्यांनी लक्षात आणून दिल्यानंतर कृषी आयुक्त यांना याबाबत पत्र लिहून ॲडव्हान्स बुकींग घेणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. तद्नंतर कृषी आयुक्तांना पत्र दिल्यानंतर तेथील संचालक, गुणवत्ता नियंत्रण श्री.आडसूळ यांनी महाराष्ट्रामध्ये एकाही कंपनीने ॲडव्हान्स बुकींग घेतले नसल्याचे उलट टपाली उत्तर दिले. सदर उत्तर साफ खोटे असल्याने मी श्री.आडसूळ यांना काही विशिष्ट कंपन्यांचे बँक स्टेटमेंट मिळवावे व त्यावरुन ॲडव्हान्स बुकींग घतले अथवा नाही याची तपासणी करावी अशा आशयाचे पत्र दिनांक 21.1.2013 रोजी लिहिले. यासंदर्भात्तील सर्व स्टेटमेंट माझ्याकडे उपलब्ध आहेत.

महोदय, माझ्या पत्राला उत्तर येत नसल्याने माझ्या कार्यालयामार्फत वारंवार पाठपुरावा करुन देखील श्री.आडसूळ यांनी उत्तर देण्यास टाळले. सरतेशवेटी दिनांक 4 जुलै,2013 रोजी मला उत्तर पाठविण्यात आले व उत्तरामध्ये पूर्णत: बियाणे कंपन्यांची बाजू घेण्यात आली. त्या उत्तराची प्रत मी आपणास उपलब्ध करुन देणारच आहे. ज्या कंपन्यांनी ॲडव्हान्स बुकींग घेतले त्या कंपन्यांनी श्री.आडसूळ यांना कंपनीचे बैंक स्टेटमेंट देण्यास नकार दिला व श्री.आडसूळ यांनी सुध्दा हा नकार मान्य करीत बियाणे कंपन्यांना क्लीनचिट दिली. तसेच ज्या कंपन्यांनी व विक्रेत्यांनी बँक स्टेटमेंट दिले त्यामध्ये बुकींग घेतले असल्याचे स्पष्ट दिसत असून देखील त्यांनी केलेले व्यवहार नक्की कोणत्या बाबीशी निगडीत आहेत हे स्पष्ट होत नसल्याचे कळविले. याचाच अर्थ श्री.आडसूळ व कृषी आयुक्त हे शेतकऱ्यांसाठी काम करीत नसून बियाणे कंपन्यांच्या भल्यासाठी काम करीत असल्याचे स्पष्ट आहे.

3...



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 14:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, सभागृहात माननीय कृषी मंत्र्यांनी घोषणा करुन देखील सदर घोषणेची अंमलबजावणी अशारितीने जर हे अधिकारी करीत असतील तर या सभागृहाला व सभागृहातील घोषणेला अर्थच राहणार नाही असे माझे स्पष्ट मत आहे. संचालक, गुणनियंत्रक श्री.आडसूळ व आयुक्त श्री.दांगट यांचेवर कडक कारवाई करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

यानंतर श्री. भोगले.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

सभापती महोदय, बाब क्रमांक 52, पृष्ठ क्रमांक 37 वर नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण भागात कुक्कुटपालन योजना राबविली जाते. माझी या निमित्ताने एवढीच मागणी आहे की, प्रामुख्याने कोकण आणि उर्वरित भागामध्ये इमू पालनाचा व्यवसाय केला जातो. इमू पालन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नाबार्डने जी योजना आणली त्या माध्यमातून हे नुकसान झाले आहे ही गोष्ट खरी आहे. पोल्ट्री व्यवसाय, साखर कारखाने, कापूस उत्पादक शेतकरी यांना शासनाकडून काही प्रमाणात सवलती दिल्या जातात. इमू पालन करतात ते सुध्दा शेतकरी आहेत. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून त्यांनी इमू पालन सुरु केले. नाबार्डसारख्या शासकीय बँकेने कॅम्पेन घेऊन शेतकऱ्यांना हा व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. आज शेतकरी अडचणीत आल्यानंतर नाबार्डने हात वर केले आहेत.

सभापती महोदय, राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणीत आल्यामुळे त्यांना आर्थिक मदत देऊन वाचविण्याबाबत सरकार विचार करीत आहे. इमू पालन करणारे शेतकरी आज अडचणीत असताना त्यांना वाचविण्यासाठी काही मदत देणार आहात का? राज्यात ऊसाचे उत्पादन कमी झाले तरी शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते किंवा अतिरिक्त ऊस उत्पादित झाला तर वाहतुकीसाठी अनुदान दिले जाते. द्राक्ष पीक अडचणीत आल्यास शेतकऱ्यांना मदत दिली जाते. अशा स्थितीत कोकण आणि उर्वरित भागात इमू पालन करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी किंवा इतर कोणत्या मार्गाने शासन आर्थिक मदत करणार का याची घोषणा सभागृहात करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 36, पृष्ठ क्रमांक 24. आज सकाळी माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचा मुद्दा मांडला होता. शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या बिल्डरविरुध्द तक्रार करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांचा आज सकाळी भांडुपमध्ये त्याच्या घरात घुसून खून करण्यात आला. मुंबई आणि उपनगर जिल्हयातील भूखंडांची गगनाला भिडणारी किंमत लक्षात घेऊन शासकीय जमिनींचे संरक्षण करणे गरजेचे आहे. मुंबई व उपनगर जिल्हयातील शासकीय भूखंडांचे संरक्षण करण्यासाठी उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण) व अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) ही दोन उच्च दर्जाची पदे निर्माण करण्यात आली. या पदांची निर्मिती करण्याचा उद्देश या पदाची जबाबदारी स्पष्ट करतो. मुंबई आणि

श्री.विनोद तावडे...

उपनगर जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी शासकीय जमिनीवर अतिक्रमणे करुन झोपडपट्टया उभारण्यात आलेल्या आहेत. सदर अतिक्रमिक भूखंडावर कालांतराने एसआरए योजना राबविण्यात आल्याच्या अनेक तक्रारी आमच्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. या अधिकाऱ्यांमध्ये षडयंत्र चालते. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे शासकीय भूखंडांची माहिती मागितली 2001 मध्ये शासनाकडे उपलब्ध असणारे भूखंड किती होते, त्या भूखंडांचे क्षेत्र किती होते, सदर भूखंडावर अतिक्रमण होत असल्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, सदर भूखंडांवर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्यांनी केलेली कारवाई याची माहिती मी मागितली होती. मला जी माहिती देण्यात आली त्यामध्ये असे नमूद केले आहे की, सन 2000 पासून शासकीय भूखंडांचा सर्व्हे करण्यात आलेला नाही. 2000 पासून मुंबई शहर व उपनगरात शासनाचे भूखंड किती आहेत, कोणते आहेत याचा सर्व्हे झालेला नाही. जर भूखंडांचा सर्व्हे झालेला नसेल तर अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांनी शासकीय भूखंडांवरील अतिक्रमण कसे रोखायचे? ही दोन उच्च दर्जाची पदे निर्माण केली आहेत, त्या पदावर कार्यरत असलेले अधिकारी काय करतात याची माहिती घेतली पाहिजे.

सभापती महोदय, जास्तीत जास्त शासकीय जमिनींवर अतिक्रमणे व्हावीत, त्यातून कोट्यवधी रुपयांचा मलिदा मिळावा या हेतूने शासकीय भूखंडांचा सर्व्हे केला जात नाही ना अशी शंका लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. शासकीय भूखंडांवरील अतिक्रमणे रोखणारे अधिकारी कोण आहेत? त्यांची नावे मी मागितली तर जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आली. मुंबई व उपनगर भागात जे शासकीय भूखंड आहेत त्यावरील अतिक्रमण रोखणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांची नावे मला मिळाली पाहिजे. कोणत्या भूखंडावर अतिक्रमण झाले, कधी झाले, त्यावेळी संबंधित अधिकारी कोण होते हे कळू शकेल. परंतु मला अधिकाऱ्यांची नावे कळविण्यात आली नाहीत. उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण) व अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांनी शासकीय भूखंडावर अतिक्रमण झाल्यास तेथील झोपडी मालकास त्वरित निष्कासित करणे गरजेचे आहे. झोपडी मालकाला निष्कासित करीत असताना पुन्हा त्याने तेथे झोपडी बांधू नये म्हणून कलम 3 (झेड) 2(सहा) अन्वये फौजदारी कारवाई करुन दखलपात्र गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे.

नंतर 2एल.1..

अप्रकाशित/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

परंतु अनेकदा किरकोळ कारवाई केल्याचे दाखविण्यात येते. तात्पुरते अतिक्रमण हटविण्याचे नाटक करण्यात येते व थोडयाच कालावधी नंतर त्याच झोपडीमालकाला परत झोपडी उभारण्याची संधी देखील दिली जाते. या मोबदल्यात संबंधित उप जिल्हाधिकारी यांना एका झोपडीमागे 20-25 हजाराचा मलिदा मिळतो, अशी चर्चा आहे.

खरेतर महाराष्ट्र स्लम एरिया (इम्पुव्हमेंट क्लिअरन्स अँड रिडेव्हलपमेंट)1971 च्या कायद्यान्वये जर उप जिल्हाधिकारी ( अतिक्रमण ) यांनी अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी कारवाई केली नाही तर उप जिल्हाधिकारी यांच्यावरच कलम 3 झेड-2(7) अन्वये फौजदारी कारवाई करण्याची तरतूद यामध्ये आहे. असे असतांना आज पर्यंत एकाही अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे शासकीय भूखंडावर होणारे अतिक्रमण कमी न होता वाढतेच आहे.

शासकीय भूखंडावर अतिक्रमण होऊ नये,अशी जर शासनाची इच्छा असेल तर सन 2000 पासून आजपर्यंत या पदावर काम केलेल्या संबंधित जाबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 38, पृष्ठ क्रमांक 27 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबी अंतर्गत मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक, मुंबई या कार्यालयाच्या खर्चाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. मुद्रांक नोंदणी विभागाकडे आय सरिता नावाची संगणक कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदरची कार्यप्रणाली उत्कृष्टपणे चालण्याकरिता विविध दुय्यम निबंधक कार्यालयात संगणक संच पुरविण्यात आले आहेत. सदरहू संगणक संच हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहेत. तसेच शासनाच्या मान्यता प्राप्त रेट कंत्राटानुसार संचाच्या प्रोसेसरबाबत ज्या आवश्यकता नमूद केल्या होत्या, त्यानुसार संच पुरविण्यात आले नव्हते.ऱ ाा खराब संचाच्या पुरवठयामुळे 2 महिन्यात आय सरिता संगणक प्रणाली बंद पडण्याची घटना महाराष्ट्रभर दिसून आली. विशेषत: पुणे जिल्हयामध्ये जेथे नोंदणी महानिरीक्षकाचे मुख्यालय आहे,तेथेच संगणक बंद पडल्याच्या घटना दिसून आल्या. यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसाय झाली. खराब संच पुरविणाऱ्या कपंनीकडून अदा केलेली शासनाची रक्कम संपूर्णत: वसूल करण्यात यावी व सदर कंपनीस शासनाच्या ई निविदा प्रक्रियेच्या काळया यादीत टाकण्यात यावे. तसेच कोणत्याही कंत्राट





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

प्रक्रियेमध्ये सदर कंपनीस सहभाग घेण्यास बंदी आणावी, अशी मागणी मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठयाचा विषय या सभागृहात मी किती तरी वेळा उपस्थित केलेला आहे. या सभागृहात माननीय मंत्रीमहोदय जी काही घोषणा करतात त्या घोषणेचे पुढे काहीच होत नाही. कोकणातील आंबा उत्पादकाला आंबा पिकासाठी फवारणी करावी लागत असते. परंतु फवारणीसाठी शेतकऱ्यांना रॉकेल रेशनिंग दुकानावर मिळत नाही. शेतकऱ्यांना फवारणीसाठी जे रॉकेल लागते ते उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था नियमामध्ये केली गेलेली नसल्यामुळे शेतकऱ्यांना काळया बाजारातून दाम दुपटीने घ्यावे लागते. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले जाईल असे सांगितले होते. शेतकऱ्यांना किटक नाशकाच्या फवारणीसाठी रॉकेलची आवश्यकता असते त्यामुळे शेतकऱ्यांना फवारणीसाठी रॉकेल उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 152, पृष्ठ क्रमांक 137 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबी अंतर्गत राज्यातील अन्नधान्याच्या गोदामांच्या दुरुस्तीच्या कामाकरिता अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. ही बाब निश्चितच चांगली आहे. परंतु ज्या गोदामांमध्ये हे अन्न धान्य साठविले जाते त्या गोदामातून त्याचे वितरण खरोखरच दारिद्रय रेषाखालील जनतेस होते का, यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिधापत्रिकांमधील भ्रष्टाचाराबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा होऊन देखील माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी सदैव अधिकाऱ्यांची पाठराखणच केलेली आहे. या संदर्भात सभागृहात माननीय मंत्री दाद देत नसतांना माननीय उच्च न्यायालयाने बोगस तथा अपात्र शिधापत्रिका वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, असे निर्देश शासनास दिले आहेत. शिधापत्रिकेमधील भ्रष्टाचार कमी करायचा असेल तर शिधापत्रिकांचे संगणिकरण करण करणे गरजेचे आहे. शिधापत्रिकांच्या संगणकीकरणाचा निर्णय शासनाने जरी घेतला असला तरी प्रत्यक्षात संगणिकरणाची गती खूपच धीमी आहे. भ्रष्टाचार थांबविण्याची शासनाची जर खरच इच्छा असेल तर शासनाने संगणिकरणाचा कार्यक्रम राबवण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवावी व विहित कालावधीत अंमलबजावणी न झाल्यास संबंधित

...3...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. या मागणी बरोबरच शिधापत्रिकेतील भ्रष्टाचाराबाबत माझे काही प्रश्न आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे देखील मंत्री महोदय निश्चित देतील, अशी माझी अपेक्षा आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

गेल्या 2-3 वर्षात झालेल्या सर्व्हेमध्ये 54 लक्ष शिधापत्रिका अपात्र आढळून आल्या. या अपात्र शिधापत्रिकांबाबत काही प्रश्न आहेत. अपात्र आढळून आलेल्या शिधापत्रिका धारकांना पुरावे सादर करण्याकरिता काही मुदत देण्यात आली आहे काय, असल्यास, सदर मुदतीमध्ये किती शिधापत्रिका पात्र आढळून आल्या ? मुदतवाढ देऊन सुद्धा कागदपत्र सादर करू न शकणाऱ्या किती शिधापत्रिका अपात्र आढळून आल्या, या अपात्र शिधापत्रिका वाटप केल्या पासून त्यांच्यावर किती धान्य वाटप करण्यात आले ? याची आम्हाला माहिती द्यावी. कागदपत्रांची पूर्तता न करता शिधापत्रिकांचे वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे काय आहेत, सदर अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे ? यासंबंधी आपण मागच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या वेळी सांगितले होते की, ज्यांनी अपात्र शिधापत्रिका दिल्या आहेत त्यांच्यावर आम्ही कारवाई करू. किमान त्याची यादी तरी आम्हाला द्यावी.

यानंतर मी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या बाब क्रमांक 181, पान क्र.175 वर बोलणार आहे. या बाबी अंतर्गत रूग्णालयांच्या दुरूस्ती व परिरक्षण कामासाठी तरतूद करण्यात आली आहे. राज्यात बारामती, सातारा, अलिबाग, नंदूरबार, चंद्रपूर, गोंदिया आणि मुंबई मध्ये सात नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची शासनाने घोषणा केली आहे. यापूर्वीही तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण व कै.विलासराव देशमुख यांनी नांदेड व लातूर येथे वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा केली होती. सध्या राज्यात 14 शासकीय महाविद्यालये आहेत. परंतु, या महाविद्यालयांतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता, इत्यादी संवर्गातील शेकडो पदे रिक्त असल्यामुळे या महाविद्यालयांना "मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया" ची मान्यता मिळालेली नाही. या रिक्त पदांमध्ये प्राध्यापकांच्या 135 पदांचा, सहयोगी प्राध्यापकांच्या 483 पदांचा तर शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील 722 पदांचा समावेश आहे. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे त्यांच्या विद्यापीठातील प्राध्यापकांना दुप्पट, तिप्पट पगार देत असल्यामुळे आपल्या येथे येणार कोण ? भारती विद्यापीठ, डी.वाय.पाटील येथे सर्व चांगले

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

काम चालले आहे. शासनाकडे मात्र कोणीच यायला बघत नाही. ते का येत नाहीत ? राज्य लोकसेवा आयोगाचा थंडा कारभार, मनमानी बदल्या तसेच खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांकडून मिळणाऱ्या मोठ्या वेतनामुळे अनेक कर्मचारी शासकीय सेवा सोडून जात असल्यामुळे ही पदे रिक्त राहून वैद्यकीय शिक्षणाचा खेळखंडोबा होत आहे. असे असताना देखील आपण अजून कॉलेजेस घोषित करत आहात. ती व्यवहार्य आहेत काय ?

राज्यात सध्या असलेल्या 14 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिकण्यासाठी प्राध्यापक उपलब्ध नसतानाही शासनाने नवीन सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही घोषणा केल्यानंतर सात महाविद्यालये सुरू होणार आहेत काय ? यासाठी आपणास प्राध्यापक मिळणार आहेत काय ? बीड येथील डेंटल कॉलेजला मान्यता मिळाली. तेथे कुठल्याही प्रकारची सुविधा नाही. ती बिचारी मुले फिरत आहेत. कालच मला ती मुले येऊन भेटलीत. त्या कॉलेजमध्ये काहीच सुविधा नाही. त्या कॉलेजची आपण मान्यता काढली तर या मुलांना दुसरीकडे तरी प्रवेश मिळेल. यात मुलांचे आयुष्य बरबाद होणार नाही. ही फाईल माननीय मंत्री डॉ.गावित यांच्याकडे सहीसाठी पडलेली आहे. त्यावर सही का होत नाही हे माहीत नाही. उंच आवाजात बोलणारे आमचे बीड मधील मित्र मात्र येथे गप्प बसले आहेत. त्यांनी काही तरी येथे बोलले पाहिजे. माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित हे येथून तिकडे जाताना काही तरी थोडे घेऊन गेले असल्यामुळे ते यावर बोलतील. ही फाईल मंत्री महोदयांकडे का पडून आहे ? वेळेत मुलांना दुसरीकडे ट्रान्सफर करता येऊ शकते. हे जर आपण वेळेत केले नाही तर पुढच्या वर्षी पुन्हा तेथे मुले ॲडमिशन घेतील. ते कॉलेज आज तरी सुरू नाही. तेव्हा रिक्त पदांसंबंधी शासन कोणती कार्यवाही करणार आहे याची माहिती द्यावी. या विषयातील तयारी माननीय राज्यमंत्री श्री.सावंत यांनी केली असेल. ते कोकणातून मराठवाड्यात गेले आहेत. त्यामुळे ते तयारीवाले असतील असे मला वाटते. यासंबंधी शासनाने खरोखर तयारी केली आहे काय ? तेव्हा या संबंधातील वस्तुस्थिती आम्हाला कळू द्यावी.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

यानंतर मी बाब क्रमांक 183, पृष्ठ क्रमांक 176 वर बोलणार आहे. मघाशी मी आदित्य डेंटल कॉलेजचा उल्लेख केला आहे. तोच यातील मुद्दा आहे. या बाबी अंतर्गत विविध रूग्णालयांचे कंत्राटी सेवांवरील खर्च भागविण्याठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. सध्या राज्यात होमिओपॅथीचा विषय सुरू आहे. होमिओपॅथी डॉक्टरांना जीवनावश्यक औषधे देण्याची परवानगी द्यावी, बॉम्बे होमिओपॅथिक प्रॅक्टीशनर ॲक्ट, 1959 मधील "ओन्ली" हा शब्द तात्काळ वगळण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे. हा शब्द महाराष्ट्र राज्य वगळता अन्य कोठल्याही राज्यात लागू नाही. या मागणीसाठी ते गेल्या काही दिवसांपासून आझाद मैदान येथे उपोषणाला बसले आहेत. याच मागणीसाठी त्यांनी आज मोर्चा देखील काढला आहे. त्यांचे एवढेच म्हणणे आहे की, या ॲक्टमधील "ओन्ली" हा शब्द वगळला पाहिजे. यासंबंधी त्यांना शासनाने आश्वासन देखील दिले होते. पण शासनाची अशी अडचण येते की, दर वर्षी नवीन सचिव येतो. तो स्वत:ची नवीन थिअरी मांडतो. त्याने योग्य थिअरी मांडली तर यातील तज्ज्ञ असणारे मंत्री काही तरी नवीन थिअरी आणतात. अशा प्रकारे सगळे विषय प्रलंबित राहतात. एक्स्पेट रेट कॉन्ट्रॅक्ट. त्यामध्ये मात्र प्रत्येक जण आपल्या हक्कावर गदा येऊ देत नाहीत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आग्रही राहून आपला हक्क घेतला जातो. तेव्हा आपण या हक्कासाठी आग्रही राहिलात तर काही उपयोग आहे. होमिओपॅथी डॉक्टर्स उपोषणास बसले आहेत. त्यातील काही डॉक्टर्स रुग्णालयात ॲडमिट देखील झालेले आहेत. तेव्हा त्यांच्याशी चर्चा करुन त्यांना उपोषण सोडण्यास सांगावे.

पृष्ठ क्रमांक 123, बाब क्रमांक 133 - उद्योग, उर्जा व कामगार विभाग - पेट्रोल व तेल, विजेची प्रलंबित देयके आणि महाराष्ट्र कामगार संस्था, मुंबई यांच्या कार्यालयासाठी नवीन वाहन खरेदी करण्यासाठीचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आज सकाळी सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी माथाडी कामगारांचा प्रश्न मांडला. माथाडी कामगारांप्रमाणे कंत्राटी कामगारांच्या संदर्भात सरकार केव्हा कायदा आणणार आहे ? कंत्राटी कामगारांना नोकरी विषयक असुरक्षितता आहे. त्यांना नोकरीवरुन केव्हाही काढले जाते. जे सुशिक्षित आहेत त्यांना दुसरीकडे नोकरी मिळते. परंतु जे कमी शिकलेले असतात त्यांना दुसरीकडे नोकरी मिळत नाही. तेव्हा कंत्राटी कामगारांच्या संदर्भात सरकारने लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मे.प्रिसिजन ॲडेसिव्ह टेप्स प्रा.लिमिटेड, मुरबाड, जिल्हा ठाणे या कारखान्यात सुमारे चार वर्षापासून 35 ते 40 कंत्राटी कामगार काम करीत होते. मी या कंपनीचे उदाहरण सांगत आहे. या प्रिसिजन ॲडेसिव्ह टेप्स या कंपनीने कंत्राटी कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा दिलेल्या नाहीत किंवा त्यांना किमान वेतनाप्रमाणे वेतन, बोनस, रजेचा पगार व आरोग्य व सुरक्षाविषयक साधने दिली नाहीत. त्या ठिकाणी कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जात होते म्हणून कामगारांनी मुख्य मालक व कंत्राटदाराकडे त्यांच्या न्याय्य हक्काची मागणी केली. त्या कामगारांनी युनियन केली म्हणून त्या सर्व कामगारांना कामावरुन काढून टाकण्यात आले. मालकाने कामगारांना फक्त बोनस दिला असून किमान वेतनाचा फरक, अर्जित रजेचा पगार, पी.एफ. इत्यादी सुविधा दिलेल्या नाहीत. तसेच सध्या काही काम नाही असे सांगून त्यांना कामावर घेण्यास नकार दिला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांनी कंत्राटी कामगारांच्या संदर्भात कायदा करण्यात येईल असे मागील तीन-चार अधिवेशनापूर्वी सभागृहात सांगितले होते. कंत्राटी कामगारांच्या संदर्भात शासनाला चिंता नाही असे दिसते. कंत्राटी कामगारांच्या संदर्भात शासन ठोस निर्णय घेणार आहे असे माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगावे. शासन काही विधेयके घाईघाईने आणते त्याप्रमाणे कंत्राटी कामगारांच्या बाबतीत विधेयक आणणार काय एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

पृष्ठ क्रमांक 216, बाब क्रमांक 227-पर्यटन विभाग - देशातील अग्रगण्य एकमेव सी-वर्ल्ड प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, मौजे तोंडवळी येथे उभा रहात आहे. हा प्रकल्प 1390 एकर क्षेत्रफळामध्ये उभा राहत आहे. यामध्ये जगातील सातही महासागरांच्या प्रतिकृती उभारण्यात येणार आहेत. या ठिकाणी महासागरांचा "वर्ल्ड डिस्प्ले" उभारण्यात येणार आहे. तसेच थीम पार्क, हॉटेल्स, मरीन जेटी, वॉटर ट्रान्सपोर्टही उभारण्यात येणार आहे. खाडीतील पाणी समुद्रमार्गे आणण्यासाठी खाडी जेटी उभारण्यात येणार आहे. सध्या प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पामुळे हजारो लोकांना नोकऱ्या मिळणार आहेत.

सभापती महोदय, माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे तसेच माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचा या प्रकल्पामध्ये सिंहाचा वाटा आहे. त्याबद्दल मी या दोघा मान्यवरांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यासह महाराष्ट्र व संपूर्ण देशाचा कायापालट होणार आहे. सुमारे 2500 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. आजतागायत जमिनी ताब्यात घेण्यासाठी 30 कोटी रुपये जिल्हाधिकारी यांचेकडे वितरित करण्यात आले आहेत. परंतु ही रक्कम अपुरी आहे. पुरवणी मागण्यांमध्ये यातील कोणत्याच रकमेचा समावेश नाही. तेव्हा या प्रकल्पासाठी 1400 एकर जमीन ताब्यात घेण्यासाठी योग्य त्या निधीची तरतूद करावी अशी विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 124, बाब क्रमांक 136- उद्योग बंदरे विभाग-कोकण विभागाला भव्य व निसर्गरम्य सागरी किनारा लाभला असून या सागरी किनाऱ्यावर असलेले सागरी किल्ले, मंदिरे, बंदरे, अन्य प्रेक्षणीय व पुरातन वास्तू पहाण्याचा पर्यटकांना लाभ मिळण्यासाठी तसेच कोकणचा विकास करण्यासाठी मुंबई ते गोवा जलवाहतूक सुरु करण्यात यावी. तसेच मुंबईच्या पश्चिम किनार पट्टीवरील नरीमन पॉईन्ट ते बोरिवली मार्गावर प्रवासी जलवाहतूक प्रकल्प सुरु करावा जेणेकरुन त्यामुळे मुंबईची गर्दी आटोक्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ MMP पूर्वी श्री.अजित.... 15:00

श्री.सुभाष चव्हाण.....

महोदय, पान क्रमांक 37, बाब क्रमांक-50 या कृषी विभागाच्या "कृषी विषयक संशोधन व शिक्षण" या मागणीवर मी बोलू इच्छितो.

महोदय, महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नैसर्गिक सौंदर्याचा व कृषी प्रधानतेचा विचार करुन सन 2007 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा हा 'कृषी पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित केला आहे. अर्थसंकल्पात कृषी पर्यटनासाठी विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. मौजे धामापूर या ठिकाणी सध्या कृषी चिकित्सालय व फळ रोप वाटीका अस्तित्वात आहे. माननीय कृषी मंत्र्यांकडे या संबंधी तीन-चार बैठकाही झालेल्या आहेत. 5 कोटी रुपये रकमेचा हा प्रस्ताव आहे. माझी विनंती आहे की, कृषी पर्यटनाच्या 5 कोटी रुपयाच्या प्रस्तावाला मान्यता देऊन निधीची तरतूद करावी.

महोदय, जलसंपदा विभागाची बाब क्रमांक-118, पृष्ठ क्रमांक-112 'लहान पाटबंधारे' या मागणीवर मी बोलणार आहे. मौजे धामापूर, जि.सिंधुदुर्ग येथील शिवकालीन धामापूर तलावाच्या कालवा बांधकाम व पाणी पुरवठा इत्यादी कामाच्या सुमारे 15 कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्याची टिप्पणी तयार आहे. माननीय जलसंपदा मंत्र्यांकडे वारंवार या विषयी बैठका झाल्या आहेत. परंतु अजूनपर्यंत मंजुरी मिळाली नाही. पहिल्या हप्त्यातील 3.75 कोटी रुपयांचे काम झालेले आहे. पहिल्या फेजमधील पाणी सुरु झाले आहे. तरी उर्वरित कामाला मंजुरी देऊन निधीची उपलब्धता करावी.

महोदय, रोजगार हमी योजना आणि जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 148, पृष्ठ क्र.16 वर मी बोलू इच्छितो. राज्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत वेळोवेळी अनियमितता आढळून येत असून, अनेक वेळा कामामध्ये दिरंगाई व टाळाटाळ होत असल्यामुळे लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी वारंवार अडचणी येत असल्याचे उघडकीस आलेले आहे. त्यामुळे या योजनेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संगणकाचा वापर केल्यास शासकीय पातळीवर एकसूत्रता व पारदर्शकता आणण्यास मदत होईल. आंध्र प्रदेश शासनाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व संगणकीकरणाच्या माध्यमातून क्रांती घडवून आणलेली आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्रानेही नरेगा या योजनेत आधुनिक तंत्रज्ञानाचा व संगणकीकरणाचा वापर करावा व त्यासाठी निधीची उपलब्धता करावी, एवढी मागणी करुन मी थांबतो.

धन्यवाद.

---------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, उद्योग व बंदरे विभागाची बाब क्रमांक-135, पान क्रमांक 123 वर मी बोलतो. कोकणात खाजगी बंदरांना प्रोत्साहन देण्यासाठी खाजगीकरणातून मोठ्या प्रमाणावर बंदरे उभी राहिली आहेत. या ठिकाणी बंदराच्या बॅकअप एरियातील जागा ही बंदराच्या पॉलिसीप्रमाणे देण्याचे अधिकार बंदरे विभागाला आहेत. परंतु बंदरे विभाग हे अधिकार वापरत नाही. 20 वर्षांपूर्वी ज्यांना बंदरे विकसित करण्यासाठी जागा दिली होती त्यांना अजूनपर्यंत जागा हस्तांतरित करण्यात आली नाही. विशेषत: रत्नागिरी, रायगड व ठाणे मध्ये हा प्रकार जास्त आहे.

महोदय, रायगड जिल्ह्यात एकाच कंपनीला पोर्टसाठी जागा दिली आहे. परंतु त्यांनी बंदराचा विकास केला नाही. रिलायन्स कंपनीला 700 एकरची जागा दिली. त्या बंदराचा विकास करण्यासाठी कंपनीने एक खडा टाकला नसताना सुध्दा महसूल विभागाने त्यांना जागा तातडीने हस्तांतरित करुन दिली आहे. माझी या निमित्ताने माननीय बंदरे मंत्र्यांना विनंती आहे की, बंदरे विभागाला पॉलिसीनुसार जे अधिकार मिळालेले आहेत ते खऱ्या अर्थाने वापरण्यास त्यांनी सुरुवात केली पाहिजे.

महोदय, मी आता बाब क्रमांक-33, पान क्रमांक-19 वर बोलू इच्छितो. मागे मी गृह विभागाच्या मागण्यांवर बोलताना अलिबाग येथील पोलीस इन्स्पेक्टर राजरोसपणे पैसे घेत असल्याबद्दल तक्रार केली होती. त्याची माननीय गृह मंत्र्यांनी दखल घेतली. त्यांच्या प्रॉपर्टीची ताबडतोब चौकशी करण्यात आली. त्यामुळे त्याने अलिबाग येथून ताबडतोब बदली करुन घेतली आहे. अद्याप त्याची चौकशी सुरु आहे. मला त्या बाबत पत्रे आली.

श्री.आर.आर.पाटील : महोदय, जे जे सन्माननीय सदस्य पुराव्यासह बोलतील त्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : महोदय, मी एल.टी. मार्गच्या श्री.सोनावणे यांचे प्रकरण पुराव्यासह सांगितले होते, चारा घोटाळ्यातील गाड्यांचे नंबर दिले होते. या बाबत 7 दिवसांत चौकशी करण्यात येईल असे माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले होते. परंतु तेथील एस.पी. सांगत आहेत की, या बाबत माझ्यावर वरुन प्रेशर येत आहे. मी सर्व पुरावे देऊनही काही कारवाई होत नाही.

..3..



SJB/ KTG/ D/ MMP पूर्वी श्री.अजित.... 15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : महोदय, एस.पी. जर वरुन प्रेशर येत आहे असे सांगत असतील तर खालून प्रेशर सुरु करण्यात येईल. परंतु प्रकरणाची चौकशी करण्यास लावू.

नंतर श्री.बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, खालापूर तालुक्यात ताकई येथे बेन्झोअर कंपनीने मोठ्या प्रमाणात निवासी प्रकल्प घेतलेला आहे. हा प्रकल्प जवळजवळ 200 कोटी रुपयांच्या पुढे आहे. खालापूरचे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी यांनी 2 कोटी रुपयांची लाच चेकने घेतली. माझ्या पेपरमध्ये त्या संदर्भात बातमी आली. मी त्या संदर्भात पत्र दिले. ताबडतोब त्यांची कंट्रोल विभागात बदली करण्यात आली. कंट्रोल विभागात बदली झाल्यानंतर पोलीस अधीक्षकांनी लगेच कारवाई केली आणि त्यांना सस्पेंड केलेले आहे. माझी या निमित्ताने एवढीच मागणी आहे की, महसूल विभागाचे अधिकार गृह विभाग वापरत आहे. गृह विभाग गुन्ह्यांची चौकशी करीत नाही पण महसूलमध्ये जमीन कोणाची आहे, कोणाचे अतिक्रमण आहे, त्या ठिकाणी जाण्याचे जे काम पोलीस आणि गृह विभाग मोठ्या प्रमाणावर करीत आहे ते थांबले पाहिजे.

सभापती महोदय, काल-परवा सुट्टीच्या दिवशी मी शाहूवाडीतील काही गावांना भेटी दिल्या. कोल्हापूर येथील राजारामपुरी पोलीस ठाण्यामधील पोलीस निरीक्षक सौ. माने या जमिनीचा व्यवहार मोठ्या प्रमाणावर करतात. शाहूवाडीमध्ये या सौ. माने मोठ्या प्रमाणावर जमीन घेतात. याची चौकशी झाली पाहिजे. सौ. माने यांनी 500 एकर जमीन घेतलेली आहे. काही शेतकरी त्यांच्याकडे गेले आणि म्हणाले की, आम्हाला शाळा वगैरेसाठी 5 एकर जागा द्या. त्या म्हणाल्या, तुम्ही मला जागा द्या, मी जागा घेते, जागा देत नाही, आता मी खाली राजापूरला जाते, राजापूरला 200 एकर जागा देण्यास तयार आहे. त्या पोलीस निरीक्षक आहेत. मी पुराव्यानिशी सांगतो की, तिच्या नवऱ्याच्या नावावर, तिच्या दिराच्या नावावर, तिच्या भावजयीच्या नावावर, तिच्या पुतण्याच्या नावावर जागा असल्याचे उतारे मला लोकांनी दाखविले. त्याची चौकशी शासनाने करावी. मी त्यांना माझा अनुभव सांगितला. मी सांगितले की, या राज्याचे माननीय गृह मंत्री हे कर्तबगार आहेत. मी अलिबाग तालुक्यातील इन्स्पेक्टरबद्दल गेल्याच अधिवेशनात तक्रार केली आणि त्याबाबत त्यांनी ताबडतोब चौकशी केली, त्यांच्या प्रॉपर्टीची चौकशी केली. माझी अशी मागणी आहे की, शाहूवाडीतील जो डोंगराळ भाग आहे त्या ठिकाणी गरीब आदिवासी आणि मराठा समाजातील शेतकरी काम बघतात. या संदर्भात सुध्दा चौकशी केली पाहिजे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. जयंत प्र. पाटील .....

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 25 वरील बाब क्रमांक 37 बाबत बोलणार आहे. या राज्यामध्ये आता गावठाण विस्ताराच्या बाबतीत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. गावठाणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात होतो, त्या ठिकाणी अतिक्रमणे होतात, जागा आहे म्हणून लोक मोठ्या प्रमाणावर घरे बांधतात आणि तेथील गावकऱ्यांवर अतिक्रमणाचा दंड बसतो. माझ्या अलिबाग तालुक्यातील पेडांबे गावामध्ये जवळजवळ 25 एकर गावठाणाची जागा आहे. त्या ठिकाणी लोकांनी घरे बांधली. तेथील गावठाण विस्ताराचा प्रस्ताव गेली दहा वर्षे प्रलंबित आहे. गावठाण विस्ताराचे जे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते ताबडतोब मंजूर झाले पाहिजेत. या मागणीच्या निमित्ताने माझी आणखी एक विनंती आहे की, या 60 वर्षामध्ये गावांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे आणि ज्या स्मशानभूमी आहेत त्या आता गावातील वस्त्यांमध्ये येत आहेत. त्यामुळे स्मशानभूमींचा सर्व्हे करुन त्यांची जागा बदलण्याची गरज राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. त्याचाही महसूल खात्याने विचार केला पाहिजे. कारण आज गावठाण विस्तार करताना त्याची मोठ्या प्रमाणावर अडचण होत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

स्मशानभूमी भर वस्तीमध्ये आल्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, वन विभागाच्या पृष्ठ क्र.27 वरील बाब क्रमांक 39 वर बोलणार आहे. मी माननीय वने मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचे अभिनंदन करतो. त्यांनी राज्यातील पोपटांना पिंजऱ्यात ठेवण्याची बंदी घातलेली आहे.

सभागृहामध्ये माननीय मदत व पुनर्वसन मंत्री उपस्थित आहेत. अलिबाग तालुक्यातील थळ येथील आरसीएफ कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांचा विनंती अर्ज मी संसदीय विनंती अर्ज समितीसमोर सादर केला होता. त्यांची बाजू मी स्वत: विनंती अर्ज समितीसमोर मांडली होती. त्या समितीने खास बाब म्हणून 140 प्रकल्पग्रस्तांना त्या कंपनीत नोकरीवर घेण्याचा निर्णय दिलेला आहे. गेले 7 महिने हे सर्व प्रकल्पग्रस्त त्या कंपनीच्या गेटसमोर धरणे धरुन बसलेले आहेत. माननीय पुनर्वसन मंत्र्यांना मी विनंती करतो की, त्यांनी हा प्रश्न तातडीने निकालात काढावा.

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात अलिबागमधील पांढऱ्या कांद्याचा मुद्दा मांडला होता. तेथील कांदा जगप्रसिध्द आहे. अलिबागमधील 20 गावांमध्ये पांढऱ्या कांद्याचे उत्पादन घेतले जाते. परंतु आता त्या कांद्याला किड लागलेली आहे. मंत्री महोदयांनी त्यावेळी या प्रश्नासाठी एक बैठक घेण्याचे आश्वासन गेल्या अधिवेशनात मला दिले होते. ते अधिवेशन संपल्यानंतर आता पावसाळी अधिवेशन सुरु झालेले आहे. परंतु आजपर्यंत त्यांनी आश्वासनाची पूर्तता केलेली नाही.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्रमांक 74 वरील बाब क्रमांक 80 बाबत मी बोलणार आहे. या मागणीमध्ये राज्यात रस्ते व पूल यांची 2724 नवीन कामे हाती घेतल्याचे नमूद केलेले आहे. या कामासाठी 397 कोटी 25 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. पुरवणी मागण्यांच्या पृष्ठ क्रमांक 563 ते 797 वर या कामांची यादी दर्शविलेली आहे. रायगड जिल्ह्यातील 91 कामांचा समावेश आहे. त्यापैकी 29 कामे फक्त राष्ट्रवादी पक्षाच्या सदस्यांनी सुचविलेली आहेत. 49 कामे कर्जत मतदार संघातील व 40 कामे आमचे मित्र व माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांच्या मतदार संघातील आहेत. या पुरवणी मागण्या फक्त राष्ट्रवादी पक्षासाठी सादर करण्यात आल्या आहेत काय ? आम्ही या सभागृहात लोकप्रतिनिधी

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील.......

म्हणून येतो. आम्ही सुचविलेले एकही काम या यादीमध्ये आलेले नाही. रायगड जिल्ह्यात 7 विधानसभा मतदार संघ आहेत. या कामांमध्ये काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनी किंवा शेतकरी कामगार पक्षाच्या सदस्यांनी सुचविलेले एकही काम समाविष्ट केलेले नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्यांनी आपले विचार जरुर मांडावेत. पुरवणी मागण्या पक्षनिहाय मांडल्या जात नाहीत. पुरवणी मागण्या तेथील लोकप्रतिनिधीद्वारे, विभागातील अधिकारी यांच्यामार्फत शासनाकडे येतात. काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना पक्ष किंवा भारतीय जनता पक्ष यांनी कामे सुचविली नाहीत असा त्याचा अर्थ होत नाही किंवा त्याचा तसा संबंधही नाही. त्यामुळे त्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी बोलू नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य व आमचे मित्र श्री.विनायक मेटे हे सरळ विधानपरिषदेचे सदस्य झालेले आहेत. मी ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य व जिल्हा परिषद सदस्य होतो. त्यानंतर या सभागृहाचा सदस्य झालो आहे. मी पुराव्यानिशी बोलत आहे. रायगड जिल्ह्यातील मी स्वत:, श्री.धैर्यशील पाटील, श्रीमती मिनाक्षी पाटील, श्री.विवेक पाटील व काँग्रेस पक्षाचे सदस्य श्री.प्रशांत ठाकूर यांनी कामांच्या याद्या दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR-1

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:15

श्री. जयंत प्र. पाटील...

मी उद्या आमच्या पक्षाने सुचविलेल्या कामांची यादी पटलावर ठेवायला तयार आहे. मग अशा प्रकारे कामांसाठी तरतूद होत असेल तर आम्ही शासनाकडे कामांची यादी देणार नाही, शासनाला कामे सुचविणार नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, 2724 कामांमध्ये आमचे एकही काम योग्य नाही काय ? ही पध्दत थांबली पाहिजे.

आम्हाला आज "चतुररस्त्र" हे स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या संदर्भातील पुस्तक दिले. त्यांनी महाराष्ट्र कसा घडविला हे त्यामध्ये नमूद केलेले आहे. त्यांच्या वेळी अशा प्रकारे बजेट केले जात नव्हते आणि अशा प्रकारे पुरवणी मागणीमध्ये तरतूद केली जात नव्हती. विरोधी पक्षातील सदस्यांच्या कामासाठी पुरवणी मागण्यामध्ये तरतूद केली जाणार नाही असे एकदाचे मंत्री महोदयांनी सांगून टाकावे, म्हाणजे आम्ही या पुढे कामे सुचविणार नाही. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, जास्तीत जास्त तरतूद ही अर्थसंकल्पामध्ये व्हावयास पाहिजे आणि पुरवणी मागण्यामध्ये कमीत कमी तरतूद व्हायला पाहिजे. आता अर्थसंकल्पामध्ये अल्प तरतूद केली जाते आणि पुरवणी मागण्यांमध्ये अधिकची तरतूद केली जाते. याचे कारण, तुम्ही आमच्याकडे या, आम्हाला तुम्ही नमस्कार करा, आम्हाला मत द्या, मग आम्ही पुरवणी मागण्यामध्ये तुमच्या कामांसाठी तरतूद करतो, असे प्रकार आता व्हायला लागले आहेत. हे कुठे तरी थांबले पाहिजे.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील थळ ग्रामपंचायतीची लोकसंख्या जास्त असून या ग्रामपंचायतीचे विभाजन अंतिम टप्प्यामध्ये आहे, ते लवकरात लवकर करु असे माननीय मंत्री महोदयांनी गेल्या तीन अधिवेशनामध्ये सांगितले. तीन अधिवेशने झाली. तरी अजून या बाबतीत निर्णय झालेला नाही. म्हणून माझी पुनश्च मागणी आहे की, या थळ ग्रामपंचायतीचे विभाजन लवकरात लवकर करावे. गावाचा लवकर विकास होण्यासाठी छोट्या ग्रामपंचायती करण्याचे तत्व राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी स्वीकारले आणि त्याचा फायदा आज राज्यामध्ये दिसून येत आहे. नगरपालिकेसारख्या असलेल्या या थळ ग्रामपंचायतीचे विभाजन करावे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

22-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 67 वरील बाब क्रमांक 80मध्ये मार्ग व पूल यांच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी 10 कोटी 14 लाख 54 हजार रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मुंबई ते गोवा या रस्त्याचा सभागृहामधील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी वारंवार उल्लेख केलेला आहे. मुंबई-गोवा हा महामार्ग दिवसेंदिवस अतिशय धोकादायक बनत चालला आहे. खेड तालुका ते कशेडी आणि चिपळूण तालुक्यातील परशुराम घाटामध्ये 40 कि.मी.चे अंतर आहे. या घाटामध्ये मागील दहा महिन्यामध्ये 15 अपघात होऊन 54 प्रवासी मृत्यूमुखी पडले आहेत. खारेपाटण ते कशेळी दरम्यान दुसरा स्पॉट आहे. या ठिकाणी मागील 6 वर्षात तीन हजारापेक्षा अधिक लहान मोठे अपघात झालेले असून त्यामध्ये 500 पेक्षा जास्त लोकांचा जीव गेलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

सभापती महोदय, पुणे-मुंबई एक्सप्रेस-वे ची बांधणी होऊन 10 वर्ष पूर्ण झालेली आहे. त्यावेळेपासून मुंबई-गोवा हा महामार्ग एक्सप्रेस-वे किंवा चौपदरी होणार आहे असे शासनाकडून वांरवार सागितले जाते, परंतु 10 वर्षे झाली तरी मुंबई-गोवा एक्सप्रेस-वे च्या कामाकडे शासनाने पाहिजे तेवढे लक्ष दिलेले नाही. मुंबई येथून वडखळ नाका, अलिबाग येथे जाण्यासाठी तीन ते चार तासापेक्षा जास्त वेळ लागतो. पावसाळा आला की, जलवाहतूक बंद केली जाते. अलिबाग येथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे, पावसाळात जलवाहतूक बंद असल्याने प्रवासी वेगवेगळया वाहनांने अलिबाग येथे जाण्यासाठी प्रवास करीत असतात. अलिबाग येथे जाताना वडखळ नाका आला की, तेथे तीन तासापेक्षा जास्त वेळ प्रवाशांना अडकून रहावे लागते. मार्ग आणि पूल यासाठी शासनाने जो निधी उपलब्ध करुन दिला आहे, तो निधी खूपच कमी आहे. त्या निधीत मोठया प्रमाणात वाढ करावी. वडखळ नाका येथे प्रवाशांना वाहतूक कोंडीचा जो त्रास होतो आहे, तो तातडीने कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, पृष्ठ क्रमांक 124, बाब क्रमांक 136 या पुरवणी मागण्याच्या अनुषंगाने मी बोलतो आहे. उद्योगधंद्यात महाराष्ट्र राज्य हे देशात एक क्रमांकावर आहे. मागच्या आठवडयात प्रहार या वृत्तपत्रात माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी फिगर आणि फॅक्टस् दिल्या होत्या, त्या मी वाचल्या. त्यांनी ज्या फिगर आणि फॅक्टस् दिल्या त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. खऱ्या अर्थाने उद्योगातील कामगारांच्या कौशल्य आणि श्रम या गोष्टीस पूर्णपणे न्याय देण्यात आला तर मला वाटतो राज्यातील उद्योग टिकेल. उद्योग टिकले तर राज्याची प्रगती मोठ्या प्रमाणात होईल आणि महाराष्ट्र राज्य प्रगतीच्या दिशेकडे जाईल. काही राज्यात कंपन्यांना प्रसिध्दी मिळावी म्हणून मोठ्या प्रमाणात जाहिराती करतात. शॅम्पूची जाहिरात देतात, साबणाच्या जाहिराती दाखवितात, त्या साबणास फेस किती येतो त्याची जाहिरात दाखवितात. तसे काही राज्ये आपले उद्योग कसे वाढले, त्यासंबंधी जाहिराती करतात. त्या कंपन्या आपल्या राज्याची जाहिरात करतात, पण सत्यता तशी नाही. महाराष्ट्र हे देशात आजही उद्योगाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे. या पुढेही महाराष्ट्राचा पहिलाच क्रमांक राहील.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर..

महोदय, या राज्यात नवीन नवीन उद्योग येत आहेत, आपल्या राज्यात मल्टीनॅशनल कंपन्या मोठया प्रमाणात येत आहेत. मॅक्डोनल, कोको-कोला, आय.पी.ओ., बी.पी.ओ. अशा वेगवेगळया मॅन्युफॅक्चर करणाऱ्या कंपन्या आपल्या राज्यात आल्या आहोत व येत आहेत. परदेशातील कंपन्यांकडून एका कामगारास एका तासाचे 8 डॉलर मजुरी दिली जाते. तेथील कंपनीत साफसफाईचे काम करणाऱ्या मजुरास एका तासाला 48 रुपये एवढी मजुरी दिली जाते. त्या मजुराने 8 तास काम केले तर त्याला 544 रुपये मजुरी दिली जाते. परंतु त्याच कंपन्या आपल्या राज्यात, आपल्या देशात येत आहेत, त्या या राज्यातील कामगारांना अतिशय कमी वेतन देतात. त्या कंपन्या कर्मचाऱ्यांना कामावर कायम करीत नाहीत. त्या कंपन्या कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर ठेवतात. काही पक्षांकडे जाऊन परदेशातील कंपन्या असेही सांगतात की, आम्हाला कर्मचाऱ्यांच्या युनियनकडून त्रास होतो. या कंपन्या कर्मचाऱ्यांना जेवढे वेतन देतात, त्याच्या 10 टक्के अथवा 15 टक्के सुध्दा वेतन आपण देऊ शकत नाही. म्हणून असंघटीत कामगार असतील, संघटीत कामगार असतील त्यांच्यासाठी मल्टीनॅशनल कंपन्या मुळे मोठा धोका निर्माण आहे.

महोदय,परदेशातील उद्योग या राज्यात यावे म्हणून आपण कंपन्यांना अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देतो आहोत. उद्योग येण्यास कोणीही नाही म्हणणार नाही. परदेशातील कंपन्या या ठिकाणी आल्यानंतर कामगारांची भूमिका त्यांच्यासमोर स्पष्टपणे मांडली गेली पाहिजे. त्याही देशांनी कामगाराना हायर ॲन्ड फायर बेसीसवर न ठेवता किंवा सोमवार ते शुक्रवार पर्यंत काम करावयाचे आणि शनिवार, रविवार कंपन्यामधील कर्मचाऱ्यांना सुटी दिली गेली पाहिजे. त्यांच्या देशात कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शनिवार आणि रविवारी सुटी दिली जाते. त्याप्रमाणे याही ठिकाणी कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन दिवस सुटी दिली गेली पाहिजे. त्यांच्याकडे असलेले पगार आणि आपल्याकडचे असलेले पगार यात तफावत खूप मोठी आहे. उद्योगा बरोबर कामगारांचे देखील हित जोपासण्याची गरज आहे.

या देशातील 3 टक्के कामगार केंद्रात कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली संघटीत आहेत. मी छोटया युनीयन, राज्यातील युनियनच्या बाबतील बोलू इच्छित नाही. परंतु केंद्रीय कामगार

3...



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 15:20

श्री.किरण पावसकर..

संघटनेच्या नेतृत्वाखाली असलेले कामगार फक्त 3 टक्के एवढेच आहेत. 97 टक्के कामगार असंघटीत आहेत. या कामगारांच्या जीवनशैलीवर परिणाम होऊ नये, अशा पध्दतीने आपण उद्योगाकडे पाहिले आणि त्यांना न्याय मिळवून दिला तर महाराष्ट्र उद्योगाच्या बाबतीत क्रमांक 1 वर आहे आणि भविष्यातही क्रमांक 1 वरच राहील.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 68, बाब क्रमांक 81 अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय कार्यालये असलेल्या इमारतींचे परीक्षण व दुरुस्ती यावरील खर्च भागविण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालये, कोषागार कार्यालये, शिधावाटप कार्यालये त्याचप्रमाणे न्यायालयीन इमारतींबाबत सुध्दा विचार झाला पाहिजे. आज तालुका व जिल्हा पातळीवरील न्यायालयीन इमारतींची अवस्था पाहता त्यांच्या दुरुस्तीसाठी अधिक तरतूद करण्याची गरज आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता न्यायालयीन कामावर पडणारा ताण, प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता न्यायालयांसाठी इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याची गरज आहे. उद्योगधंदे वाढतील, त्यामुळे शिस्त येईल, गुन्हे कमी होतील, कायद्याविषयी आदर व भीती निर्माण होईल. परंतु न्यायालयात खटले किती प्रलंबित आहेत, त्यासाठी कोणते इन्फ्रास्ट्रक्चर दिले पाहिजे, वातानुकूलित यंत्रणा, संगणक, जीर्ण इमारतींची पुनर्रचना यासाठी पूरक निधीमध्ये वाढ करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गृह विभाग पृष्ठ क्रमांक 19, बाब क्रमांक 33 अन्वये नाशिक शहर येथे सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही संनियंत्रण बसविण्याकरिता पूरक मागणी सादर केली आहे. आज मुंबई शहरामध्ये 6000 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण झालेले नाही. गुन्हे रोखण्यासाठी या कामाची फार आवश्यकता आहे. सन्माननीय गृहमंत्री, गृह राज्यमंत्री व मुंबईचे पोलीस आयुक्त यांनी लंडनला जाऊन या संदर्भातील कार्यपध्दती पाहिली आहे. त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. त्या समितीने मुंबई शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी टेंडर काढले,ते एल-1 ला देण्यात आले. त्या कंपनीने जी रक्कम शासनाकडे भरणा करायची होती ती अद्याप भरलेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे ती कंपनी बॅक आऊट झाली आहे. आता दुसरी एक कंपनी पुढे आली आहे. परंतु या कामामध्ये विलंब होत आहे. एल-1 असलेल्या कंपनीला केवळ कॅमेरे बसविण्यास देणे एवढ्यापुरते हे टेंडर मर्यादित नाही. त्या कॅमेऱ्यांचे मेन्टेनन्स करणे, सुसज्ज कंट्रोल रुम उभारणे आणि पुढील 5-6 वर्षे कॅमेऱ्यांची देखभाल करणे या दृष्टीने या प्रक्रियेकडे लक्ष द्यावे लागेल. ही प्रक्रिया लांबणीवर जात आहे.

सभापती महोदय, 26.11 ची घटना घडल्यानंतर मुंबई शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत सभागृहात दमदार घोषणा करण्यात आली. परंतु या कामाला टेंडर प्रक्रियेमुळे

..2..

श्री.किरण पावसकर.....

विलंब लागत आहे. मागील वेळी सभागृहात सांगण्यात आले की, दुबईच्या विमानतळावर 6000 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. लंडन, न्यूयॉर्क शहरामध्ये कुठे व किती कॅमेरे बसविले आहेत हे वेळेअभावी मी विस्तृतपणे सांगू इच्छित नाही. परंतु जी टेक्नॉलॉजी उपलब्ध आहे तिचा वापर करण्याबाबत विलंब होता कामा नये. या कामासाठी अधिक तरतूद वाढवावी लागेल.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 16, बाब क्रमांक 20 पोलीस महासंचालक कार्यालयासाठी गुप्त सेवेकरिता आणि साधनसामुग्री खरेदी करण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. मुंबई शहरातील पोलीस वसाहतींची अवस्था अतिशय भयावह झालेली आहे. सातत्याने हा मुद्दा आम्ही सभागृहात मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. मुंबईतील गोरेगाव येथील पोलीस वसाहतीची दुर्दशा झ ालेली असून इमारत पाडण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांना इतरत्र हलविण्यात आले आहे. परंतु त्या जागेवर वसाहतीचा पुनर्विकास तातडीने झाला पाहिजे. वरळी येथील पोलीस वसाहतीचा पुनर्विकास तातडीने करण्यात यावा. 180 चौ.फुटाऐवजी सदनिकेचे क्षेत्रफळ वाढवून दिले पाहिजे. या कामासाठी निधी वाढवून देण्यात यावा अशी विनंती करतो आणि जीर्ण इमारतींचा पुनर्विकास तातडीने करण्यात यावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----------

नंतर 2यू.1...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGJ/ MMP/ KTG/ D/ प्रथम श्री. भोगले....... 15:30

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पाटबंधारे विभागाच्या बाब क्रमांक 116 वर मी सुरुवातीला माझे विचार व्यक्त करणार आहे. शिवशाहीचे सरकार गेल्यानंतर व आपले सरकार आल्यापासून म्हणजे 14 वर्षापासून कोकणात एकाही पाझर तलावाचे काम झालेले नाही. कोकणामध्ये गेल्या 14 वर्षात एकही पाझर तलाव का होऊ शकला नाही, याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले तर मी त्यांचा आभारी राहीन.

सभापती महोदय, कोकणामध्ये लघु पाटबंधाऱ्याचे आर्थिक मापदंड वाढविण्याची आवश्यकता आहे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून ते वाढवले गेले नाहीत. कोकणातील लघुपाटबंधाऱ्याचे आर्थिक मापदंड वाढविण्याच्या संदर्भात त्यावेळचे माननीय पाटबंधारे मंत्री श्री. अजित पवार यांच्या दालनात बैठक झाली होती.शासन निर्णय क्र.23074807 ल.पा.2 दि.3/1/2008 अन्वये जलसंपदा विभागाने निश्चित केल्यानुसार आर्थिक निकष बदलणे अत्यंत गरजेचे आहे. जोपर्यंत आर्थिक निकष बदलत नाही, किंबहुना कोकणासाठी आर्थिक निकष दुप्पट करीत नाहीत तोपर्यंत कोकणाला न्याय मिळणार नाही. महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो त्यातील 40 टक्के पाऊस कोकणात पडतो. मात्र येथील सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते. जोपर्यंत पाटबंधाऱ्याचे, लघु पाटबंधाऱ्याचे निकष बदलणार नाही तोपर्यंत कोकणाला न्याय मिळू शकणार नाही. कोकणातील लघु पाटबंधाऱ्यांच्या संदर्भातील आर्थिक निकष किती दिवसात बदलणार आहात, याची सभागृहाला माहिती दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, कोयनेचे 67 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते. या विषयावर अनेक वेळा या सभागृहात चर्चा झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मला या सभागृहात आश्वासन दिले होते की, कोकणातील पाटबंधाऱ्यासाठी सुरुवातीला 1000 कोटी रुपये देण्यात येतील. हे पाणी रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांमध्ये देण्यात येईल व उर्वरित पाणी मुंबईसाठी वापरले जाईल, अशा प्रकारचे आश्वासन त्यावेळी देण्यात आले होते. परंतु आपल्याच आश्वासनाला हरताळ फासण्याचे काम माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. त्यामुळे कोकण वासियांना न्याय कधी दिला जाणार आहे ? खरे तर हा विषय हक्कभंगाचा होऊ शकतो. महाराष्ट्रात एका बाजूला पाऊस न पडल्यामुळे दुष्काळ पडतो, जनावरे तडफडून मरतात, माणसे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

स्थलांतरीत होतात व दुसऱ्या बाजूला कोकणाचे 67 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते. इतकी मोठी विसंगती आपण का ठेवता ? याचे उत्तर मंत्री महोदयांच्या भाषणातून मिळाले तर अधिक बरे होईल, असे मला वाटते. आर्थिक मापदंड बदलवण्याच्या बाबतीत माननीय श्री. अजित पवार यांच्या दालनात जी बैठक झाली होती, त्या बैठकीमधील डिटेल नोट्स मी आपल्याकडे पाठवितो.

सभापती महोदय, तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवशाहीच्या शासन काळात 35 पाटबंधाऱ्याच्या कामांना मंजुरी दिली होती. त्या 35 पाटबंधाऱ्यांची 14 वर्षानंतर, आज काय स्थिती आहे, याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात द्यावी, अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, खेड तालुक्याचे मी जवळ जवळ 20 वर्षे प्रतिनिधीत्व केलेले आहे. खेड तालुक्यातील पोयनार, मांडवे, तळवट आणि पिंपळवाडी येथील चार धरणाची परिस्थिती आज नेमकी काय आहे, या चार धरणांसाठी आपण किती आणि कधी निधी देणार आहात व या धरणांची व कालव्यांची कामे कधी पूर्ण होणार आहेत याची माहिती उत्तराच्या भाषणात माननीय मंत्री द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, नातू नगर धरणातून जो कालवा जातो तो 95 टक्के गळका आहे. या धरणाचे 95 टक्के पाणी पूर्णपणे वाया जात आहे. या कालव्यातून केवळ 5 टक्केच पाणी शेतीला मिळते. हा विषय मी अनेक वेळा सभागृहात मांडला आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय जलसंपदा मंत्री तसेच माननीय श्री.तटकरे यांनी मला सभागृहात आश्वासन दिले होते की, दुरुस्तीच्या कामासाठी तुम्हाला जितका निधी लागेल तितका निधी तातडीने उपलब्ध करुन दिला जाईल. या प्रश्नाच्या संदर्भात बैठकीमध्ये आश्वासन दिल्यामुळे त्या कामांसाठी टेंडर काढण्यात आले. परंतु अद्याप हा निधी उपलब्ध झालेला नाही. या संदर्भातील फाईल सचिवांकडे येऊन ती आता परत गेलेली आहे. एका बाजूला 95 टक्के पाणी वाया जात असल्यामुळे मी सतत मागणी करीत असतो. तर दुसऱ्या बाजूला आपण कालव्याच्या दुरुस्तीसाठी पैसे देत नाहीत. ही बाब आपल्यासाठी व शासनासाठी निश्चितच शोभादायक नाही. यामुळे कालव्याच्या दुरुस्तीसाठी तत्काळ निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री. भारवि....

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.किरण पावसकर)**

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 48 वर बोलणार आहे. कोकणामध्ये 100 टक्के अनुदानित असलेली फलोद्यान योजना या वर्षा पासून अचानकपणे बंद केल्याचे मला सांगण्यात आले. त्याचे मला फार वाईट वाटले. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे, तर रत्नागिरी जिल्हा हा फलोद्यान जिल्हा आहे, असे चित्र आमच्या डोळ्या समोर काल पर्यंत होते. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी, श्री.सुधाकरराव नाईक यांनी ही योजना सुरू केली होती. 100 टक्के अनुदानावर असलेली योजना तातडीने बंद करण्याची निकड का भासली आहे ? आमच्या कोकणामध्ये विकास करण्याच्या ज्या ज्या बाबी आहेत त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. 100 टक्के अनुदान योजनेतून शेतकरी फलबाग योजना राबवित होते. त्याचे फळ आम्हाला मिळत होते. पण त्याच वेळी ही योजना बंद झाली ही बाब कोकणासाठी निश्चितच भूषणावह नाही. एका बाजूला फळबागांचे नुकसान झाले म्हणून नुकसान देण्यात येत आहे, तर दुसऱ्या बाजूला असलेली योजना बंद करण्यात येत आहे. हे कोकणावर अन्यायकारक आहे. त्यामुळे पहिल्या सारखीच ही योजना ठेवावी अशी माझी आग्रही मागणी आहे. यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा अशी मी विनंती करीत आहे. या प्रश्नासंबंधी माननीय राज्य मंत्र्यांकडून सकारात्मक उत्तर मिळेल अशी अपेक्षा बाळगतो.

यानंतर मी बाब क्रमांक 44 वर बोलणार आहे. कोकणावर फळ प्रक्रिया करणारे उद्योग उभे करण्यासाठीचे अनेक प्रस्ताव आपल्याकडे आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, 1:9 प्रकरणे पाठवावीत. आम्ही कोकणाला न्याय देऊ. अनेक प्रकरणे आपल्याकडे पडलेली आहेत. जांभळापासून वाईन बनविण्यासाठी आलेले प्रस्ताव आपल्याकडे पडून आहेत. हे सगळे प्रस्ताव लालफितीमध्ये अडकलेले आहेत. या प्रस्तावांना आपण न्याय देत नाहीत. त्यामुळे कोकणात फळप्रक्रिया कारखान्यांना प्राधान्य देऊन त्यांचे उत्पादन विकण्यासाठी मुंबईमध्ये चांगले मार्केट निर्माण करावे. अशा प्रकारे डोंगराळ भाग असलेल्या कोकणासाठी आपण विविध योजना राबवून त्याची अंमलबजावणी करणार आहात काय याचे देखील उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे अशी मी विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री व पर्यटन मंत्री यांचे मी बाब क्रमांक 78 वर लक्ष वेधणार आहे. माझी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. मी खेड या तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले आहे. या तालुक्यात रसाळगड किल्ला आहे. या रसाळगडावर बांधकाम झाले आहे. ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. या कामाला जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: भेट दिली. या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असा अहवाल जिल्हाधिकारी यांनी शासनाला दिला आहे. पण त्यासंबंधी शासनाने कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही. रसाळगडाच्या कामात ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल दिला असून त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे, असा माझा प्रश्न आहे. रसाळगडाच्या भोवती देवीचे मंदिर आहे. त्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याबाबतचे पत्र मी आपल्याकडे दिले होते. तेव्हा यासंबंधीचा प्रस्ताव मागवून घेऊन शासन अंमलबजावणी करणार आहे काय ? किल्ले महिपतगड हा खेड तालुक्यातच आहे. या किल्ल्याला जाण्यासाठी कच्चा रस्ता आहे. येथील डांबरीकरण अद्याप झालेले नाही. त्यामुळे पर्यटक तेथे पोहचू शकत नाही. त्यामुळे महिपत रस्त्याची दुरूस्ती करण्याचे काम शासन तातडीने हातामध्ये घेणार आहे काय ?

किल्ले पालगड हा अद्याप संरक्षित केलेला नाही. त्यामुळे या किल्ल्याची फार दुर्दशा झ ाालेली आहे. साने गुरूजींच्या गावाच्या वरच हा किल्ला आहे. आपण नेहमी छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन नेहमी कारभार करतो. त्यामुळे माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, 35 किल्ल्यांची डागडुजी आपण करावी. आपण नेहमी भारतीय पुरातत्व विभागाकडे बोट दाखवत असतो. पण दिल्लीकडून यासंबंधीचा कुठलाही प्रतिसाद आपल्याला मिळत नाही. त्यामुळे शासनाने यामध्ये विशेष लक्ष घातले पाहिजे. एवढेच नव्हे तर वेगळ्या पद्धतीने नियोजन करून छत्रपती शिवाजी महाराजांचे 35 किल्ले व्यवस्थित राहतील याची काळजी घेतली पाहिजे. या किल्ल्यांचा चांगल्या पद्धतीने जीर्णाद्धार केला पाहिजे. त्यासाठी शासनाने वेगळ्या पद्धतीचे नियोजन केले पाहिजे. यासंबंधी शासनाने आपली भूमिका स्पष्टपणे ठेवावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. सभापती महोदय,आपण मला येथे बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो.

यानंतर श्री.अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 129, बाब क्रमांक 137- ग्राम विकास विभाग-कोकणातील अनेक गावांमध्ये रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यामुळे एस.टी.सेवा बंद झालेल्या आहेत. एस.टी.महामंडळाने ग्रामपंचायतीला लिहिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत माननीय मंत्री महोदयांकडे पाठविलेली आहे. रस्त्याची दुरुस्ती झाली नाही तर आम्हाला नाईलाजाने एस.टी.सेवा बंद करावी लागेल असे एस.टी.महामंडळाने ग्रामपंचायतीला लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तेव्हा पत्रात उल्लेखिलेल्या सर्व गावांतील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी येथील भेलसई-गंगवाडी धावडेवाडी ही कुणबी समाजाची वाडी आहे. तेथील रस्त्याची अवस्था अतिशय वाईट आहे. तेव्हा त्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी.

सभापती महोदय, खेड तालुक्यातील बीड- नांदिवली ते व्हहाली हा 14 कि.मी.रस्ता पूर्णपणे नादुरुस्त झालेला असल्यामुळे तेथील एस.टी.सेवा बंद आहे. त्यामुळे लोकांना 10-10 कि.मी.अंतर चालत जावे लागत आहे. तेव्हा या रस्त्याची लवकर दुरुस्ती करण्यात यावी.

सभापती महोदय, खेड तालुक्यातील आंबये नातूनगर हा सात कि.मी.चा रस्ता आहे. त्यातील सहा कि.मी.रस्त्याचे काम झालेले आहे फक्त एक कि.मी.रस्त्याचे काम बाकी आहे. हा रस्ता मुंबई-गोवा महामार्गाला मिळणार असल्यामुळे लोकांचे 20 कि.मी.चे अंतर कमी होणार आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे सहा कि.मी.रस्त्याचे काम झालेले आहे उर्वरित एक कि.मी.रस्त्याच्या कामासाठी 20 लाख रुपये दिल्यास तेथील लोकांना निश्चितपणे न्याय दिल्यासारखे होईल.

सभापती महोदय, जिल्हा रत्नागिरी तालुका खेड येथील धामणी-कदमवाडी येथील एक कि.मी.चा रस्ता करण्यासाठी 10 लाख रुपये द्यावेत अशी विनंती आहे. आपण रस्ता केल्यास स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांना हा रस्ता मिळणार आहे.

सभापती महोदय, धामनंद निवे,ता.खेड,जि.रत्नागिरी हा रस्ता पूर्णपणे नादुरुस्त झालेला असल्यामुळे एस.टी.सेवा बंद झालेली आहे. हा रस्ता तातडीने दुरुस्त होणे आवश्यक आहे. तेव्हा त्यासाठी तातडीने निधी द्यावा अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, चिंचघर मेटकर वाडी ता.खेड, जि.रत्नागिरी येथील पुलाच्या कामासाठी 10 लाख रुपयांची आवश्यकता आहे. पुलापासून वाडीत जाण्यासाठी रस्ता करण्यासाठी 10 लाख रुपयांची आवश्यकता आहे. पुलासाठी आणि रस्त्याच्या कामासाठी एकूण 20 लाख रुपयांची आवश्यकता आहे. शासनाने 20 लाख रुपयांची तरतूद केल्यास स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा त्या गावात गाडी जाऊ शकेल. साधारणत: दोन कि.मी.चा रस्ता आहे. तेव्हा त्याठिकाणी छोटा साकव व रस्ता करण्यासाठी तरतूद करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, जि.रत्नागिरी येथील शिवतर खिडवाडी ते इसापूर चिंचाळी हा खेड आणि दापोली या दोन तालुक्यांना जोडणारा रस्ता आहे. हा रस्ता पूर्णपणे नादुरुस्त असल्यामुळे तेथील एस.टी.वाहतूक बंद आहे. साधारणत: दोन ते अडीच कि.मी.चा हा रस्ता आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी 20 ते 25 लाख रुपये मंजूर करावेत अशी विनंती करतो. आपण मला अधिक वेळ बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

---------

.3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुजफ्फर हुसेन ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 16, बाब क्रमांक 20,21 आणि 22- गृह विभाग- ठाणे जिल्ह्यात वाढणारी शहरे आणि वाढत्या लोकसंख्येचा विचार करता ठाणे जिल्ह्यात असलेले पोलीस संख्याबळ अतिशय कमी आहे. त्या ठिकाणी नवीन पोलीस आयुक्तालय करण्याचा प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. फक्त पाच-सहा ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन्स उभारण्यात आली आहेत.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा होणार आहे. तेव्हा त्या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन्स होणे आवश्यक आहे. त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही. तेव्हा ठाणे जिल्ह्यातील वाढते शहरीकरण विचारात घेऊन त्याठिकाणी असलेल्या पोलीस संख्याबलात वाढ करण्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी विनंती आहे.

पृष्ठ 25, बाब क्रमांक 37- महसूल विभाग - दोन तालुक्यांमसाठी 1 उप विभागीय अधिकारी या प्रमाणे 71 नवीन महसूल उप विभाग निर्माण करण्यासाठी 35 कोटी रुपंयाची तरतूद करण्यात आलेली आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन अजून ऐरणीवर आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा करण्याची घोषणा होऊनही त्याबाबत निर्णय झालेला नाही.

यानंतर श्री .बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुजफ्फर हुसेन....

पालघरमध्ये आदिवासी भाग आणि शहरी भाग अशा दोन्ही भागांचा समावेश असून त्या दृष्टीने जिल्ह्याची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे आहे. माझी या माध्यमातून विनंती आहे की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन लवकरात लवकर करुन पालघर जिल्हा निर्माण करावा आणि नवीन पालघर जिल्ह्याचे सुसंगत नियोजन करावे.

महोदय, अल्पसंख्याक विभागाच्या बाब क्रमांक 228, पान क्रमांक 195 वर मी बोलत आहे. महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याकासाठी ग्रँट इन एडचे नियोजन ग्रामपंचायत, नगर परिषद आणि महापालिका परिसरासाठी प्रस्तावित केले आहे. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो.

महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला अतिरिक्त 50 कोटी रुपयांचे भाग भांडवल उपलब्ध करुन दिल्याबद्दल सुध्दा शासनाने अभिनंदन करतो व येथेच थांबतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सर्वप्रथम मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलू इच्छितो. सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक-79, पृष्ठ क्रमांक-67 वर मी बोलत आहे. महोदय, मुंबई-गोवा महामार्ग चौपदरी झाला पाहिजे यासाठी आपण स्वत: आणि कोकणातील आमदार मंडळी सातत्याने आवाज उठवितात. मी मराठवाड्यातील असलो तरी महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा मुंबई-गोवा महामार्ग जलद गतीने पूर्ण केला पाहिजे अशी मागणी करतो.

महोदय, सध्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे वाहनांची गर्दी होत आहे. त्यामुळे जिल्ह्या जिल्ह्याला जोडणारे प्रमुख मार्ग चौपदरी केले पाहिजे यासाठी आम्ही सातत्याने आवाज उठवितो. या निमित्ताने माझी विनंती आहे की, या संदर्भात धडक कार्यक्रम हाती घेऊन, महाराष्ट्रातील जिल्ह्या जिल्ह्याला जोडणारे प्रमुख मार्ग चौपदरी केले पाहिजेत. आवश्यकता पडल्यास आपण टोल वसूल करावा. लोकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर लोकांचे प्राण वाचण्यास मदत होईल.

महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक-227, पृष्ठ क्रमांक-216 वर मी बोलणार आहे. आज महाराष्ट्रात पर्यटनाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर साईट उपलब्ध आहेत. या ठिकाणी माननीय मंत्री श्री.नारायण राणे उपस्थित आहेत. मध्यंतरी कोकणात सी-वर्ल्ड करण्याची घोषणा करण्यात आली. ते काम कधी पूर्ण होणार आहे, या बाबत सर्वांना उत्सुकता लागली आहे. त्यामुळे ते काम कृती कार्यक्रम आखून विहित मुदतीत पूर्ण केले पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

महोदय, माझ्या मतदारसंघात वेरुळ आणि अजिंठा ही दोन महत्त्वाची पर्यटन स्थळे आहेत. परंतु औरंगाबाद येथून त्या ठिकाणी जाण्यासाठी योग्य वाहतूक व्यवस्था नाही. त्या पर्यटन स्थळी जाण्यासाठी असलेले मार्ग चौपदरी करण्याची आम्ही सातत्याने मागण करीत आहोत. परंतु अद्याप आमची मागणी पूर्ण झाली नाही. या निमित्ताने मी मागणी करतो की, ते मार्ग तातडीने चौपदरी केले पाहिजेत. माननीय पर्यटन मंत्री आणि पर्यटन विभागाने यामध्ये लक्ष घालावे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

महोदय, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. आपणा सर्वांना माहीत आहे की, मुंबई, पुणे, नाशिक या सारख्या प्रमुख शहरांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. परंतु प्रत्येक वेळी सदरहू काम प्रगती पथावर असल्याचे उत्तर मिळते. या निमित्ताने मी मागणी करतो की, लवकरात लवकर सी.सी.टी.व्ही. बसविण्यासाठी आवश्यक त्या ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत.

महोदय, आज पोलीस स्टेशनमध्ये ग्रामीण भागातील आणि सर्वसामान्य माणूस तक्रार करण्यासाठी गेल्यास त्याची तक्रार नोंदवून घेतली जात नाही अशी ग्रामीण भागातील लोकांची आणि गरीब लोकांची तक्रार असते. म्हणून पोलीस स्टेशनचे आधुनिकीकरण आणि संगणकीकरण केले पाहिजे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आणि राज्याचे पोलीस प्रमुख यांना पोलीस स्टेशनमध्ये काय सुरु आहे हे संगणकाच्या माध्यमातून दिसले पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रगतीकडे जात असताना अशा प्रकारचे पाऊल उचलले पाहिजे.

महोदय, महसूल आणि वन विभागाच्या बाब क्रमांक-40, पृष्ठ क्रमांक-28 वर मी बोलत आहे. या ठिकाणी ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न सातत्याने मांडला जात आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ......

त्याचबरोबर आमच्या मराठवाड्यातील बीड जिल्ह्याचे सुध्दा विभाजन करुन अंबेजोगाई आणि बीड जिल्हे झाले पाहिजेत ही मागणी आम्ही सातत्याने सभागृहामध्ये करीत आहोत. त्या दृष्टीकोनातून सुध्दा निर्णय होणे गरजेचे आहे. आज जरी पाऊस चांगला पडत असला तरी तो महाराष्ट्रातील काही ठराविक भागामध्येच पडत आहे. आमच्या मराठवाड्यामध्ये आजही तितकासा पाऊस झालेला नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी दुबार पेरणीचे संकट निर्माण झालेले आहे. आपले सरकार सातत्याने संकटाच्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाते. त्या ठिकाणी जर दुबार पेरणी करावी लागली तर त्या शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 35 वरील बाब क्रमांक 44 बाबत बोलणार आहे. आज पाऊस कमी प्रमाणात पडतो. हे सातत्याने घडत चालले आहे. म्हणून आता आपल्याला पाणी वाचविण्याची गरज आहे. त्याकरिता भविष्यामध्ये शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण ठिबक सिंचनासाठी जी सबसिडी देतो ती वाढविली गेली पाहिजे. ती सबसिडी 90 टक्केपर्यंत केली पाहिजे अशी मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत. एक कृषीपुत्र या कृषी विभागाला लाभलेले आहेत. म्हणून मी त्यांना विनंती करतो की, आपण यामध्ये सहभाग नोंदविला पाहिजे आणि या शेतकऱ्यांना 90 टक्केपर्यंत सबसिडी दिली पाहिजे. जो शेतकरी ऊसाला ठिबक सिंचनाने पाणी देईल त्याला 90 टक्के सबसिडी दिली पाहिजे तसेच इतर पिकांना सुध्दा ठिबक सिंचनासाठी 90 टक्के सबसिडी दिली पाहिजे अशी मागणी मी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 137 वरील बाब क्रमांक 151 बाबत बोलणार आहे. स्वस्त धान्य दुकानांवर जो काळाबाजार होतो त्या विषयी सुध्दा सातत्याने सभागृहामध्ये चर्चा होते. आम्ही सातत्याने मागणी केलेली आहे की, एखाद्या स्वस्त धान्य दुकानावर किती माल आलेला आहे, त्याचे दर काय आहेत याचा फलक त्या ठिकाणी लावला पाहिजे. रोजच्या रोज किती स्टॉक शिल्लक राहिलेला आहे याची नोंद त्या ठिकाणी असली पाहिजे जेणेकरुन त्या ठिकाणी येणाऱ्या सामान्य माणसाला ते कळू शकेल. या दृष्टीकोनातून सुध्दा शासनाने नोंद घेतली घ्यावी अशी मी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

सभापती महोदय, यानंतर मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 176 वरील बाब क्रमांक 182 बाबत बोलणार आहे. आज हजारो होमियोपॅथी डॉक्टर्स आझाद मैदानावर मोर्चा घेऊन आलेले आहेत. आम्हाला प्रॅक्टीस करु द्या, आम्हाला औषधे द्या, अशी त्यांची मागणी आहे. हे होमियापॅथी डॉक्टर्स ग्रामीण भागामध्ये जाऊन गोरगरीब रुग्णांची सेवा करीत आहेत. म्हणून या बाबतीत शासनाने लक्ष घातले पाहिजे आणि होमियोपॅथी डॉक्टरांचा प्रश्न सोडविला पाहिजे.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये ग्रामीण भागात कमी पाऊस झालेला आहे. आज आमच्या मराठवाड्याचे वरदान असलेल्या जायकवाडी प्रकल्पामध्ये जो मायनस डेडस्टॉक असतो त्यापेक्षाही पाण्याची पातळी खाली गेलेली आहे. त्यामुळे आज कोणताही भेदभाव न करता वरच्या धरणांमध्ये जे काही पाणी अडलेले आहे ते खाली सोडण्याचे काम, जायकवाडी धरणामध्ये सोडण्याचे काम मानवतेच्या दृष्टीकोनातून झाले पाहिजे. 'अजिबात नाही' वगैरे म्हणण्याचे कारण नाही. ज्यावेळी आपण विधान परिषदेच्या सभागृहामध्ये येता तेव्हा संपूर्ण महाराष्ट्राचे असता. आपण कोणत्याही एका जिल्ह्याचे किंवा तालुक्याचे असत नाही. त्यामुळे असा भेदभाव होता कामा नये. नाही तर राजीनामा दिला पाहिजे आणि बाहेर रस्त्यावर जाऊन ओरडले पाहिजे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पर्यटन विभागाच्या बाब क्रमांक 78 बाबत बोलणार आहे. यामध्ये वांद्रे येथील शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद बऱ्याच वर्षानंतर केलेली दिसते. बरेच दिवस तेथील सरकारी कर्मचारी अशी मागणी करीत होते की, शासकीय निवासस्थाने बदलून त्या ठिकाणी दुसऱ्या बांधकामांना परवानगी देऊ नये. त्यामुळे शासकीय कर्मचारी आता तेथेच राहणार आहेत असे आपल्या दुरुस्तीच्या खर्चावरुन दिसून येते. हे महत्वाचे आहे. माझी तर पुढे जाऊन अशी मागणी आहे की, त्या ठिकाणी शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानातील ज्या इमारती मोडकळीस आलेल्या असतील त्यांचा पुनर्विकास करुन त्या ठिकाणी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी व्यवस्था केली जावी. या दृष्टीकोनातून सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी लक्ष वेधते.

सभापती महोदय, यानंत मी बाब क्रमांक 80 आणि 81 बाबत बोलणार आहे. यामध्ये विविध मार्ग आणि पूल यासाठी मोठी तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 15:55

डॉ.नीलम गोऱ्हे....

मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे की, रस्ते व पूल यासाठी काही निधीची तरतूद केलेली आहे. लोकांना पायाभूत सोयी सुविधा देण्याची तरतूद केली जाते. यामध्ये हाय-वेचा समावेश आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल व नगरविकास विभाग या विभागांचा समन्वय नसल्यामुळे किती प्रश्न निर्माण होतात त्याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे पुण्यामध्ये शिंदेवाडी येथे टेकडी फोडत फोडत गेल्यामुळे पावसाच्या पाण्याचा लोंढा आला होता. त्याबाबत नॅशनल हाय-वे ॲथोरिटीचे असे म्हणणे आहे की, नगरपालिकेला व जिल्हा प्रशासनाला आम्ही नोटीस दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, अतिक्रमण करणाऱ्यांविरुध्द जिल्हा प्रशासनाने वारंवार नोटिसा बजावलेल्या आहेत. प्रत्यक्षात असे निदर्शनास येते की, कोट्यवधी रुपये खर्च करुन नॅशनल हाय-वे ॲथोरिटीकडून आयआरबी किंवा रिलायन्स कंपनी या सारख्या कंपन्यांवर रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी टाकली जाते. त्यावेळी त्यांच्या कराराचे पुनर्विलोकन न केल्यामुळे त्यांनी केलेला राडारोडा असेल, बाजूच्या मोऱ्या बंद केलेल्या असतील, त्याकडे लक्ष दिले पाहिजे. किंबहुना, मी त्या पुढे जाऊन असे म्हणेन की, माननीय सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्र्यांनी, माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी सातत्याने गेली 10 वर्षे अशी आश्वासने दिलेली आहेत की, जेथे रस्ते होतील त्या ठिकाणी प्रत्येक 80 कि.मी.वर स्वच्छतागृहे बांधली जातील. मुंबई-पुणे या एक्सप्रेस-वे ची एक बाजू सोडली तर बहुतेक कोठेही कंत्राटदाराने कराराप्रमाणे स्वच्छतागृहे बांधलेली नाहीत. महिला किंवा पुरुष प्रवासी असतील त्यांना कोणत्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देतो याचा विचार करण्याची गरज आहे.

प्रत्येक वेळी कोर्टाचा अवमान झाल्या प्रकरणी आम्ही कोर्टात जायचे काय ? रस्ते बांधण्यासाठी शासनाकडून निधी दिला जातो, त्या निधीतून बांधल्या गेलेल्या रस्त्यावरुन लोकांनी प्रवास कसा करावयाचा असा प्रश्न निर्माण होतो. मुंबई-पुणे या एक्सप्रेस-वे वर बांधकाम चालू आहे, राडारोडा ठिकठिकाणी पडलेला आहे. त्यामुळे ट्रॅफिक जाम होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची ही जबाबदारी आहे. पुन्हा त्या विभागासाठी निधीची व्यवस्था केली जाते. त्यावेळी या करारांची तपासणी कोणाकडून केली जाते या महत्वाच्या प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

बाब क्रमांक 81 वर मी बोलणार आहे. गेल्या वर्षी या कामासाठी केंद्र सरकारकडून 90 टक्के रक्कम मिळाली होती. ती रक्कम खर्च होऊ शकली नाही. हा निधी दुर्गम भागातील रस्ते

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

विकासासाठी दिलेला असताना तो खर्च झाला नाही. त्यामुळे शासनाला शहरातील मोठे रस्ते व उड्डाणपूल करण्यामध्येच रस आहे का असा प्रश्न निर्माण होतो.

बाब क्रमांक 86 व 87 अन्वये 699 कोटी 99 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. या मागणीद्वारे 12,648 कामे सुरु होणार आहेत. सरासरी 5 लाख रुपयांचा निधी प्रत्येक कामासाठी खर्च होणार आहेत. 5 लाख रुपयांमध्ये किती रस्त्यांची दुरुस्ती होणार आहे ? त्यामुळे पुढील काळामध्ये या निधीतून दुरुस्त केलेल्या रस्त्यांबाबतचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे गरजेचे आहे.

बाब क्र.101 अन्वये मुलींच्या वसतिगृहासाठी शासनाने निधीची तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानते. बाब क्रमांक 107 अन्वये वरळी येथील पोदार महाविद्यालयाच्या भिंतीच्या दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात आली आहे, त्याबद्दलही मी शासनाचे आभार मानते.

गृह विभागाने बाब क्रमांक 30, 31 व 32 अन्वये तुरुंगांमध्ये सुधारणा करण्यासाठी मागणी केलेली आहे. आम्ही कारागृहाची पाहणी केली असता व्हीव्हीआयपी कैद्यांसाठी व सामान्य कैद्यांसाठी असलेल्या खोल्यांमध्ये खूप विषमता दिसून येते. तुरुंगांमध्ये आतील बाजूमध्ये सीसीटीव्हींची गरज आहे असे दिसून येते. डान्स बारसंबंधी कोर्टासमोर मांडावयाच्या भूमिका विचार करण्यासाठी गृह विभागाचे दोन्ही मंत्री महोदय सभागृहाच्या बाहेर गेले असावेत असे मला वाटते.

बाब क्रमांक 33 अंतर्गत नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी सीसीटीव्हीची व्यवस्था केलेली आहे. सभागृहात याबाबत चर्चा झाली होती. भाविक नाशिक येथील कुंभमेळ्याला येतात तसेच ते त्र्यंबकेश्वरलाही लक्षावधी लोक जात असतात. त्यामुळे त्र्यंबकेश्वर, शनिशिंगणापूर व शिर्डी या सर्व ठिकाणी सुरक्षिततेच्या व्यवस्था करणे गरजेचे आहे.

रोजगार हमी योजना विभागाच्या बाब क्रमांक 139, 144, 148 व 149 वर मी बोलणार आहे. सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री डॉ.नितीन राऊत हे आता सभागृहात आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यासंबंधी वर्तमानपत्रात ज्या बातम्या छापून येत होत्या त्या खोट्या असाव्यात असे मला वाटते.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 16:00

डॉ. नीलम गो-हे....

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

बुलढाणा जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजनेवरील एका मजुराने आत्महत्या केली अशी माहिती समोर आलेली आहे. मला वाटते जगण्याची सक्त मजुरी आणि मरण्याची हमी अशी आज राज्यात परिस्थिती निर्माण झालेली आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये मजुराच्या झालेल्या आत्महत्येची चौकशी करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, उद्योग, बंदरे आणि रोजगार यासाठी बाब क्रमांक 136मध्ये पायाभूत सुविधासाठी 123 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. मला या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की राज्यातील अनेक औद्योगिक वसाहती बंद पडलेल्या आहेत. मुंबई-दिल्ली कॉरिडॉरसाठी अनेक गावांनी विरोध केलेला आहे. या प्रकल्पामध्ये सुपीक जमीन जात असल्यामुळे 78 गावातील शेतक-यांनी या प्रकल्पाला विरोध केलेला आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ, कार्ले येथील एसईझेड रद्द करण्यात आला. परंतु त्या जमिनीवरील एमआयडीसीची नावे काढली गेली नाहीत. याबाबतीत पुनर्विचार झाला पाहिजे.

महसूल व खार जमिनी विभागाच्या बाब क्रमांक 36मध्ये शासकीय जमिनीचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. अनेक ठिकाणी टेकड्यांवर अतिक्रमण केली जात आहेत. या जागांचे संरक्षण करण्याची जबाबदारी महसूल विभागाची आहे. हे संरक्षण करण्यामध्ये महसूल विभाग कमी पडत आहे की काय असे वाटायला लागले आहे.

वने, पुनर्वसन आणि मदत कार्य या संदर्भातील बाब क्रमांक 43मध्ये भूकंप पुनर्वसनासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने माननीय डॉ. पतंगराव कदम यांना सांगू इच्छिते की आपण पुणे जिल्ह्यातील चासकमान प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात बैठक घेतली आणि आम्हाला आश्वासन देखील दिले. प्रश्न समजून घेतल्यानंतर तो तडीस नेण्याचा मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांचा खाक्या आहे. तेव्हा धरणग्रस्तांच्या संदर्भात आपण घेतलेल्या बैठकीतील जे काही प्रश्न राहिलेले आहेत ते डिसेंबर 2013 पर्यंत सोडवावेत. तसेच पुणे जिल्ह्यातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील धरणग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी वेगाने कार्यक्रम हाती घ्यावेत अशी मी विनंती करते. या धरणग्रस्तांचे प्रश्न 30-30 वर्षापासून प्रलंबित आहेत. कोर्टाने देखील शासनाला आदेश दिलेले आहेत. कोर्टाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करावी अशी माझी मंत्री

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

महोदयांना विनंती आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 147 मध्ये यात्रा स्थळांच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु कोणत्या यात्रास्थळांसाठी तरतूद केलेली आहे याचा उल्लेख केलेला नाही. ईश्वराला जसा थेट नमस्कार केला जातो तशा प्रकारे हा निधी थेट ईश्वराला अर्पण केला जाणार आहे का ? कोणत्या यात्रास्थळांसाठी हा निधी दिलेला आहे हे स्पष्ट होण्याची गरज आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 138मध्ये सहायक गट विकास अधिका-यांच्या 153 पदांसाठी तरतूद केलेली आहे. आता हे जे सहायक गट विकास अधिकारी नेमलेले आहेत त्यांना अद्याप जॉब-चार्ट देण्यात आलेला नाही. गट विकास अधिका-याने कोणती कामे करायची आणि सहायक गट विकास अधिका-यांनी कोणती कामे करायची याचा जॉब-चार्ट नसल्यामुळे सहायक गट विकास अधिकारी बसून आहेत.म्हणून यांना जॉब-चार्ट देण्याची गरज आहे. जिल्हा परिषदेमध्ये नवीन जागा निर्माण करण्याकरिता तरतूद करण्याची गरज आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

जॉब चार्ज दिल्याशिवाय ॲडीशनल बी.डी.ओ.ना काम करणे शक्य नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 145 संदर्भात मी माझे विचार व्यक्त करीत आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या रस्त्यांच्या कामांना निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. गट-अ आणि गट-ब मध्ये जो काही निधी येतो, तो निधी कधीही सम प्रमाणात वाटप होताना दिसून येत नाही. विशिष्ट तालुक्यात गट-1 साठी जास्त निधी येतो, दुसऱ्या तालुक्यात कमी येतो, गट-ब च्या कामासाठी देखील तशीच परिस्थिती आहे. प्रत्येक तालुक्यात अट-अ आणि गट-ब च्या कामासाठी सम प्रमाणात शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 147, तीर्थक्षेत्र विकासासंदर्भातील आहे. बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यात तीर्थक्षेत्राचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. ब-गटात या तीर्थक्षेत्रातील वर्गीकरणातील प्रकरणे साधारणपणे तीन-तीन वर्षापासून प्रलंबित आहेत. सर्व कागदपत्रे दिल्यानंतरही त्या तीर्थक्षेत्रांचे वर्गीकरण ब-वर्गात न झाल्यामुळे तरतूद खर्च झालेली नाही. या कामासाठी तरतूद प्राप्त झालेली आहे. परंतु तीर्थक्षेत्राचे वर्गीकरण ब-वर्गात न झाल्यामुळे ती तरतूद अद्यापही खर्च होऊ शकलेली नाही.

सभापती महोदय, कृषी विभागाची बाब क्रमांक 148 च्या अनुषंगाने मी बोलतो आहे. कृषी विभागाने काल सिमेंट बंधारे मंजूर केले आहेत. आता त्या बंधाऱ्यांच्या कामांचे टेंडरींग करण्याच्या कामास सुरुवात करण्यात येत आहे. कृषी विभागाकडून जाणीवपूर्वक त्या बंधाऱ्यांच्या कामांचे टेंडरींग काढण्याचे काम करण्यात येत आहे, कृषी विभागातील सुपरवाझर्सना काम करण्याची संधी मिळणार नाही. राज्याचे माननीय मुख्यमंत्री बीड येथे आले होते त्यावेळचे आणि मे, एप्रिल महिन्यात मंजूर झालेले सिमेंट बंधारे कृषी विभागाने जाणीवपूर्वक टेंडरींग करावयास लावले आहेत. ऑन लाईन टेंडरींग होईल. त्यात विभागाचा व्यक्तिगत इंटरेस्ट संपणार आहे. या कामांचे टेंडरींग मंजूर झालेले होते, त्या कामांसाठी जिल्हाधिकारी स्तरावर निधी प्राप्त झाला होता. जुन्याच पध्दतीने सिमेंट बंधाऱ्यांची कामे करण्याची परवानगी द्यावी अशा प्रकारचा प्रस्ताव अतिशय धाडसाने पुन्हा एकदा शासनाकडे पाठवितो आहोत. परंतु सदर बंधाऱ्याचे नव्याने टेंडरींगचे काम

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

हाती घेतले असल्यामुळे ती कामे होऊ शकली नाहीत. या पावसाळयात या सिमेंट बंधाऱ्यांचा लाभ काही गावांना मिळणार होता, तो मिळू शकला नाही.

सभापती महोदय, मी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती करतो की, त्या एस्टीमेटमध्ये शिरपूर पॅटर्न प्रमाणे खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामे जाणीवपूर्वकरित्या हाती घ्यावीत. त्यासाठी नव्याने तरतुदी करणे गरजेचे आहे. या वर्षी तालुका मार्केट कमिटीच्या वतीने आम्ही 24 बंधाऱ्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम केले. त्याचा परिणाम अतिशय चांगला झालेला आहे. भविष्यात जे काही बंधारे होतील, त्यासाठी दरवर्षी तरतूद करण्यात यावी. या सिमेंट बंधाऱ्यांच्या कामाच्या बाबतीत शासनाने काही अटी घालून दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणी सिमेंट बंधारे घ्यावयाचे असतील, तर त्यासाठी अटी टाकलेल्या आहेत. टॅंकरची गावे आहेत, फेब्रुवारी महिन्यात ज्या गावास टॅंकरने पाणी पुरवठा केला जातो, त्या गावांचा प्रथम समावेश केला जावा, मार्च आणि एप्रिल मध्ये टॅंकरने पाणी पुरवठा होत असलेल्या गावांचा नंतर समावेश करावा. आपण साखळी बंधारे करण्याचे ठरविले होते, परंतु तसे न करता एका गावाला एक बंधारा देता, दुसऱ्या बाजूच्या गावाला दुसरा बंधारा देता. म्हणून आपला जो मूळ हेतू आहे, त्या हेतूला न्याय दिल्यासारखे होणार नाही असे माझे स्पष्ट मत आहे. या संदर्भात शासनाने जे निकष घालून दिलेले आहेत, त्या निकषाच्या बाबतीत पुनर्विचार करावा.

सभापती महोदय, जलसंपदा विभाग म्हणतो ते काम आमच्याकडे नाही आणि कृषी विभाग म्हणतो ते काम आमच्याकडे नाही. जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्याची लांबी 132 कि.मी.आहे आणि 45 हजार हेक्टर एवढे त्याचे लाभक्षेत्र आहे. मागील 20 वर्षापासून लाभक्षेत्रातील नाल्यांची सफाई झालेली नाही. त्या कालव्याचे पात्र उथळ होत चालले आहे. त्या कालव्याच्या आजूबाजूला बेशरमाच्या झाडे मोठया प्रमाणात वाढली आहेत. त्या लाभक्षेत्रात नदी, नाले, ओढे आहेत. वास्तविक पाहता महाराष्ट्र सिंचन कायदा 1976 मधील कलम 19, 20 आणि 21 नुसार लाभक्षेत्रातील नदी, नाले, ओढे यांची साफसफाई करण्याची आणि त्यांची दुरुस्ती करण्याची जबाबदारी पाटबंधारे विभागाची आहे.

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

इतर ठिकाणी नदी नाल्यांचे रुंदीकरण व साफसफाईचे काम होत असताना दिसून येत आहे. परंतु मराठवाड्यातील बहुतांश जिल्हयांमध्ये ही कामे सुरु होताना दिसत नाहीत. बीड जिल्हयावर निश्चितपणे मोठया प्रमाणात अन्याय होत असल्याचे स्पष्टपणे दिसते. या मागणीच्या निमित्ताने मी जलसंपदा मंत्र्यांना विनंती करतो की, या संदर्भात तातडीने निर्णय घेऊन बीड जिल्हयाला न्याय मिळवून द्यावा.

सभापती महोदय, ग्रामविकास विभाग, बाब क्रमांक 142, पंचायत समित्यांच्या जागा त्यांच्या नावावर झालेल्या नाहीत. पीटीआर वर किंवा 7/12 वर नोंद झालेली नाही. 7/12 कोरा आहे. या जागा पंचायत समित्यांच्या नावावर करण्याच्या हेतूने गेवराई पंचायत समितीने दाखल केलेल्या प्रस्तावानुसार व्हॅल्यूएशन 7.23 कोटी रुपये काढण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून पंचायत समितीला ते पैसे भरण्यास सांगितले जात असेल तर ती जागा पंचायत समितीच्या नावावर कधीही होऊ शकणार नाही. त्या जागेवर एखाद्याने अतिक्रमण केले आणि उद्या उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली तर दस्तऐवज पंचायत समितीच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नावे नसतील तर अतिक्रमण दूर करणे अडचणी होणार आहे. त्या इमारतीची पुनर्रचना बीओटी अंतर्गत करणे गरजेचे आहे. 1952 साली बांधकाम करण्यात आले होते, आज ती संपूर्ण वास्तू गळत आहे. बीओटी अंतर्गत जागा नावावर नसल्याने काम करणे अडचणीचे होत आहे. म्हणून मी ग्रामविकास विभागाला विनंती करतो की, जागा पंचायत समितीच्या नावावर करीत असताना गव्हर्नमेंट टू गव्हर्नमेंट ट्रान्सफर करीत असल्यामुळे पैसे भरण्याचा आग्रह न धरता पीटीआर अथवा 7/12 वर पंचायत समितीचे नाव दाखल करण्याची कार्यवाही करावी एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्रमांक 80 सार्वजनिक बांधकाम विभाग. पुणे शहरातून जाणाऱ्या सोलापूर महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे. ठेकेदाराने वाहतूक सुरळीत करण्यासाठी कोणतीही खबरदारी घेतलेली नाही. याकरिता पुरेसा निधी देऊन वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाय योजना करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पुणे-मुंबई दृतगती मार्गावरील अपघातामध्ये वाढ होत आहे. सुरक्षित वाहतुकीसाठी करावयाच्या उपाययोजनांचा वेग मंदावला आहे. मधल्या काळात मोठया प्रमाणात अपघात झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पवनचौकी ते ओझर्डे या 2.5 कि.मी.च्या मार्गावर बायफेल वायर रोपचे संरक्षण कठडे बसविले आहेत. त्याची उपयुक्तता सर्वांना माहित झाली. शासनाने 50 कि.मी.मध्ये अशा प्रकारचे संरक्षण कठडे बसविण्याचा निर्णय घेतला. परंतु निधीअभावी सदरचे काम थांबले आहे. या कामासाठी पुरेसा निधी देऊन लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पुणे शहरातील नर्स स्टॉप चौकातील वाहतूक सुधारणा व वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी तेथे उड्डाणपूल होणे आवश्यक आहे. हे काम सुध्दा लवकर करावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, गृह विभाग बाब क्रमांक 21. पुणे शहरात वाहतूक विभागाच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ट्रॅफिकॉम प्रायोगिक तत्वावर राबविली होती. सदर प्रस्ताव जुलै, 2011 पासून शासनाकडे प्रशासकीय मान्यता व निधीसाठी प्रलंबित आहे. गृह विभागाने याबाबत अनेकदा मागणी करुनही सुध्दा चांगली योजना आहे, निधी सुध्दा कमी लागणार आहे, या ट्रॅफिकॉम योजनेला ताबडतोब मान्यता देऊन निधी मंजूर करावा अशी विनंती करतो.

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

सभापती महोदय, औंध येथे वाहतूक मुख्यालयासाठी प्रशासकीय मान्यता व इतर कामांसाठी एकंदर 7 कोटी रुपये खर्च येणार आहे. पुरवणी मागण्यांमध्ये काही रक्कम मंजूर करुन पहिल्या वर्षी ती दिली तरी देखील सदर काम सुरु होऊ शकते. त्याच प्रमाणे वाहतूक पोलीस विभागाच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीत वाहतूक पोलीस विभागाला 5 गुंठे जागा आणि निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव सुध्दा प्रलंबित आहे. तो लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी विनंती मी या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदय,पुणे पोलीस आयुक्तालयाने मागील वर्षी वाहतूक शाखेकरिता 422 नवीन पदांचा प्रस्ताव शासनाला सादर केला. तसेच वित्त विभागाच्या धोरणा प्रमाणे 40 जीप, 5 लाईट व्हॅन, पेट्रोलींगसाठी 154 बाईक्स व बरिकेडस, 2 ट्रक आणि 1 बसची मागणी जुलै, 2009 पासून शासनाकडे केली असून ही मागणी निधी अभावी प्रलंबित आहे. त्यामुळे ही बाब गृह खात्याने लवकरात लवकर मंजूर करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, पुणे शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता, पुणे शहरासाठी 10 हजार पोलीस जवानांची आवश्यकता असतांना दर वर्षी पोलिसांची थोडया थोडया संख्येने भरती केली जाते. पुणे शहरासाठी 1000 पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो. तसेच, पुणे शहराच्या हद्दीकरिता 11 पोलीस ठाण्यांच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, तो देखील लवकरात लवकर मान्य करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पुणे शहर हे व्हीआयपींसाठी एक महत्वाचे केंद्र झालेले आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार, राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार, सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, अनेक राज्याचे मुख्यमंत्री अशा अनेक व्हीआयपींची वर्दळ पुणे शहरामध्ये असते. या व्हीआयपींचे संरक्षण करण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा पाहिजे. शासनाकडून सर्व व्हीआयपींना झेड सुरक्षा पुरवली जाते. परंतु या सुरक्षा व्यवस्थेमध्ये मनुष्यबळाचा आणि सुरक्षा साधनांचा अभाव आहे. व्हीआयपींच्या सुरक्षेसाठी 3000 सी.सी.च्या वाहनांची आवश्यकता असताना सध्या पोलिसांकडे केवळ 1000 सी.सी.ची वाहने उपलब्ध आहेत. व्हीआयपींना जे वाहन दिले जाते, त्याची क्षमता 3000 सी.सी.असते व एस्कॉर्टच्या वाहनाची क्षमता 1000 सी.सी. असते. त्यामुळे व्हीआयपींची गाडी पुढे आणि एस्कॉर्ट मागे अशा परिस्थितीत आपण व्हीआयपींची सुरक्षा व्यवस्था कशी करणार ? यामुळे शासनाने तातडीने 150 कर्मचारी, अत्याधुनिक शस्त्रे आणि वाहने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

उपलब्ध करुन द्यावीत, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मागणी क्रमांक बी-5,बाब क्रमांक 30 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सध्या राज्यातील कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी आहेत. नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, सिंधुदुर्ग व जालना या ठिकाणी 5नवीन कारागृहे बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. या 5 ठिकाणी तातडीने कारागृह बांधण्याची मान्यता देऊन त्याकरिता निधी मंजूर करावा एवढी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या संदर्भात आपण अनेक वेळा या सभागृहात चर्चा केलेली आहे. पुणे येथे दिनांक 1 ऑगस्ट रोजी बालगंधर्व चौकात बॉम्बस्फोट झाला. जर्मन बेकरी येथे देखील बॉम्बस्फोट झाला. पुण्यामध्ये अतिरेकी सातत्याने हल्ले करीत आहेत. पुणे शहर हे अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर आहे. असे असतांना पुणे शहरामध्ये सी.सी.टी.व्ही. लावण्याकरिता आपण आणखी किती दिवस वाट पाहणार आहात ? सी.सी.टी.व्ही.चे टेंडर काढण्यात आले, सर्वात कमी किमतीचे टेंडर मिळाले नाही. माननीय गृहमंत्री यांनी सी.सी.टी.व्ही.ची पाहणी करण्यासाठी लंडन शहराला भेट दिली होती. पुणे शहराच्या सी.सी.टी.व्ही.करिता ओपन मार्केट मधून टेंडर मागवावे. पुण्याामध्ये जनतेच्या सुरक्षेसाठी या गणेशोत्सवाच्या अगोदर सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसवण्याचे काम लवकरात लवकर मार्गी लागावे,अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, महसूल विभाग मागणी क्रमांक सी-1,बाब क्रमांक 37 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. पुणे परिसरात विशेषत: दौंड येथे पैसे भरुनही जमिनीची जलद मोजणी केली जात नाही. पुणे जिल्हा ग्राहक मंचाने सुध्दा याबाबतीत एक निकाल दिलेला आहे. जमीन मोजणीसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग नेमण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पुणे शहरातील माजी सैनिकांच्या नावाने वीर माता,वीर पत्नींच्या ज्या मिळकती आहेत, त्यांना सर्वसाधारण करातून माफी मिळवण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने 2009 मध्ये मान्यता देऊन प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. माननीय श्री. बाळासाहेब थोरात यांना माझी विनंती आहे की, वीर सैनिकांच्या माता आणि पत्नीसाठी महानगरपालिकेतून पैसा दिला जातो. यामुळे शासनावर काहीही भार येणार नाही. गेल्या चार वर्षापासून हा विषय महसूल विभागाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे शासनाने या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी...

यानंतर मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 183 वर बोलणार आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आरक्षणाप्रमाणे उमदेवार मिळत नाही, जात वैधता प्रमाणपत्र नाही, निम्न संवर्गात अर्हता प्रात उमेदवार नाही, कागदपत्रे नाहीत अशा क्षुल्लक कारणांवरून 944 पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर, आम आदमीच्या उपचारावर, विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर विपरित परिणाम होत आहे. तसेच, राज्यातील 7 नवीन महाविद्यालयामध्ये भरती विषय कार्यवाही केलेली नाही. ही पदे भरली नाहीत तर त्या महाविद्यालयांचा आपल्याला काय उपयोग होणार आहे, त्याबाबत देखील वैद्यकीय शिक्षण विभागाने विचार करणे महत्त्वाचे आहे.

यानंतर मी मदत व पुनर्वसन विभागाच्या बाब क्रमांक 40 व 41 वर बोलणार आहे. एका महिन्यापूर्वी मुंबई-बंगळूरू हायवेवरील कात्रज टेकडीवर अपघात झाला होता. कात्रज टेकडीवर शिंदेवाडी येथे टेकडीफोड केल्यामुळे एका निरपराध मातेचा आणि तिच्या बाळाचा मृत्यू झाला. यात या दोघांचा काहीही संबंध नव्हता. ज्याने कात्रजचा संपूर्ण डोंगर फोडला तेव्हा महसूल खात्याचे सर्व अधिकारी झोपले होते. पावसाच्या पूरामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या या मायलेकींचा मृत्यू झाला. शासनाच्या हलगर्जीपणामुळे आई आणि मुलगी मृत्युमुखी पडली आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, मदत आणि पुनर्वसन विभागाने या दोघांच्या कुटुंबांना मदत केली पाहिजे. कोणतेही कारण नसताना त्यांचा जीव जात असेल तर त्यासाठी शासनाने गंभीरपणे पावले उचलली पाहिजेत व त्यांना मदत करण्याचे जाहीर केले पाहिजे अशी मी येथे मागणी करतो.

यानंतर मी जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 158 वर बोलणार आहे. राज्यातील 493 धरणाच्या दुरूस्तीला निधी देण्यात यावा. वरसगाव, दूधगंगा, या जुन्या धरणाच्या दुरूस्तीसाठी निधी मिळत नसल्यामुळे या धरणातून गळती थांबलेली नाही. यासाठी आपण तातडीने 100 कोटी रूपये मिळावेत म्हणून जलसंपदा विभागाने मागणी केली आहे. ती शासनाने मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी....

आमच्या पुणे शहराला खडकवासला धरणातून पाणी पुरवठा होता. खडकवासला धरणापासून पुढे असलेला 20 किमीचा मोठा कालवा या शहरातून जातो. त्या कालव्याच्या माध्यमातून पुणे शहराला 35 टक्के पाणी पुरवठा होतो. तो कालवा धोकादायक झाला आहे, असा रिपोर्ट आलेला आहे. परवा म्हणजे रविवार भैरोबा नाल्या वरील जल सेतू जवळ कालाव्याचा बांध फुटला. त्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले. या कालव्याची आपण दुरूस्ती केली नाही तर हा कालवा लवकरच फुटून जाईल. त्यामुळे पुणे शहराचा पाणी पुरवठाच बंद होईल. अशी धोकादायक परिस्थिती येथे निर्माण झाली आहे. यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने उपाययोजना करावी.

यानंतर मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 151 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. केवायसी नसल्यामुळे 8 लाख 42 हजार गॅस जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. त्या पूर्ववत सुरू करण्यात याव्यात. तसेच पुणे शहरातील बीपीएल शिधावाटप पत्रिकाधारकांना मार्च पासून तांदूळ मिळत नाही त्यासंबंधी तातडीने पुरवठा करावा अशी मागणी मी करतो आणि येथेच थांबतो.

..................................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (राज्यपालांद्वारे नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने मला काही महत्त्वाच्या विभागांवर बोलावयाचे आहे.

मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 30 व 32 वर बोलणार आहे. आपल्या येथील तुरुंगाची अवस्था फारच वाईट आहे. आम्ही पुण्यातील महिला कैद्यांची पाहणी केली. तेथे तर अत्यंत खराब अवस्था आहे. पुरूष व महिला कैद्यांसाठी असलेले टॉयलेटस त्यांना पुरणारे नाहीत. तसेच त्यांच्या अंथरूण-पांघरूणाची देखील दुर्दशा आहे. त्यासाठी खास तरतूद करणे आवश्यक आहे. तुरूंगातील सोयी सुविधात वाढ करण्यासाठी आपण तरतूद दाखविली आहे. ती तरतूद पुरेशी आहे असे मला वाटत नाही.

यानंतर मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 21 वर बोलणार आहे. शहरातील पोलिसांची घरे आपण बघतो. आज पोलिसांचे कामाचे तास जास्त आहेत. त्यांच्या कुटुंबासाठी चांगले घर असणे आवश्यक आहे. त्यांच्या घरासाठी फारशी तरतूद करण्यात आलेली नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

सभापती महोदय, सुरक्षिततेच्या दृष्टीने कुंभमेळयासाठी नाशिक येथे सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. तसेच मुंबई, पुणे, नाशिक आणि अन्य मोठ्या शहरांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे आवश्यक आहे.

महसूल व वन विभाग - सन 2000 मध्ये संजय गांधी नॅशनल पार्क येथील 79 हजार घरे तोडली होती. त्यातील फक्त 33 हजार घरांचे पुनर्वसन करण्यात आले. न्यायालयात 7 हजार रुपये भरल्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्यात आले होते. चांदिवली येथे 12 हजार लोकांचे जबरदस्तीने पुनर्वसन केलेले आहे. त्याठिकाणी डोंगर फोडून पुनर्वसन केलेल आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्या लोकांचे पश्चिम उपनगरामध्ये पुनर्वसन व्हावे अशी माझी मागणी आहे. तसेच तेथील सर्व्हे क्रमांक 239 येथे अत्यंत गैरप्रकार/धंदे चालत आहेत. त्या ठिकाणी सामाजिक वनीकरणाखाली प्रकल्प राबवावा व त्यासाठी आर्थिक तरतूद करावी अशी विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 131- बाब क्रमांक 142, ग्राम विकास विभाग- वर्धा येथील महात्मा गांधींच्या आश्रमाची जी दुर्दशा झालेली आहे त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्या आश्रमाला राज्यातून तसेच विदेशातून पर्यटक भेटी देत असल्यामुळे त्या आश्रमाची देखभाल करण्यासाठी खास तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, पर्यटन विभाग - तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सांगली येथील सिध्दनाथ येथे खंडोबाचे मंदिर आहे. या मंदिराला लाखो भाविक भेट देत असतात. परंतु या मंदिराकडे जाणारे रस्ते खूप खराब झालेले आहेत. ते लवकर दुरुस्त करावते. तसेच त्या ठिकाणी चांगली स्वच्छतागृहे उभारण्यासाठी तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आषाढी कार्तिकी एकादशीच्या दिवशी लाखो वारकरी पंढरपूरमध्ये विठुरायाच्या दर्शनासाठी येतात. ज्या ज्या मार्गावरुन हे वारकरी पंढरपूरमध्ये येतात त्या ठिकाणी दहा-दहा कि.मी.च्या अंतरावर शौचालये बांधावीत. तसेच 25 कि.मी. अंतरावर निवासाची व्यवस्था करुन त्यासाठी तरतूद करावी अशी विनंती आहे.

..2..

श्रीमती विद्या चव्हाण .....

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग - बाब क्रमांक 152 - राज्यातील अन्न-धान्य गोदामांच्या दुरुस्तीच्या कामाकरिता मागणी करण्यात आलेली आहे.

बाब क्रमांक - 153 - शिधापत्रिकाधारकांना रॉकेल वितरित करण्यासाठी मागणी केलेली आहे. माझी या निमित्ताने मागणी आहे की,मोबाईन व्हॅन उपलब्ध करुन दिल्यास आपणास ग्राहकांपर्यंत थेट धान्य पोहोचविता येईल. गोदामामधील धान्यांचे वस्त्यांवर थेट वाटप करता येईल.

पृष्ठ क्रमांक 176,बाब क्रमांक 181-182 व 183 -वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये- राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यास संलग्न असलेली रुग्णालये त्यांच्या इमारतीच्या दुरुस्ती व परीरक्षण कामासाठी मागणी केलेली आहे. तसेच यंत्रसामग्री व साधनसामग्रीच्या दुरुस्तीसाठी मागणी केलेली आहे. जी तरतूद केलेली आहे त्यामध्ये आणखी तरतूद करण्याची आवश्यता आहे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कामगार विभागाबाबत सांगू इच्छिते की, असंघटीत कामगारांकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. घरकाम करणारे कामगार हे असंघटीत कामगारांमध्ये येतात. अशा असंघटीत कामगारांसाठी विशेष तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग - मार्केट, एस.टी.स्टॅन्ड, रुग्णालय, न्यायालय, प्रशासकीय इमारती, शैक्षणिक संस्था, रस्ते महामार्ग याठिकाणी कोठेही सार्वजनिक शौचालये नाहीत किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहे नाहीत. कर्नाटक राज्यातील धारवाड व अन्य ठिकाणी 15-20 कि.मी. अंतरावर शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे आपण म्हणतो. परंतु आपल्या येथे सार्वजनिक ठिकाणी पाहिजे तेवढी स्वच्छतागृहे नाहीत. तेव्हा सार्वजनिक ठिकाणी महामार्गावर स्वच्छतागृहे बांधावीत अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

त्याचप्रमाणे रत्नागिरी येथे पाणवळचा रेल्वे पूल आहे. तेथील मधल्या रस्त्यावर बुध्द वाडी, गव्हाळ वाडी अशा वाड्या आहेत. परंतु त्या वाड्यात जाणारा रस्ता कच्चा आहे. अजूनपर्यंत तो रस्ता करण्यात आलेला नाही. तो रस्ता लवकरात लवकर पूर्ण केला पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करते.

महोदय, जलसंपदा विभागाची बाब क्रमांक-118, पृष्ठ क्रमांक-109 वर मी बोलत आहे. मागच्या वर्षी अनेक ठिकाणी दुष्काळ पडला होता. त्या ठिकाणी पाण्याची दुरवस्था निर्माण झाली होती. त्यामुळे राज्यात सर्वत्र शिरपूर पॅटर्न राबविणे आवश्यक आहे. नाल्याचे रुंदीकरण करुन खोली वाढविली आणि विहिरीचे पुनर्भरण केले तर भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. म्हणून शिरपूर पॅटर्न राबविण्याची मी मागणी करते.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते व माझे भाषण संपविते.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक-27, पृष्ठ क्रमांक-17 'न्याय वैद्यक प्रयोगशाळा उपकरणे' यावर मी बोलणार आहे. फॉरेन्सिक लॅबच्या रिपोर्टअभावी अनेक प्रकरणांचा निकाल प्रलंबित आहे. छोट्या छोट्या टेस्टचा रिपोर्ट लवकर मिळत नसल्यामुळे अनेक प्रकरणांचा निकाल लागत नाही. पाश्चिमात्य देशात फॉरेन्सिक लॅब मेडीसीनसाठी उत्कृष्टरित्या काम करते. परंतु त्या तुलनेत आपल्याकडे फॉरेन्सिक लॅबसाठी खूप कमी प्रमाणात यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. अद्यापपर्यंत न्याय वैद्यक प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण झालेले नाही. न्याय वैद्यक प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण नेमके कधी होणार आहे ? अनेकदा प्रकरणाचे सॅम्पल दिल्ली किंवा बेंगलोरला पाठवावे लागते.

महोदय, मागच्या अधिवेशनात भंडारा जिल्ह्यातील मुरमाडी येथील प्रकरण सभागृहात खूप गाजले होते. त्या विषयी उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये सर्वांनी भाग घेतला होता. परंतु त्या प्रकरणाचे पुढे नेमके काय झाले याचे उत्तर कोणालाच मिळाले नाही. ज्या मुली मृत्युमुखी पडल्या त्या मुलींच्या आईच्या मागणीवरुन सदरहू प्रकरणाचा तपास सी.बी.आय.कडे देण्यात आला. त्या ठिकाणी या प्रकरणाचा तपास कोणत्या टप्प्यावर आहे हे समजत नाही. या प्रकरणातील आरोपी सापडणार की नाहीत, हा खरा प्रश्न आहे. त्या प्रकरणातील आरोपी सापडणार नाहीत या अनुषंगानेच चर्चेला सुरुवात करण्यात आली होती. या निमित्ताने मी जाणून घेऊ इच्छितो की, या प्रकरणाचा तपास खरोखरच सी.बी.आय.कडे देण्यात आला आहे काय, असल्यास, सी.बी.आय. कडून किती दिवसांत तो तपास पूर्ण होणार आहे. के.ई.एम. रुग्णालयातील फॉरेन्सिक मेडीसीनच्या प्राध्यापकांनी मुरमाडीचे प्रकरण रेपचे नव्हते, ती ड्राऊनिंग केस आहे असे निष्कर्ष काढले होते. परंतु माझ्या मते ते पूर्णत: चूक आहे.

महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 80, पृष्ठ क्रमांक-67 मार्ग व पूल बांधकाम या बाबतची आहे. गेल्या अधिवेशनात खेड येथे झालेल्या अपघातावर सभागृहाचे संपूर्ण कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्यात आली. परंतु त्या चर्चेचे फलित पुढे काय झाले ? मुंबई-गोवा मार्गावर अजूनही अपघात होत आहेत. वडखळ नाका असो, खेड असो त्या ठिकाणच्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यास चालना मिळाली नाही. वडखळ नाक्यापासून पुढे महाडला जाता





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येत नाही. तळेला-कणकवली या दिशेने तर खड्डेच खड्डे पडले आहेत. सध्या ही परिस्थिती आहे तर गणेश उत्सवात काय होणार आहे हे समजत नाही. अजून किती लोकांचे बळी घेतल्यानंतर हे काम सुरु होणार आहे या बाबतचा खुलासा माननीय मंत्र्यांनी केला पाहिजे.

महोदय, माननीय सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री महोदय आपण या विषयी उत्तर देण्यास निरुत्साही आहात काय ? माननीय सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री, आपण डायनॅमिक आणि तरुण आहात. त्यामुळे या कामांबाबत आपण माननीय मंत्र्यांना सांगितले पाहिजे.

महोदय, बाब क्रमांक-185, पृष्ठ क्रमांक-178 अंतर्गत वैद्यकीय शिक्षण विभागाकरिता पुरवठा सामुग्री, दूरध्वनी यासाठी अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे. आजच एका वर्तमानपत्रात बातमी आली की, मेडीकल कॉलेजच्या 418 जागा धोक्यात आल्या आहेत. आपल्या राज्याचे वैद्यकीय शिक्षण संचालक महान आहेत. त्यांना प्रस्तावावर सही करण्यास वेळ नाही. मंत्रिमंडळाला सुध्दा वेळ नाही. एवढेच नव्हे तर आरोग्य विज्ञान विद्यापीठाला सुध्दा वेळ नाही. प्रत्येक अधिवेशनात सरकारकडून निरनिराळ्या घोषणा केल्या जातात. प्रत्येक अधिवेशनात दोन मेडीकल कॉलेज सुरु करण्याच्या बाबतीत घोषणा केली जाते. परंतु वाढीव जागांसाठी आवश्यक ते इन्फ्रास्ट्रक्चर, उपकरणे, मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जात नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आपण नवीन जागा कोठून प्रोव्हाईड करणार आहात ?

महोदय, राज्याच्या मुख्य सचिवांनी एम.सी.आय.ला लिहून दिले की, आयजी जीएमसीच्या जागांबाबत आम्ही पुढील वर्षी कार्यवाही करतो. परंतु अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नाही. परंतु या वर्षी आयजी जीएमसीच्या 40 जागा निश्चितपणे आपल्या हातून जाणार आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

त्याचबरोबर सायन, नायर, ठाणे, नांदेड, मिरज, सोलापूर, अंबेजोगाई, धुळे येथील मेडिकल कॉलेजचे काय होणार ? त्यांच्याही जागा कमी होणार आहेत.

सभापती महोदय, यानंतर मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 178 वरील बाब क्रमांक 186 बाबत बोलणार आहे. यामध्ये यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची दुरुस्ती व परिरक्षण करण्यासाठी तरतूद केलेली आहे. मागच्या आठवड्यात नीट परीक्षेच्या संदर्भात माझी लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. त्या दिवशी सकाळी 11.00 वाजता कोर्टाचा निकाल लागला आणि दुपारी 12.30 वाजता माननीय मंत्री महोदय माझ्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत होते. सभापती महोदय, त्यावेळी आपणच सभापतीस्थानी होता. त्यावेळी सुप्रीम कोर्टाचा काय निकाल लागला, नीट परीक्षा काढून टाकली, हे राज्याच्या माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना माहीत नव्हते, ही खरोखरच दुर्दैवाची बाब आहे. आज सर्व लोक परेशान आहेत. पालक म्हणतात की, पुढच्या वर्षी आम्ही कोणता अभ्यास करावा ? नीट द्यावयाची नसेल आणि एमएचटी-सीईटी द्यावयाची असेल तर कोणता अभ्यासक्रम असणार आहे ? डॉ. पतंगराव कदम यांच्या कॉलेजची सीईटी द्यावी, डी.वाय.पाटील कॉलेजची सीईटी द्यावी की आणखी कोणाच्या कॉलेजची सीईटी द्यावी या बाबतीत विद्यार्थी खूप संभ्रमावस्थेत आहेत. नीट परीक्षेसाठी नेमका काय अभ्यासक्रम असेल, आपण परीक्षा घेणार की पुन्हा कोर्टात जाऊन विद्यार्थी आणि पालकांना संभ्रमात ठेवणार हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये स्पष्ट करावे. नीट परीक्षेबाबत महाराष्ट्र शासनाची काय मानसिकता आहे ? पुन्हा खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांवर आणि डॉ. पतंगराव कदम यांच्यासारख्या अभिमत विद्यापीठावर कुरघोडी करण्यासाठी त्यांचा सुध्दा हक्क आपण काढून घेणार आहात का ?

अभिमत विद्यापीठ काढताना आम्ही असे सांगितले होते की, अभिमत विद्यापीठ करताना तुम्ही तुमचा सर्व हक्क गमावून बसाल. त्यावेळी आपण फार जोशात अभिमत विद्यापीठांची निर्मिती केली. काही लोकांनी खूप चांगले काम केले पण काही लोकांनी वाट लावलेली आहे. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांचे कॉलेज खरोखरच चांगले आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी मी उपस्थित केलेल्या दोन तीन प्रश्नांना उत्तरे दिली पाहिजेत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गृह विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन विभागांच्या संदर्भातच मी बोलणार आहे. या दोन खात्यांवर बोलत असताना गृह खात्याचे कोणीही मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. तरीही माननीय सभापती महोदयांवर पूर्णपणे विश्वास असल्यामुळे मी माझे मत प्रश्नांच्या रुपाने मांडणार आहे. त्या प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावीत अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, प्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 16 वरील बाब क्रमांक 22 बाबत बोलणार आहे. या पुरवणी मागण्यांमध्ये शासनाची अशी अपेक्षा आहे की, आम्हाला बजेटमध्ये कमी पडले किंवा नंतर आठवले किंवा नंतर आवश्यक वाटले अशा सर्व कामांना पैसे पाहिजेत म्हणून आपण या पुरवणी मागण्यांना मान्यता घेण्यासाठी सभागृहासमोर आलेला आहात. बाब क्रमांक 22 मध्ये जिल्हा पोलीस दलासाठी वाहने आणि सामग्री खरेदी करण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या पोलीस मॉडर्नायझेशन फंडातून 50 कोटी रुपये राज्य शासनाकडे आले होते. ते पैसे न वापरल्यामुळे परत गेले. केंद्राकडून आलेले माडर्नायझेशनचे 50 कोटी रुपये न वापरता परत जातात आणि या ठिकाणी मशिनरी आणि इक्विपमेंट्स खरेदी करण्यासाठी राज्य शासन 13 कोटी रुपये का मागत आहे या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 20 आणि 23 यामध्ये नक्षलग्रस्त भागासाठी खास तरतूद मागितलेली आहे. या सदनामध्ये मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सांगितले होते की, लेफ्ट विंग एक्स्ट्रिमिस्ट म्हणजे नक्षलवाद, माओवाद या विरुध्द लढण्यासाठी केंद्र शासनाने वेगवेगळ्या आयआरबी, आपल्या बटालियान्ससाठी काही निधी दिला. त्यावेळी सुध्दा मी सांगितले होते की, कोल्हापूरच्या आपल्या बटालियनची 100 एकर जागा ताब्यात आली नाही. 300 एकर जागा येण्याची सोय नाही. माननीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले की, गोंदियामध्ये आमची बटालियन सुरु झाली. पण हे असत्य आहे. कोल्हापूरमध्ये बटालियन सुरु झाली नाही. गोंदियामध्ये बटालियन सुरु झाली नाही. आपण दोन्हीकडे रिक्रुटमेंट्स केल्या पण दोन्हीकडील जागा पूर्णपणे ताब्यात आल्या नाहीत. मग आपण नक्षलवादाच्या विरोधात लढाई कशी लढणार ? मी पुन्हा एकदा शासनाला विचारतो की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.......

गोंदियामध्ये जेथे बटालियन सुरु होणार होते तेथील जागा कोणत्या राजकीय नेत्यांनी बळकावली आहे आणि कोल्हापूरमध्ये बटालियन सुरु होणार होते तेथील 50 एकर सोडून आजूबाजूला कोणत्या राजकीय नेत्याच्या संस्थेला जागा दिलेल्या आहेत हे सरकारने स्पष्ट करावे.

यानंतर मी गृह विभागाच्या बाब क्र.24 वर बोलणार आहे. फॉरेन्सिक लॅबसाठी 1 कोटी 48 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. वेगवेगळ्या ठिकाणच्या 6 प्रयोगशाळांमध्ये सी.डी.व्हेरिफिकेशन, डी.एन.ए.तपासणी, रक्ताचे नमुने, नार्को टेस्टचे नमुने तपासले जाणार आहेत. ही चांगली गोष्ट आहे.

या देशाच्या व महाराष्ट्राच्या दृष्टीने एक महत्वाचा प्रश्न मी उपस्थित करीत आहे. काल चॅनेलच्या व वर्तमानपत्राच्या माध्यमातून हा प्रश्न आमच्यासमोर आलेला आहे. एका चॅनेलवर सी.डी.दाखविण्यात आली होती. आयपीएलच्या स्पॉट फिक्सिंगमध्ये एका मंत्र्यांबरोबर दाऊद बोलल्याची बातमी दाखविली गेली. शासन अत्याधुनिक फॉरेन्सिक लॅबमध्ये ती सी.डी.व्हेरिफाय करणार आहे काय ? या सदनाची मागणी आहे की, त्यावेळी दाऊदबरोबर बोलणारा नेता कोण आहे, तो दाऊदबरोबर काय बोलला होता याची माहिती मिळण्यासाठी अत्याधुनिक फॉरेन्सिक लॅबमधून ती सी.डी.तपासून घ्यावी.

यानंतर पृष्ठ क्र.19, बाब क्र.31 मध्यवर्ती व जिल्हा कारागृहांच्या सुरक्षा प्रयोजनासाठी शस्त्रे व दारुगोळा खरेदीकरिता या मागणीद्वारे अतिरिक्त तरतूद केलेली आहे. त्यावेळच्या दहशतवादी हल्ल्यात श्री.हेमंत करकरे, श्री.विजय साळसकर मरण पावले. त्यावेळी सभागृहात झालेल्या चर्चेतून पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आलेले जॅकेटस् बुलेटप्रुफ नव्हते असे बाहेर आलेले आहे. त्यानंतर आजपर्यंत बुलेटब्रुफ जॅकेटस् खरेदीसाठी टेंडर मागविले आहे काय असा माझा सरकारला खडा सावल आहे. नसेल तर का मागविले नाही असे मी सरकारला विचारु इच्छितो. मुंबई पोलिसांकडे 26/11 च्या घटनेनंतर अद्यापपर्यंत बुलेटप्रुफ जॅकेटस् नाहीत. अशा प्रकारची स्थिती असताना शासनाने अतिरिक्त तरतुदीची मागणी केलेली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ॲड.आशिष शेलार...

यानंतर मी बाब क्रमांक 33 वर बोलणार आहे. नाशिक शहर येथे सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविण्यासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गेल्या दीड वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेमध्ये एक फाईल फिरत आहे. त्या फाईलवर मुख्य अभियंता (रस्ते) यांच्यापासून ते अतिरिक्त आयुक्त, आयुक्त यांच्या सह्या झालेल्या आहेत. त्या फाईलमध्ये मुंबईतील सर्व रस्त्यांवर सीसीटीव्ही लाववण्याचा असा प्रस्ताव आहे. त्याच्या बदल्यामध्ये एक खाजगी कंत्राटदार मुंबईत 4 जी चे डक्टिंग मोफत करुन देणार आहे. त्यातून वायर जाऊ शकतील. अशा प्रकारे सीसीटीव्ही लावून देण्याची प्रक्रिया मुंबई शहरात सुरु आहे. मंत्री महोदयांनी याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ 65, बाब क्र.81 वर माझे विचार मांडणार आहे. रस्ते व पूल बांधण्यासाठी खर्च भागविणे यासाठी ही तरतूद केलेली आहे. ही मागणी करीत असताना असे नमूद केले आहे की, राज्य शासनाला केंद्र सरकारकडून 50 लाख रुपये प्राप्त झाले होते. केंद्र सरकारकडून सन 2012-13 मध्ये दुर्गम भागातील रस्ते विकासासाठी तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीमुळे शासनाला 50 कोटी रुपये प्राप्त झाले होते. परंतु प्रगत राज्याचे प्रगत मंत्री महोदय असे म्हणत आहेत की, 50 कोटी रुपयांपैकी 46 कोटी रुपये 77 लाख 83 हजार रुपये गेल्या वर्षी खर्च झाले नाहीत. म्हणजे केंद्र सरकारने रस्ते बांधण्यासाठी 50 कोटी रुपये दिले होते. त्यापैकी 47 कोटी रुपये परत गेले आहेत. आता मात्र राज्य सरकार या कामासाठी अतिरिक्त तरतुदीची मागणी करीत आहे. याबाबत शासनाने स्पष्टीकरण करावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, मी केवळ 6 प्रश्न या ठिकाणी मांडलेले आहेत. आपण केलेल्या सूचनेमुळे मी इतक्या मोठ्या पुस्तकावरील माझे विचार पूर्ण करतो आणि माझ्या मुद्यांना मंत्री महोदयांकडून उत्तरे येतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री.शिगम....

अशुध्दलिखित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:45

श्री. मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जलसंधारण विभागाच्या मागण्यासंबंधी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, जळगाव जिल्हयामध्ये जलसंधारणासाठी 80 छोटे छोटे बंधारे मंजूर करण्यात आले. परंतु जळगाव जिल्ह्यातील 15 तालुक्यापैकी केवळ एकाच जिल्ह्यामध्ये 62 कामे सुरु झाली आणि अन्य 14 तालुक्यामध्ये उर्वरित कामे सुरु आहेत. तेव्हा ही बंधा-यांची कामे करताना कोणते निकष लावले गेलेले आहेत याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

पुनर्वसनाच्या संदर्भात सांगायचे तर जळगाव जिल्हयातील 25 ते 30 गावांना गेल्या 28-30 वर्षापासून पुनर्वसनामध्ये स्थापित केलेले आहे. या गावांमध्ये मागील 28 वर्षापासून पाणी, गटारे, शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय इत्यादी नागरी सुविधा दिलेल्या नाहीत. आता कामांची एस्टिमेट वाढलेली आहेत. मागे एका दु:खद प्रसंगी माननीय मंत्री महोदय त्या गावामध्ये गेले होते. तो राजकारणाचा विषय नव्हता. परंतु काही लोकांनी तो राजकारणाचा विषय केला. त्यामुळे ती कामे झाली नाहीत. माझी विनंती आहे की, या गावांना 28 वर्षापासून नागरी सुविधा मिळालेल्या नाहीत. तेथे नागरी सुविधा उपलब्ध करुन तेथील ग्रामस्थांवरील अन्याय दूर करावा अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

गृह विभागाच्या पान क्रमांक 14 वरील मागणी क्रमांक बी-3मध्ये शासकीय वाहनांच्या संदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. शासनाचा एक शासकीय परिवहन सेवा विभाग आहे. या विभागामध्ये मोटार मॅकॅनिक, हेल्पर आदी कर्मचारी आहेत. या ठिकाणी शासकीय मोटारींची देखभाल दुरुस्ती करण्यात येते. या मागण्यांच्या निमित्ताने मी शासनाला अशी सूचना करु इच्छितो की, एक ट्रायल म्हणून कोणत्याही जिल्हयाची निवड करुन त्या जिल्ह्यासाठी खाजगी वाहने भाड्याने घेऊन या जिल्ह्यातील आणि अन्य जिल्हयामध्ये वाहनांवर किती खर्च होतो हे पडताळून पहावे. हे शक्य झाले तर शासनाचे भरपूर पैसे वाचतील. आपले कोणतेही वाहन बंद असणार नाही. वाहन बंद पडले तर ते लगेच खाजगी वाहने पुरविणा-याकडून बदलून घेता येईल. सभापती महोदय, गृह विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात बोलत असताना मला शासनाला असे सुचवावयाचे आहे की, राज्यातील कारागृहामध्ये जे अपंग कैदी आहेत त्यांना एनजीओ मार्फत मदत करता आली तर त्याचा त्यांना चांगला फायदा होऊ शकेल.

..2..

श्री. मनिष जैन....

पर्यटन विभागाच्या मागण्यासंबंधी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, पर्यटन हा महाराष्ट्रातील अत्यंत मागासलेला विभाग आहे. आपल्या देशाच्या इन्क्रेडिबल इंडिया अशा जाहिराती दूरचित्रवाहिन्यांवरुन झळकत असतात. अलीकडेच महाराष्ट्राच्या वैभवासंबंधीची जाहिरात दूरचित्र वाहिन्यांवरुन प्रसारित होऊ लागलेली आहे. पर्यटन विभागाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. पर्यटनाच्या विकासासाठी नाशिक विभागाला 250 कोटी रु. देण्यात आले. त्यापैकी आमच्या जळगाव जिल्हयासाठी 100 कोटी रुपये देण्यात आले त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. परंतु मला एका गोष्टीची खंत आहे की, आमच्याकडे जे काही 90 कोटी रुपये आले, ते फक्त एकाच तालुक्यात गेले. हे पैसे लोकांची देवदेवतांची जी श्रध्दास्थाने आहेत त्यासाठी खर्च न होता... (अडथळा).... तुमच्या जवळचेच गाव आहे. मुक्ताईनगर तालुका आहे. तेथे बॅकवॉटरमध्ये वॉटर रिसॉर्ट करण्यासाठी पैसे गेले. आपली मंदिरे जीर्ण झालेली आहेत. त्यांच्या बांधकामासाठी 10-10 कोटी रुपये दिले असते तर पर्यटनाच्या दृष्टीने लोकांना त्याचा फायदा झाला असता. सरकार म्हणून आपण आमच्यावर अन्याय न करता आम्हाला न्याय द्या. सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिल्या बद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी सन 2013- 2014 च्या पुरवणी बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.47, पृष्ठ क्र.36, कृषी विभाग, पीक विम्याचे पैसे शासनामार्फत शेतकऱ्यांना मिळाले त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. परंतु पीक विम्याचे आणखी जवळ जवळ 20 ते 25 टक्के पैसे मिळावयाचे राहिलेले आहेत. काही जिल्हा बँकांनी शेतकऱ्यांचे पूर्वीचे जे कर्ज होते त्यातून हे मिळालेले पीक विम्याचे पैसे वजा करुन घेतलेले आहेत. पीक विम्याचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा व्हावयास पाहिजे होते. परंतु काही ठिकाणी तसे झालेले नाही. आपण याबाबतीत चौकशी करुन हे पीक विम्याचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावेत. उदाहरणार्थ सांगली जिल्ह्याचे जवळ जवळ 4 कोटी रुपये मिळाले आहेत. परंतु सांगली जिल्ह्याचे आणखी 80 लाख रुपये मिळणे बाकी आहेत. ते त्वरित मिळावेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने शेतकऱ्यांना मोफत बियाणे देण्याची घोषणा केली होती. परंतु अद्याप सर्व गावातील शेतकऱ्यांना मोफत बियाणे मिळालेले नाही. उदाहरणार्थ आमच्या कवठेमहांकाळ तालुक्यातील 60 गावांपैकी फक्त 13 गावांना मोफत बियाणे मिळाले. सर्व शेतकऱ्यांना बियाणे मिळालेले नाही. खताच्या बाबतीत देखील अशाच प्रकारची थोडी अडचण आहे.

सभापती महोदय, बाब क्र.40, पृष्ठ क्र.28, मदत व पुनर्वसन विभाग, मला माननीय पुनर्वसन मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, शासनाने संपूर्ण राज्यात चारा छावण्या सुरु केलेल्या आहेत. ज्या ठिकाणी चांगला पाऊस पडलेला आहे तेथील चारा छावण्या आपण बंद करीत आहात. परंतु राज्यातील जो कायम दुष्काळी भाग आहे, आमच्या सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, जत, आटपाडी, सांगोला किंवा सोलापूर तालुक्यातील मंगळवेढा तालुक्यात अद्याप पाऊस पडलेला नाही. म्हणून जो पर्यंत पाऊस पडून जनावरांना खाण्यासाठी चारा निर्माण होत नाही तो पर्यंत आपण या भागातील चारा छावण्या बंद करु नयेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, काही शेतकऱ्यांच्या शंभर टक्के जमिनी तलावमध्ये किंवा कॅनॉलमध्ये गेलेल्या आहेत. त्यातील काही शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. ती देखील शासनामार्फत त्वरित देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

सभापती महोदय, मला मुद्दा माननीय पुनर्वसन मंत्री महोदयांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे की, आपण सभागृहात सांगितले होते की, राज्यात शेळ्या मेंढ्यांसाठी छावण्या सुरु करण्यासाठी मी परवानगी देणार आहे. आपण सांगली जिल्ह्यातील डीपीडीसीच्या बैठकीच्या वेळी सांगली जिल्ह्यात तशा प्रकारची परवानगी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी माझ्या संस्थेमार्फत शेळ्या मेंढ्यांसाठी राज्यातील पहिली चारा छावणी सुरु केली. शेळ्या मेंढ्यांसाठी फक्त 5 रुपये दिले जातात. मोठे जनावर असेल तर आपण 75 रुपये देतो आणि छोटे जनावर असेल तर 30-35 रुपये दिले जातात. मी सभागृहात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात उत्तर दिले होते की, छोट्या जनावरांसाठी जे पैसे दिले जातात तेवढे शेळी किंवा मेंढीसाठी दिले जातील. परंतु अद्याप त्यामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही किंवा या संदर्भात नवीन आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही. मी जत आणि कवठेमहांकाळ तालुक्याच्या सीमेवर एका शेळी, मेंढीसाठी फक्त 5 रुपये या प्रमाणे ती चारा छावणी सुरु ठेवलेली आहे. आपण छोट्या जनावरांसाठी जे 30-35 रुपये देता ते शेळ्या मेंढ्यांसाठी द्यावेत आणि राज्यात ज्या ठिकाणी शेळ्या मेंढ्यांसाठी चारा छावण्या सुरु करण्याची मागणी येईल तेथे चारा छावण्या सुरु करण्यास परवानगी द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.151, पृष्ठ क्र.137, अन्न व नागरी पुरवठा विभाग, आपण गडचिरोली जिल्ह्यात अन्न धान्याची वाहतूक करण्यासाठी नवीन गाड्यांची खरेदी करणार आहोत आणि त्यासाठी जवळ जवळ 165 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. नागपूरमध्ये या वाहनांमध्ये मालाची चढ-उतार करणाऱ्या 54 माथाडी कामगारांच्या जागा रिक्त आहेत. तेथे माथाडी कामगारांची मागणी आहे. आपण तेथे टेंपररी कामगार देऊन काम करुन घेत आहात. मी या संदर्भात मागील दोन वर्षापासून मागणी करीत आहे. माननीय मंत्री महोदयांकडे या संदर्भात अनेक बैठका झालेल्या आहेत. परंतु माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिल्यानंतर देखील या संदर्भात प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही. अधिकारी मंत्री महोदयांच्या आदेशाचे पालन करीत नाहीत. माननीय मंत्री महोदय दोन वर्षापासून आदेश देत

3...



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम मा...... 16:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

आहेत. परंतु अद्याप तेथे माथाडी कामगारांची भरती केली जात नाही. त्या कामगारांच्या हाल अपेष्टा सुरु आहेत. माननीय मंत्री महोदयांच्या आदेशानुसार त्यांची भरती तातडीने करण्यात याची, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, दुष्काळी भागात बीपीएल धारकांना आपण ज्या प्रमाणे अन्न धान्य देतो त्या प्रमाणे आपण एपीएल धारकांना सुध्दा अन्न धान्य द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या संदर्भात मी बोलणार आहे. चौंडी येथील पर्यटन विकासासाठी आम्ही 38 कोटी रुपयांचा आराखडा सादर केलेला आहे. परंतु अद्याप त्यासाठी कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. त्यासाठी आता पर्यंत फक्त 2 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जन्म गावी पर्यटन विकास व्हावा यासाठी 38 कोटी रुपयांचा आराखडा सादर करण्यात आलेला आहे. तेथील पर्यटन विकासासाठी 38 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 86 व 87, सार्वजनिक बांधकाम विभाग. राज्यात तातडीने रस्ते विकास करण्यासाठी चालू व नवीन कामासाठी एकूण 699.55 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. पुरवणी मागण्यांना जोडलेल्या परिशिष्टाची पाहणी केली असता 12648 कामे यात अंतर्भूत असल्याचे दिसून येते. याचा अर्थ प्रत्येक कामासाठी सरासरी 5.29 लाख रुपये लागणार आहेत. रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरण करण्याकरिता प्रती कि.मी. 27 लाख रुपये खर्च होत असल्याचे शासनाच्या एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार सादर केलेले विवरणपत्र पाहता खरोखरच किती रस्त्यांचे काम होईल हा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, हा निधी देण्याचा उद्देश काय? कुठे कुठे निधी दिला जाणार आहे? खरे म्हणजे मी विधानपरिषदेचा सदस्य आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील जे बोलले त्यात बराचसा तथ्यांश आहे. मी ज्या मतदारसंघात वास्तव्य करतो, तिथे काँग्रस पक्षाचे आमदार निवडून आलेले आहेत. तिथे फक्त काँग्रेस पक्षाच्या आमदारांकडूनच प्रस्ताव मागविले गेले होते. मी हे संपूर्ण पुस्तक चाळून पाहिले. मी वास्तव्यास असलेल्या मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी सुचविलेला एकही रस्ता या कामांच्या यादीमध्ये अंतर्भूत झालेला नाही. अशा पध्दतीने निधीचे वाटप होत असेल तर ते योग्य नाही. मी हा विषय मांडण्याचे काही कारण नव्हते. कारण त्या मतदारसंघाचे अधिकृत आमदार काँग्रेस पक्षाचे आहेत. मी त्या मतदारसंघाचे दोन वेळा प्रतिनिधीत्व केलेले आहे. त्या मतदारसंघाचे मी तीन वेळा लोकसभेत प्रतिनिधीत्व केले आहे. त्या मतदारसंघातील रस्त्यांची स्थिती अतिशय वाईट आहे. एवढे बजेट उपलब्ध असताना त्या मतदारसंघातील एकही रस्त्याचे काम या यादीमध्ये अंतर्भूत नाही. काही प्रस्ताव त्यांनी सुचविले होते. माझ्याकडे मागणी न करता मी विभागाला काही कामांबाबत पत्र दिले होते. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील या सरकारचे खूप कौतुक करतात. त्यांनी जरा माहिती घ्यावी. स्वातंत्र्य मिळून 66 वर्षांचा काळ उलटून गेला आहे. खामगाव तालुक्यातील फतेपूर नावाच्या गावात जायला अजूनही रस्ता नाही. अनेकदा आम्ही शासनाला पत्र लिहिली आहेत. शासनाकडून निधी मिळत नसेल तर डीपीडीसीमधून निधी द्यावा. रस्त्याचे अंतर फक्त 2 कि.मी.चे आहे. 2 कि.मी.चा रस्ता स्वातंत्र्यानंतर आजतागायत होऊ शकलेला नाही. जिल्हा नियोजन मंडळातून करा सांगूनही केला जात नाही. अशा पध्दतीने निधीचे वाटप केले जात असेल तर ते योग्य नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ D/ KTG/ 16:55

श्री.पांडुरंग फुंडकर...........

सभापती महोदय, मी पत्र लिहून कळविलेले रस्ते या ठिकाणी वाचून दाखवू इच्छितो. बुलढाणा जिल्हयातील खामगाव-शेगाव तालुक्यातील रस्ते मौजे नारखेड-खोलखेड-बाथरगाव रस्ता, मौजे भातसण-सघोडा-भोंदगाव रस्ता, मौजे एकफळ-आळस्ता-शेगाव रस्ता, मौजे जनुना-जळका तेली-खेर्डी-आकोली-लाखनवाडा रस्ता, मौजे पिंपळगाव राजा ते काळेगाव रस्ता, मौजे चितोडा फाटा-पळशीपूर-शहापूर रस्ता, मौजे अळगाव ते बाळापूर रस्ता, मौजे हिवरखेड ते किनी महादेव रस्ता या रस्त्यांची अवस्था इतकी वाईट झाली आहे की, या रस्त्यांवरुन वाहन चालविणे सुध्दा कठीण झालेले आहे. अशा परिस्थितीत या रस्त्यांसाठी एका नया पैशाची देखील तरतूद केलेली नाही. अंतर्गत राजकारण काही असो. ग्रामीण भागातील जनतेसाठी रस्ते होणे आवश्यक आहे. या रस्त्यांसाठी निधीची तरतूद करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाची बाब क्रमांक 143, 147 अन्वये पूरक मागणी सादर केली आहे. राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी मला स्वत: सांगितले की, दोन गावांची नावे पत्राद्वारे कळवावीत. मी स्वत: त्यांना पत्र दिले. माझ्या हातात शासनाचा जी.आर.आहे त्यात कुठेही रस्ता डांबरी करावा की सिमेंटचा करावा याबाबत उल्लेख केलेला नाही. मी सिमेंटचा रस्ता करावा असे पत्रात नमूद केले असताना विभागाने जाणीवपूर्वक डांबरीकरणाचे स्वरुप दिले आणि त्या कामाचे टेंडर काढण्यात आले. मी त्याबाबत विरोध केला. डांबरी रस्ता करु नका असे सांगितले. कारण ग्रामीण भागात डांबरी रस्ता तयार केला आणि तो पावसाळ्यात उखडला गेला तर त्या रस्त्यावर पुन्हा डांबर आणि गिट्टी टाकण्यास कोणी जाणार नाही. म्हणून सिमेंटचा रस्ता करावा यासाठी मी राज्यमंत्र्यांना तीन वेळा पत्र दिले, प्रत्यक्ष त्यांना जाऊन भेटलो आणि हा बदल मंजूर करुन द्यावा अशी विनंती केली. या जी.आर.मध्ये असे कुठेही बंधन घातलेले नाही. तेथील जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी मला सांगितले की, शासनाचा डांबरीकरणाबाबतचा जी.आर. आहे, डांबरीकरणाचेच रस्ते केले पाहिजेत.

नंतर 3एम.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

यामध्ये डांबरी रस्त्याचेच काम होते असे सांगितले आहे. परंतु जीआरमध्ये अशा प्रकारचे कोणतेही बंधन नाही. तीन वेळेस भेटलो परंतु अजून पर्यंत काहीही झालेले नाही, हे रस्ते लॅप्स झालेले आहेत काय याचीही आम्हाला माहिती मिळत नाही. त्यामुळे या रस्त्याचे नेमके काय झाले आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय,जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 148,149 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. जलसंपदा मंत्री विदर्भाचे असून त्यांनी विदर्भाकडे लक्ष द्यावे अशी सूचना मी केली होती. बुलढाणा जिल्हयात जलसंधारणाचे केवळ प्रस्ताव तयार झालेले आहेत. जलसंधारणासाठी शासनाकडे पैसे नाहीत. खामगाव तालुक्यातील अटारी येथे जुन्या काळातील चार बंधारे असून हे बंधारे दुरुस्तीला आलेले आहेत. या चार बंधाऱ्यांमध्ये पाणी साठत नव्हते त्यामुळे मी या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी माननीय मंत्री महोदयांना 3 पत्र दिले होते. या 4 तलावाच्या दुरुस्तीसाठी केवळ 20/22 लाख रुपये खर्च येणार असून या चार तलावांचा फायदा 10 गावांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतीसाठी होणार आहे. परंतु 4 तलावाच्या दुरुस्तीसाठी 20 लक्ष देण्यास सरकार तयार नाही. परंतु या चार बंधाऱ्यांसाठी शासनाने 20 लाख रुपये उपलब्ध करुन द्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्रमांक 170, पृष्ठ क्रमांक 125, सहकार विभागाच्या संदर्भात मी सुरुवातीला विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, अल्प भूधारकांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हे कर्ज सेवा सोसायटी मार्फत वितरीत होत असते. शून्य टक्के व्याज दराच्या निर्णयाचे आम्ही सुध्दा स्वागत केले होते. परंतु मला या ठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते की, अकोला, वाशिम या दोन्ही जिल्हयांना केवळ सन 2011 व 2012 या वर्षात सेवा सोसायटीचा व्याज दुरावा म्हणून 7.50 कोटी रुपये थकलेले आहेत. सन 2012-2013 मध्ये 12 कोटी रुपये थकलेले आहेत ही अतिशय खेदाची बाब आहे. आधीच सहकारी बँका कशा तरी सुरु आहेत. सहकारी बँकेच्या थ्रूच आपण कर्ज पुरवठा करीत असतो. जर यासंदर्भातील 20-20 कोटी रुपये थकीत असेल तर ते चांगले नाही. अगोदरच या बँका डबघाईस आलेल्या आहेत.या बँकाना अशामुळे काम करणे कठीण होईल. या पूरक विवरणपत्रात थकीत निधीच्या संदर्भात कोठेही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालून याबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 188, पृष्ठ क्रमांक 179, वैद्यकीय शिक्षण विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. केंद्राकडून अनेक वैद्यकीय महाविद्यालयांना सोयीसुविधेसाठी निधी मिळत असतो. अकोला वैद्यकीय महाविद्यालयाला 40 कोटी रुपये केंद्राकडून प्राप्त झालेले आहेत. यासाठी आम्ही गेल्या दोन वर्षापासून पाठपुरावा करीत होतो. अकोल्या महाविद्यालयाला यासंदर्भात 14 रुपये आलेले आहेत परंतु राज्य शासनाला जी 25 टक्के मॅचिंग ग्रँट द्यावी लागते ती दिलेली नाही. राज्य शासनाने 25 टक्के मॅचिंग ग्रॅट उपलब्ध करुन दिली नाही तर केंद्राचे आलेले 40 कोटी रुपये वापस जातीस अशी भीती आहे. त्यामुळे राज्य शासनाने अकोला महाविद्यालयासाठी 25 टक्के मॅचिंग ग्रँट उपलब्ध करुन द्यावी तसेच यासंदर्भात जी प्रशासकीय मान्यता खोळंबलेली आहे ती देण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, 10 वर्षापासून जी वैद्यकीय महाविद्यालय सुरु आहेत त्यांना 50 वाढीव जागा देण्याचा प्रस्ताव केंद्राकडून आपल्याकडे आलेला आहे. या संदर्भात पाठपुरावा केल्यानंतर असे दिसून आले की, यामाध्यमातून आपल्या 600 जागा वाढू शकतात. आपल्याला 6 वैद्यकीय

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

महाविद्यालये सुरु न करता या जागा वाढवून मिळणार असतील तर त्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. ज्या पायाभूत सुविधांमध्ये आपण काम करीत आहोत त्यामध्ये वाढ करुन आपण वैद्यकीय महाविद्यालयाच्या 600 जागा वाढवू शकतो. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, अकोला येथे कॅन्सर रुग्णालय प्रलंबित आहे. महाराष्ट्र राज्यात एकमेव विभाग असा आहे की, कॅन्सर रुग्णालयात अंतर रुग्णालयाची काहीही व्यवस्था नाही. गेल्या 3 वर्षापासून यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांकडून आश्वासन मिळत आहे. परंतु त्यासंदर्भातील काहीही उल्लेख विवरणपत्रात दिसून येत नाही. त्यामुळे माझी कळकळीची विनंती आहे की, या विभागाला एक आंतररुग्णालय देण्यात यावे. यासंदर्भात मान्यता झालेली आहे परंतु त्यासंदर्भातील तरतूद विवरणपत्रात दिसत नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 133,पृष्ठ क्रमांक 123, कामगार विभागाच्या संदर्भात विचार मांडणार आहे. सुरक्षा विमा योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. ही योजना आपल्या राज्यातील कामगार विभागाने घेतलेली आहे. खरे म्हणजे ही योजना आरोग्य विभागाकडे असावयास पाहिजे होती.

यानंतर श्री. भारवि....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

आज त्या योजनेकडे दुर्लक्ष होत आहे. आपण ती योजना बंदी केली आहे. यामध्ये आपण फक्त 100 ते 150 रूपयांचा विम्याचा हप्ता भरला तर एका बीपीएलच्या कुटुंबाला केंद्र शासन रूपये 30 हजार देण्यास तयार आहे. आपण ही योजना एक-दोन वर्षे चालवून आता बंदच करून टाकली आहे. मागच्या वेळी आपण आश्वासन दिले होते. त्यानुसार आपल्या दालनात बैठक देखील झाली. पण त्यासाठी कुठल्याही प्रकारची तरतूद या पुरवणी मागणीमध्ये दिसत नाही. केंद्र शासनाची चांगली योजना आपल्या हातातून निघून जाईल काय, अशी भीती आता आम्हाला वाटते.

यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 67 वरील बाब क्रमांक 78 वर बोलणार आहे. अकोला येथील सामान्य रूग्णालयाची इमारत, पोलीस वसाहतीतील इमारती, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत अतिशय जुन्या झालेल्या आहेत. सदर इमारती बांधण्यासंबंधीचा प्रस्ताव आपल्याकडे गेल्या 2-3 वर्षापासून प्रलंबित आहे. आताच सांगितल्याप्रमाणे फक्त दोनच विधान सभाक्षेत्रात 90 टक्के कामे देण्यात आली आहेत. बाकीच्या भागातील रस्ते देखील चांगले नाहीत. तेव्हा माझी विनंती आहे की, याचा देखील आपण फेर विचार करावा. आमचे काही प्रस्ताव जेन्युईन आहेत. त्याचा तरी आपण विचार करावा.

यानंतर मी पृष्ठ क्र.35 वरील बाब क्रमांक 44 बोलणार आहे. अमरावती विभागातील 38 बीज गुणन केंद्रातील मजूर वर्गाचे मागील दोन वर्षापासूनचे 22 कोटी रूपये थकलेले आहेत. हे मजूर बीज गुणन केंद्रात काम करीत आहेत. त्यांची 22 कोटी रूपयांची मजुरी थकलेली असेल व ती पुरवणी मागण्यांमध्ये कुठेही दिसत नसेल तर खरेच ही चिंतेची बाब आहे. तसेच, रोपवाटीकेचे 1 कोटी 39 लाख रूपये थकलेले आहेत. त्यातील फक्त 47 लाख रूपये फक्त अमरावती जिल्ह्यासाठी मंजूर केले आहेत. बाकीच्या चार जिल्ह्यांना एक नया पैसा देखील दिलेला नाही. त्याचा देखील विचार करावा. अमरावती विभागात फळबाग योजनेचे 18 कोटी रूपये थकीत असून अमरावती जिल्ह्यासाठी 4 कोटी रूपये दिलेले आहेत. बाकीच्या अकोला, बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ या चार जिल्ह्यांना एक रूपया देखील मंजूर झालेला दिसत नाही. माझी या पुरवणी मागणीच्या निमित्ताने विनंती आहे की, या जिल्ह्यांना देखील निधी देण्याचा आपण विचार करावा. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी कामगार विभागाच्या बाब क्रमांक 133 ते 136 वर बोलणार आहे.

येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी कामगार या विषयाला हात घालण्याचा प्रयत्न केला. राज्यात घरेलू कामगार आणि कन्स्ट्रक्शन वर्कर हा कायदा मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. हा कायदा राबविण्यासाठी कामगार विभागाकडे जी यंत्रणा असणे आवश्यक आहे ती नेमकी अपुरी आहे. येथे अपुरा कर्मचारीवर्ग असल्यामुळे माथाडी मंडळाचा कर्मचारी असो किंवा लेबर ऑफिसचा कर्मचारी असो यांना हा कायदा राबविण्यासाठी संपूर्ण वेळ द्यावा लागतो. त्यामुळे त्यांना आपले नियमित काम पूर्ण करता येऊ शकत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, घरेलू कामगार आणि कन्स्ट्रक्शन कामगारांच्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची भरती कामगार विभागातर्फे करण्यात यावी. जेणे करून त्यांच्यासाठी करण्यात आलेला कायदा चांगल्या प्रकारे राबविता येईल. राज्यात 35 ते 40 माथाडी मंडळे आहेत. ज्यावेळी या मंडळाची स्थापना करण्यात आली होती त्यावेळचे कर्मचारी आता निवृत्त होत चालले आहेत. त्यांच्या जागेवर नवीन स्टाफ नियुक्त करण्यासाठी राज्य शासनाचा विभाग परवानगी देत नाही. अपुरा कर्मचारीवर्ग असल्यामुळे त्यांना देखील कायदा राबविण्यामध्ये अडचणी येत आहेत. त्यामुळे तेथे नवीन कर्मचारीवर्ग भरण्यासाठी परवानगी द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

गेल्या दहा वर्षापासून माथाडी मंडळे बरखास्त करण्यात आली आहेत. ती माथाडी मंडळे आजही पुनर्गठित झालेली नाहीत. या मंडळाच्या चेअरमनवर कुठलाही ताबा नसल्यामुळे माथाडी कामगारांच्या ठेवी चुकीच्या पद्धतीने ठेवल्या जाणार नाहीत ना अशा प्रकारची शंका निर्माण झाली आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील...

येथे जलसंपदाचे माननीय मंत्री उपस्थित आहेत. मी बाब क्रमांक 116 ते 126 वर बोलणार आहे. राज्यामध्ये कृष्णा खोरेच्या माध्यमातून धरणे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु, आज दुर्दैवाने वांग मराठवाडीचे धरण, मऊ हत्तीच्या धरणासह सातारा जिल्ह्यातील काही धरणांची स्थिती अत्यंत बिकट आहे. या धरणाच्या कामासाठी कृष्णा खोरे महामंडळामध्ये पैशाची तरतूद होत नाही. त्यामुळे हे महामंडळ धरणाला पैसे देऊ शकत नाही म्हणून धरण बांधू शकत नाही. ज्यावेळी धरणाचे काम सुरू झाले होते त्यावेळची किंमत आणि आजची किंमत पाहिली तर त्यात 100 ते 200 टक्के वाढ झाल्याचे दिसून येते.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

तेव्हा आपण अपूर्ण धरणे पूर्ण करण्यासाठी तरतूद करावी जेणेकरुन धरण पूर्ण झाल्यावर दुष्काळी भागांमध्ये धरणातील पाणी मिळू शकेल.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाबाबत बोलावयाचे झाले तर ठाणे जिल्ह्यामध्ये मध्यवर्ती कार्यालय आहे. हे कार्यालय नवी मुंबई येथे आणावे अशी मागणी आम्ही वारंवार करीत आहोत. कृषी उत्पन्न बाजार समितीने मुबलक जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. नवीन मुंबई येथे व्यापारी वर्ग वाढत आहे. नवी मुंबई येथे पान-बिडी आणि वडापावचा धंदा करणाऱ्याला देखील लायसन्स घ्यावे लागते अशी परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे. तेव्हा लायसन्स घेण्याचे कार्यालय नवी मुंबई येथे आणावे.

सभापती महोदय, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सरकारी गोदामे आहेत. त्या गोदामांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कामगार कायदा लागू होणे फार गरजेचे आहे. ज्या ठिकाणी कायदा लागू झालेला आहे त्या ठिकाणी काम करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून निविदा मागविल्या जातात आणि जी निविदा सर्वात कमी किमतीची असेल त्या निविदाधारकाला कामाचा ठेका दिला जातो. अशा ठिकाणी माथाडी मजुराचे दर स्थिर ठेवले जात नाहीत. त्यांना माथाडी मजुराच्या दरापेक्षा कमी वेतन दिले जाते. त्यांना किमान वेतनसुध्दा मिळत नाही अशी वाईट परिस्थिती आहे. तेव्हा याबाबत विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीने काही चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या माध्यमातून शहर आणि उपनगरांमध्ये स्वस्त भाजी केंद्राची योजना राबवण्यात आली आहे. ही योजना अतिशय चांगली आहे. परंतु राज्य शासनाने या योजनेसाठी सबसिडी दिली तर मुंबई आणि उपनगरातील लोकांना स्वस्त दरात भाजीपाला उपलब्ध होईल किंवा भाड्याच्या दुकानांना सबसिडी दिली तर लोकांना त्याचा फायदा होईल.

सभापती महोदय, वन मंत्री महोदयांनी मध्यंतरी धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी वांगमराठवाडीच्या संदर्भात कराड येथे घोषणा केली. लोकांचे लवकर पुनर्वसन झाले तर लवकर धरण पूर्ण होईल, धरण लवकर पूर्ण झाले तर दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल असे मला वाटते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

सभापती महोदय, पर्यटन मंत्री महोदयांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात सी-वर्ल्ड उभे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या प्रकल्पास माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी पाठिंबा दिलेला आहे. दोन्ही जुने सहकारी एकत्र येऊन कोकणचा चांगल्या प्रकारे विकास करीत आहेत त्याचे मला मनापासून कौतुक वाटते. परंतु आमच्या पाटण तालुक्यातील कोयना धरण परिसरातील पर्यटनाकडे दुर्लक्ष होता कामा नये अशी माझी विनंती आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ( उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री ) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवण्ी मागण्या विधानपरिषदेमध्ये सादर झालेल्या आहेत. उद्योग विभागाच्या बाब क्रमांक 136 मध्ये 123 कोटी 11 लाख रुपयांची मागणी मागितलेली आहे. इन्फ्रास्ट्रिक्चरसाठी 123 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

या मागण्यांवरील चर्चेची सुरुवात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी केली. उद्योग व बंदरे विभागाच्या मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, जयंत प्र.पाटील, किरण पावसकर, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काही मुद्दे मांडले. उद्योग व बंदरे विभागाच्या पुरवणी मागण्यांवर ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले त्यांचे आणि ज्यांनी विचार व्यक्त केले नाही त्या सर्वांचे मी आभार मानतो.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी मुंबई-गोवा जल वाहतूक कधी सुरु होणार असा मुद्दा मांडला. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, बंदरे विभागातर्फे मेरीटाईम बोर्डाच्या माध्यमातून या संदर्भात लवकरच टेंडर काढले जाईल. मुंबई-गोवा जल वाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, मुंबई-गोवा जल वाहतुकीच्या कामाचे टेंडर लवकरच काढले जाईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी रायगड जिल्ह्यात काही जणांना बंदरे विकसित करण्यासाठी जागा दिली असून त्यांनी अजूनपर्यंत बंदरे विकसित केली नसल्याचे सांगितले. तसेच ज्यांनी बंदरे विकसित केली नाहीत त्यांना देण्यात आलेली जागा काढून घेण्याबाबत मागणी केली आहे. ज्यांना बंदरे विकसित करण्यासाठी परवानगी दिली आहे त्यांनी ठराविक कालावधीत बंदरे विकसित करण्यासाठी कालमर्यादा घालून दिली जाते. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, बंदरे विकसित करण्यासाठी परवानगी दिल्यानंतर त्यांनी ठराविक कालावधीत बंदरे विकसित केली नाही तर त्यांना देण्यात आलेल्या जमिनी काढून घेण्याची कार्यवाही केली जाईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मल्टी नॅशनल कंपन्यांतील कंत्राटी कामगारांबाबतचा मुद्दा मांडला. शिवाय या कंपन्या मोठ्या प्रमाणावर नफा कमवितात, परंतु कंपनीतील कामगारांचे हित जोपासत नाहीत असेही निदर्शनास आणून दिले. तसेच या कंपन्यातील कामगारांना कामाचा योग्य मोबदला मिळावा अशीही त्यांनी सूचना केली आहे. या निमित्ताने मी त्यांना सांगू इच्छितो की, या दृष्टीने सरकार प्रयत्न करेल. मी या ठिकाणी कामगार विभागातर्फे बोलत नसलो तरी उद्योग विभागाचा मंत्री या नात्याने बोलत आहे. आपल्याकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

कंत्राटी कामगारांसाठी कायदा आहे. महाराष्ट्रातील जे कंत्राटी कामगार आहेत त्यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांना कायमस्वरुपी नोकऱ्या मिळवून देण्यासाठी तसेच पुरेसा पगार देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील.

महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीमल गोऱ्हे यांनी अनेक औद्योगिक वसाहती बंद असल्याचे सांगितले. मला वाटते अनेक औद्योगिक वसाहती बंद नसून, त्या औद्योगिक वसाहतीतील अनेक कारखाने बंद आहेत ही वस्तुस्थिती आहे. महोदय, आर्थिक मंदीमुळे औद्योगिक वसाहतींतील लघु आणि मध्यम उद्योगधंदे बंद पडले. नवीन औद्योगिक धोरणामध्ये या कारखान्यांना वेगवेगळ्या स्वरुपात मदत करुन, कराची थकबाकी माफ करुन तसेच भाग भांडवल देऊन ते कारखाने सुरु करण्यासाठी शासनाकडून मदत केली जाईल.

महोदय, एमआयडीसी क्षेत्रातील 78 गावांतील शेतकऱ्यांचा विरोध आणि कार्ला गावाला संपादनातून वगळावे तसेच 7/12 च्या उताऱ्यावरील नावे काढलेली नाहीत अशा सूचना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या आहेत. जागा वगळण्याबाबत त्यांनी जे मत मांडले आहे त्या संदर्भात नियमानुसार ती जागा शेतीची आहे काय, एमआयडीसीला नेमक्या किती जागेची आवश्यकता आहे या बाबत तपासून व योग्य तो विचार करुन निर्णय घेतला जाईल.

महोदय, उद्योग व बंदरे विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी सभागृहाला विनंती करुन माझे मनोगत संपवितो.

----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (मदत कार्य व पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पावसाळी अधिवेशनातील मदत व पुनर्वसन विभागाच्या पुरवणी मागण्यांद्वारे केलेल्या तरतुदींना मान्यता देण्याबाबत मी सभागृहाला विनंती करतो.

महोदय, मदत व पुनर्वसन विभागाची मागणी क्रमांक सी-6, 2245- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य या शीर्षकांतर्गत सन 2013-14 च्या बाब क्रमांक 40, 41, 42, 43, अन्वये 1179 कोटी 27 लाख रुपयांची मागणी केलेली आहे. माझ्या विभागाच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, रायगडमधील आरसीएफ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधी उद्याच बैठक बोलविलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, मराठवाड्यामध्ये पाऊस कमी पडलेला आहे पण पुढे पाऊस पडेल. अजूनही पाऊस पडला नसेल तर 31 जुलैपर्यंत या टंचाईच्या योजना चालू ठेवलेल्या आहेत. त्या परिस्थितीचा आढावा घेऊन पुढेही त्याचा विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी चासकमान आणि पुणे जिल्ह्यातील सर्वच पुनर्वसन प्रकल्प खूप दिवस रेंगाळलेले आहेत याबाबत मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भातील बैठक सुध्दा हे अधिवेशन संपण्याच्या आत घेतली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला की, पुण्याजवळील कात्रज येथील टेकडीत एक महिला आणि तिची मुलगी वाहून गेलेली आहे. त्यांना आपत्ती निवारण निधी मधून मदत केली जाईल. (अडथळा) काही सन्माननीय सदस्य चारा छावण्यांच्या बाबतीत विचारत आहेत. शेळ्या-मेंढ्यांच्या चारा छावणीला आम्ही खास बाब म्हणून परवानगी दिली. काही सन्माननीय सदस्य जळगावच्या बाबतीत विचारत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैन यांना मी उद्या माझ्या कार्यालयात बोलवून घेईन आणि जळगावच्या संदर्भात चर्चा करीन. आमच्या विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी 10 हजार कर्मचाऱ्यांच्या क्वार्टर्सच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, नवीन रेसिडेन्शीयल क्वार्टर्स बांधावयाचे किंवा कसे हे पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशन ठरविते. जे स्ट्रक्चरल रिपेअरचे काम आहे त्या रिपेअरसाठी मागच्या अर्थसंकल्पामध्ये 20 कोटी रुपयांची तरतूद केली होती आणि आता पुरवणी मागण्यांमध्ये 20 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औरंगाबाद-अजिंठा-फर्दापूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. हा पूर्ण रस्ता 99 किलोमीटरचा असून हा प्रकल्प जवळपास 560.22 कोटी रुपयांचा आहे. या प्रकल्पाला इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीने मान्यता दिलेली आहे. आपण व्हीजीएफसाठी 2.5.2013 ला केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे आणि सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी तेराव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत दुर्गम भाग जोडणाऱ्या रस्त्यांच्या संदर्भात पैसे अखर्चित राहिले असा मुद्दा उपस्थित केला होता. 2011-2012 आणि 2012-2013 मध्ये जवळपास 50 कोटीचे प्रस्ताव मंजूर होते. हा चार वर्षाचा कार्यक्रम आहे. याची अंमलबजावणी 2013-2014 बाणि 2014-2015 मध्ये करावयाची आहे. मागच्या वर्षी जे पैसे आले ते मार्च महिन्याच्या 30 तारखेला आले. त्यामुळे आपण अर्थसंकल्पामध्ये 3 कोटी रुपयांची तरतूद दाखविली होती आणि उर्वरित पैशांची मागणी आता करीत आहोत. हे पैसे परत जाणार नाहीत. त्यांचा पूर्ण खर्च होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील क्वार्टर्सच्या बाबतीत उल्लेख केला. त्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, 2012-2013 मध्ये शासनाने जवळपास 26 कोटी रुपयांची मंजुरी दिली होती आणि या वर्षी 46 आपण कोटी रुपयांचा प्रस्ताव दिलेला आहे. जवळपास 73.59 कोटी रुपयांचे दुरुस्तीचे काम आहे.

...3...

श्री. रणजित कांबळे ....

हे क्वार्टर्स कर्मचाऱ्यांसाठीच ठेवले पाहिजेत आणि त्याचा पुनर्विकास करु नये असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. तो प्रस्ताव इन्फ्रामध्ये झाला होता. त्याला मान्यता देण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार इन्फ्रालाच आहे. आपला जो प्रस्ताव आहे त्याबाबत शासनाला सांगण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.....

मुंबई-गोवा महामार्गाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर व अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या रस्त्याचे दोन टप्पे आहेत. यामध्ये पनवेल ते इंदापूर 48 कि.मी. आणि इंदापूर ते झारप पर्यंत 389 कि.मी.चे काम आहे. टप्पा क्र.1 चे काम प्रगतीपथावर आहे. इंदापूर ते झारपच्या कामाचा शक्याशक्यतेचा अहवाल केंद्र सरकारला दिलेला आहे. परवा माननीय मुख्यमंत्री व माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याबरोबर केंद्रीय बांधकाम मंत्र्यांबरोबर एक बैठक झालेली आहे. एमओआरटीएचे प्रॉजेक्ट इम्प्लीमेण्ट युनिट असल्यामुळे त्यांनी या प्रकल्पाचे काम करण्याचा निर्णय घेतला असून या कामाची सुरुवात ऑगस्ट महिन्यापासून होईल अशी शासनाची अपेक्षा आहे. (अडथळा) गणपतीपूर्वी हा रस्ता चांगला करुन दिला जाणार आहे.

श्री.विनोद तावडे : गणपतीपूर्वी रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी या आठवड्यामध्ये त्या रस्त्यासंबंधी बैठक बोलण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी फतेहपूर ग्रामपंचायती हद्दीतील रस्त्याच्या कामाचा प्रश्न उपस्थित केला होता. तो ग्रामीण रस्ता आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून किंवा डीपीडीसीमार्फत या रस्त्याचे काम करावे लागेल. त्यांनी इतरही 3-4 रस्त्यांचा उल्लेख केला होता. त्याबाबत आपण माझ्याकडे पत्र द्यावे. त्या रस्त्यांचे काम एमडीआर किंवा राज्य महामार्ग यातून विशेष दुरुस्ती अंतर्गत निश्चितपणे तातडीने केले जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने जिल्हा नियोजन मंडळाला आदेश द्यावा.

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनीही काही ग्रामीण रस्त्यांचा उल्लेख केला होता. गावाला जोडणाऱ्या साकवाचा त्यांनी उल्लेख केला आहे त्याचा प्रस्ताव त्यांनी शासनाकडे दिल्यास त्याला मंजुरी देण्यात येईल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे व श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरील स्वच्छतागृहांचा उल्लेख केला होता. या रस्त्यावरील फूड मॉलमध्ये स्वच्छतागृहे आहेत. मागील वेळी यासंबंधी प्रश्न उपस्थित केल्यानंतर मी स्वत: त्याची पाहणी केली होती. दोन्ही टोलपासून 50 कि.मी.अंतरावर स्वच्छतागृहे आहेत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ MMP/

श्री.रणजित कांबळे.......

आता नवीन प्रस्ताव प्राप्त होत आहेत त्यामध्ये स्वच्छतागृहे बांधण्याचे बंधनकारक केलेले आहे. 50 कि.मी.अंतरावरील टोल नाक्यावर स्वच्छतागृहे असतील. त्याशिवाय प्रत्येक 50 कि.मी.अंतरावर स्वच्छतागृहे बांधण्याचे बंधनकारक केलेले आहे. नवीन प्रस्तावात स्वच्छतागृहे बांधणे हा करारातील भागच राहणार आहे. परंतु जुन्या टोल नाक्याच्या ठिकाणी स्वच्छतागृहे बांधण्याची सुरुवात करण्यात यावी असे सर्वांना सांगितलेले आहे.

सभापती महोदय, पर्यटन विभागासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, श्री.विक्रम काळे व श्री.मनिष जैन यांनी आपले विचार मांडले आहेत. सी-वर्ल्ड प्रकल्पासाठी मागील वर्षी 30 कोटी रुपयांची तरतूद केली होती. या वर्षी जमीन संपादनाच्या कामासाठी 100 कोटी रुपये दिलेले आहेत. हा पीओपी तत्वावर होणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी रसाळगडाच्या चौकशीची मागणी केली आहे. त्याबाबत मी माहिती घेऊन त्यांना देईन. मंदिराबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात यावा. त्या प्रस्तावावर पर्यटन महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत त्यावर विचार करण्यात येईल. साने गुरुजींच्या गावाजवळील महिपत गडाचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून आला पाहिजे. परंतु त्याबाबतचा प्रस्ताव देण्यात आला आहे असे सन्माननीय सदस्य मला सांगत आहेत. तो प्रस्ताव मी मागवून घेईन.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 78 ते 115 आणि पर्यटन विभागाची बाब क्र.227 वरील पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो आणि माझे उत्तर पूर्ण करतो.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी गृह विभागाच्या पूरक मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेऊन अनेक मुद्दे मांडलेले आहेत.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी तुरुंगामध्ये सीसीटीव्ही बसविण्याच्या संदर्भात चर्चा केली. मुंबई मध्यवर्ती कारागृह, तळोजा आणि येरवडा या तिन्ही ठिकाणी जेलच्या अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने जवळ जवळ 183 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. हे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम कार्यान्वित करण्यात आलेले आहे. मानवाधिकार आयोगाच्या माध्यमातून नुकसान भरपाई देण्यासंबंधी निर्णय दिले जातात. त्यानुसार 5 लाख रुपये देण्याची भूमिका आपण स्वीकारलेली आहे. मानवाधिकार आयोगाच्या सूचना आल्यानंतर हे पैसे जमा केलेले आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी भांडूपचा विषय उपस्थित करण्यात आला. वसंत पाटील या कार्यकर्त्याचा सकाळी खून झाला आणि त्या प्रकरणी बबन तुकाराम खोपडे याच्या विरुध्द गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आलेली आहे. एसएलआर मॅगझीनच्या संदर्भात दिनांक 13 जून रोजी गुन्हा दाखल करुन इकॉनॉमिक ऑफेन्स मार्फत त्याची तपासणी सुरु आहे. फॉरेन्सिक लॅबचे आधुनिकीकरण करण्याचे काम सुरु आहे. 360 नवीन पदे भरण्याचा निर्णय तीन दिवसापूर्वी घेतलेला आहे. सर्व फॉरेन्सिक लॅबमध्ये ही 360 पदे भरली जातील. नांदेड आणि कोल्हापूरच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यासंबंधीचे उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बुलेट प्रुफ जॅकेट संबंधी विचारणा केली. मी सांगू इच्छितो की, जवळ जवळ 2000 बुलेट प्रुफ जॅकेट असून 5000 नवीन बुलेट प्रुफ जॅकेटचे टेंडर मागविलेले आहे. टेंडर ओपन झालेले आहे. कमर्शियल बीड होऊन 5 हजार बुलेट प्रुफ जॅकेटच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्याची भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे. भंडारा प्रकरण सीबीआयकडे सोपविण्यासाठी सीबीआयला 20.4.2013 रोजी पत्र दिलेले आहे. 14.7.2013 रोजी पुन्हा एकदा गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी हे प्रकरण लवकरात लवकर हाती घ्यावे अशी विनंती सीबीआयला केलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील.......

सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी ट्राफिकॉप संबंधीचा मुद्दा मांडला. ट्राफिकॉप ही संकल्पना संपूर्ण राज्यामध्ये राबविण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. औंधच्या ट्राफिक कार्यालयासाठी महिना दीड महिन्याच्या काळात प्रशासकीय मान्यता घेऊन आहे त्या बजेटमधून तरतूद करण्याची भूमिका निश्चितपणे राहील. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी महिलांसाठीचा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबतीत सुधारणा करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, परवा सीसीटीव्ही संदर्भात सदनामध्ये चर्चा झालेली आहे. सीसीटीव्हीचे एल-1 टेंडर भरणा-याने नकार दिल्यानंतर आता एल-2 टेंडर भरणा-याला बोलावलेले आहे.या संदर्भातील निर्णय देखील लवकरच घेण्यात येईल. मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून जो काही प्रकल्प सुरु आहे त्याची माहिती आम्हाला नाही. परंतु मुंबई महानगरपालिका असा कोणता प्रकल्प राबवित असेल तर त्याबाबतीत निश्चितपणे चर्चा करावी लागेल. मुंबई महानगरपालिका गृहखात्याला न विचारता शहरामध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे नियोजन परस्पर करीत असेल तर त्या बाबतीत त्यांना विचारले जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे राजेन्द्र मोकाशी याच्या विरुध्द निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय घेतलेला आहे. केन्द्र सरकारचा 50 कोटी रुपये निधी उशिरा आल्यामुळे तो अडचणीमध्ये आला होता. केन्द्र शासनाचे मॉडर्नायझ ेशनसाठी आलेले सर्व पैसे खर्च केले जातात.

सभापती महोदय, गृह खात्याच्या मागण्यावरील चर्चेच्या दरम्यान सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्याबाबत खुलासा करुन मी त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तेव्हा गृह विभागाच्या बाब क्रमांम 20 ते 24 आणि बाब क्रमांक 29 ते 36मध्ये नमूद केलेल्या एकूण रुपये 164 कोटी 81 लाख 12 हजार रुपयाच्या मागण्यांना मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : गृह विभागावरील चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. मी एक बाब त्यांच्या निदर्शनास आणून देत आहे की, ठाणे पोलीस आयुक्तालयातील जे पोलीस कर्मचारी आता ज्या निवासस्थानामध्ये राहात आहेत ती निवासस्थाने धोकादायक असल्यामुळे ताबडतोबीने खाली करण्यास सांगितलेले आहे. ही निवासस्थाने धोकादायक असल्यामुळे ती खाली करणे क्रमप्राप्त आहे. त्या पोलिसांना एमएमआरडीएची जी रेण्टल हौसिंगची योजना आहे त्या योजनेमध्ये सामावून घेऊन तिकडे शिफ्ट करावे अशी मी आपणाकडे मागणी केलेली आहे. मंत्री महोदयांनी याबाबतीत उत्तर द्यावे.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : एम.आर.डी.ए.ने ही जागा गृह खात्याला भाडे तत्वावर द्यावी म्हणून आम्ही उद्याच्या उद्या त्यांच्याकडे मागणी नोंदवू. त्यांचे जे काही भाडे असेल ते गृह विभागामार्फत दिले जाईल आणि आज पोलीस हाऊसिंग जे लोक रहात आहेत, जी घरे पडावयास आलेली आहेत, त्या कर्मचाऱ्यांना तिकडे शिफ्ट करुन असलेले भाडे गृहविभाग देईल. माननीय मुख्यमंत्र्यांना उद्या मी स्वत: विनंती करणार आहे.

-----------

श्री.विनोद तावडे : मुंबई शहरात अधिकारी दोन-दोन, तीन-तीन सदनिका घेऊन सरकारी निवासस्थानात राहातात अशा प्रकारचा आम्ही महत्वाचा विषय उपस्थित केला होता. त्यासंदर्भात कारवाई करण्यात येईल असे वारंवार ऐकतो आणि वृत्तपत्रातून वाचतो आहोत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब, यांदर्भात खरोखरच अमुक तारखेपर्यंत कारवाई करण्यात येईल अशी माहिती सभागृहाला देतील काय ?

( उत्तर देण्यात आले नाही.)

----------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ( ग्रामविकास व अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, अमरसिंह पंडित, विक्रम काळे यांनी ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेत भाग घेतला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी कॉक्रीट रस्त्यासंबंधी विषय उपस्थित केला आहे. सदर कामाचा निधी अखर्चित असल्यामुळे त्या कामाला प्रथमत: मुदतवाढ देऊन निश्चितपणे बदल करतो. सन्माननीय सदस्यांना हा प्रश्न पुन्हा सभागृहात उपस्थित करण्याची वेळ येणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, खेड तालुक्यातील रस्त्यांच्या कामांसाठी 64 लाख रुपयांचा निधी आता उपलब्ध करुन दिलेला आहे. 2012-13 या वर्षात जवळपास 7 कोटी रुपयांचा निधी त्यांच्या जिल्हयासाठी देण्यात आलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी थळ ग्रामपंचायतीचे विभाजन करण्यासंबंधीचा विषय उपस्थित केला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, थळ ग्रामपंचायतीचे विभाजन करण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका शासनाकडून स्वीकारली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी ॲडीशनल बी.डी.ओ.चे जॉब चार्ट विषय उपस्थित केला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, बी.डी.ओ.च्या जॉब चार्टचा तयार करुन राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविले आहे. त्यामुळे ॲडीशनल बी.डी.ओ.यांनी कोणती कामे करावयाची यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या जागा नावावर करण्यासाठी दिनांक 25 मार्च, 2013 रोजी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. त्या गोष्टीची पूर्तता संपूर्ण राज्यात करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाचा निश्चितपणे प्रयत्न आहे. रस्त्याच्या लांबीप्रमाणे गट अ-ब-क आणि ड ला आपण 15,70,10 आणि 5 या पध्दतीने निधी उपलब्ध करुन देण्याची भूमिका स्वीकारलेली आहे.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : मी जी मागणी केली त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, आपण खेड तालुक्यातील रस्त्यांच्या कामासाठी 64 लाख रुपयांचा निधी दिलेला आहे. सदर निधी मी आता मागणी केली आहे त्याच कामासाठी दिला आहे की दुसऱ्या कामासाठी दिला आहे याचा कृपया खुलासा करावा.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : हा निधी मागच्या कामांसाठी दिला आहे. पुढच्या कामासाठी देखील निधी देण्यासाठी सकारात्मक भूमिका राज्य शासनाकडून घेतली जाईल. ग्रामविकास विभागाशी संबंधित बाब क्रमांक 137, 138, 140 ते 143, 145 ते 147 मध्ये नमूद रुपये 95 कोटी 87 लाख 85 हजार एवढया रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्या अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, अन्न व औषध प्रशासन विभागाची बाब क्रमांक 188 मध्ये नमूद रुपये 14 लाख 41 हजार एवढया रकमेची पुरवणी मागणी सभागृहाने मान्य करावी, अशीही माझी या सभागृहास विनंती आहे.

------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )**

श्री.राजेंद्र मुळक ( जलसंपदा, संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सहकार विभागाच्या 1 कोटी 25 लक्ष रुपयाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी.

सभापती महोदय, संसदीय कार्य विभागाच्या 1 कोटी, 91 लाख 78 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांना मान्यता द्यावी.

सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, सुभाष चव्हाण, रामदास कदम, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, मोहन जोशी, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण आणि सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी भाग घेतला आणि काही उपयुक्त सूचनाही केल्या.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मागील दोन-तीने वेळा नातूनगर कालवा मोठ्या प्रमाणात गळतो, त्याची दुरुस्ती व्हावी म्हणून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केलेली आहे. मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, संचिका मान्यतेसाठी नियोजन विभागाकडे पाठविली होती, परंतु त्या संचिकेमध्ये थोडयाशा त्रुटी आढळून आल्या, त्या त्रुटींची पूर्तता करुन ती संचिका पुन्हा नियोजन विभागाकडे पाठवितो. त्यास मान्यता घेऊन सदर कामाचा निधी नातूनगर कालव्याच्या गळती दुरुस्तीच्या कामासाठी वितरित केला जाईल. तसेच या ठिकाणी....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

महत्वाच्या विषयाचा उल्लेख केला तो म्हणजे कोयनेच्या 67 टीएमसी पाण्याचे नियोजन करावे. कोयना प्रकल्पातून वीज निर्मिती केल्यानंतर पाणी समुद्रात सोडले जाते. या संदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्या पाण्याचा वापर करण्यासाठी प्रकल्प हाती घ्यायचा आहे. मुंबई शहर, उपनगर, सिंधुदुर्ग-रायगड-रत्नागिरी आणि ठाणे जिल्हयातील भागात सिंचन, औद्योगिक आणि पिण्याकरिता पाणी वापरण्यास या प्रकल्पाचा उपयोग होणार आहे. या संदर्भात एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट बोलावण्यात आले असून याकरिता एका कंपनीची नियुक्ती करावयाची आहे. संपूर्ण संकल्पन तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी मे.ड्रॉशॉ या तज्ज्ञ कंपनीची सल्लागार म्हणून निवड करण्यास 2011 मध्ये मान्यता देण्यात आली असून या कंपनीला कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. त्यांनी आर.एफ.डॉक्यूमेंट तयार केले असून मुंबईतील वेलस्पन इन्फ्रास्ट्रक्चर आणि गॅमन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,मुंबई या दोन कंपन्यांनी या प्रकल्पासाठी इंटरेस्ट दाखविला आहे. या संदर्भातील काही कायदेशीर बाबी पूर्ण करावयाच्या आहेत. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली इन्फ्रास्ट्रक्चर समिती नेमलेली असून या समितीसमोर हा प्रकल्प सादर करुन त्यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्प पुढे जाईल अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, कोकणातील लघुपाटबंधारे प्रकल्पाचे मापदंड वाढविण्याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रचलित मापदंड दिनांक 29.7.2009 रोजी निश्चित केले होते. त्याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांची मान्यता घेऊन कोकणातील मापदंड निश्चित करताना 66 हजार प्रती सहस्त्र घनमीटर या पध्दतीने मान्यता देण्यात आली. कोकणाची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन मापदंड 2008 मध्ये जे होते त्यापेक्षा दुप्पट करण्याचा प्रयत्न केला आहे. मागील 15 वर्षात कोकणातील मापदंड चार पटीने वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामुळे काही पाझर तलाव आणि इतर लघुपाटबंधारे विभागाची कामे मापदंड कमी असल्यामुळे होत नाहीत अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आला होता. तशी परिस्थिती नाही. कोकणासाठी मापदंड वाढवून दिलेले आहेत. पुन्हा मी यामध्ये लक्ष घालतो. नेमके कोणते प्रकल्प अडले आहेत हे सन्माननीय सदस्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले तर त्या प्रकल्पांच्या संदर्भात त्यांच्याशी चर्चा करुन त्या कामांना वेग कसा देता येईल याकरिता निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ 17:40

श्री.राजेंद्र मुळक.........

सभापती महोदय, युती सरकारच्या काळात कोकणातील 38 प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती त्यानंतर त्या प्रकल्पांबाबत कोणतीही प्रगती झालेली नाही असे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले. त्यांनी केलेले वक्तव्य वस्तुस्थितीला धरुन नाही. पिंपळगाव लघुपाटंबधारे धरणाचे काम पूर्ण केले असून 100 टक्के पाणीसाठा उपलब्ध करुन दिला आहे. कालव्याचे काम 95 टक्के पूर्ण झालेले आहे. उर्वरित कामासाठी सन 2013-14 करिता 1 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे.

सभापती महोदय, तळवट लघुपाटबंधारे धरणाचे काम 90 टक्के पूर्ण झाले असून साधारणत: पाणीसाठा तेथे निर्माण करण्यात आला आहे. उर्वरित कामासाठी सन 2013-14 करिता 3.48 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. न्यू मांडवे कोयनार प्रकल्पाच्या धरणाचे 60 टक्के काम पूर्ण झाले असून घळभरणीचे काम 2014-15 मध्ये करण्याचे नियोजन केले असून सन 2013-14 करिता 14 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

सभापती महोदय, यवतमाळ येथील कामाचा उल्लेख करण्यात आला आहे. मागील वेळी तेथे आलेल्या पूर परिस्थितीचा विचार करुन त्या मतदारसंघाचे तत्कालीन आमदार स्व.निलेश पारवेकर यांच्यासह माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या संपूर्ण भागाचा दौरा केला होता. या ठिकाणी त्या जिल्हयाचे पालकमंत्री उपस्थित आहेत.

नंतर 3व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

यवतमाळच्या भागाचा आम्ही दौरा केलेला आहे. नदीकाठच्या गावांना पुराचा मोठया प्रमाणात तडाखा बसला होता त्यामुळे त्या ठिकाणी पूर नियंत्रण भिंतीची मागणी करण्यात आली होती व त्यासाठी 13.5 कोटी रुपयांचा निधी या वर्षीच्या पुरवणी मागण्यांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असून यावर्षी सदर काम हाती घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी काही विषय उपस्थित केले असून त्यासंदर्भात त्यांना लिखित स्वरुपातील माहिती देण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्या 841 कोटी 50 लक्ष रुपयांच्या असून त्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ): सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 150 ते 154 मागण्या असून त्यासंदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री मोहन जोशी, रमेश शेंडगे, नरेंद्र पाटील अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कोकणामध्ये आंब्याच्या झाडावर औषधांची फवारणी करण्यासाठी रॉकेल उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. आम्हाला जे काही रॉकेल मिळते ते दिवाबत्ती आणि स्वंयपाकासाठी मिळते व तेच सवलतीच्या दरातून मिळत असते. शेतकऱ्यांना औषधांच्या फवारणीसाठी रॉकेल पाहिजे असेल तर बाजारामध्ये व्हाईट रॉकेल उपलब्ध असते ते घ्यावे. आपल्या जिल्हयामध्ये व्हाईट रॉकेलची कोणी एजन्सी मागितली तर ती देण्यात येईल. व्हाईट रॉकेलच्या एजन्सीसाठी आमचा विभाग काम करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बोगस शिधापत्रिकेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. बोगस आणि अपात्र यामध्ये फार फरक आहे. अपात्र म्हणजे बोगस नाही. अपात्र म्हणजे ज्याला नियमानुसार शिधापत्रिका मिळाली आहे परंतु त्याने स्थलांतर केले असेल किंवा काही कारणास्तव फॉर्म भरुन दिले नाही तर अशांना अपात्र म्हटले जाते. परंतु अधिकाऱ्यांनी नियमाला धरुन शिधापत्रिका दिल्या नसतील तर त्यासंदर्भात विभागीय आयुक्ताना अगोदरच चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, पुणे येथे शिधा पत्रिका मिळत नसल्याची बाब सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी उपस्थित केली होती. परंतु या ठिकाणी शिधा पत्रिकेच्या संदर्भात अडचणी असतील तर त्या लवकरात लवकर दूर करण्याच्या संदर्भातील सूचना संबंधितांना देण्यात येतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी नागपूर येथील माथाडी कामगारांच्या भरतीच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे. नागपूर येथे माथाडी हमालांच्या 54 जागा आहेत. या जागा लवकरात लवकर भरण्यात याव्यात अशी त्यांनी विनंती केलेली आहे. त्यामुळे नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना 15 दिवसाच्या आत जागा भरण्याच्या सूचना दिल्या जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी ठाणे जिल्हा मोठा असल्यामुळे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ......

माथाडी कामगारांचे एक कार्यालय नवी मुंबईमध्ये सुरु करावे अशी विनंती केलेली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे अगोदरच विचाराधीन असून त्यावर लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्या क्रमांक 150 ते 154 या 22 कोटी 3 लक्ष 90 हजाराच्या असून सभागृहाने त्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

---------------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आज सामान्य माणसांच्या मनामध्ये चर्चा आहे की, अधिकारीवर्ग 2-2, 3-3 सदनिका लाटतात आणि सरकारी निवासस्थानामध्ये राहतात. हा विषय सरकार मधील सन्माननीय सदस्यांना महत्त्वाचा वाटत नसेल तर ते चुकीचे आहे. हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे विरोधी पक्ष हा विषय चार-चार वेळा उपस्थित करीत आहे. त्यावर मंत्री महोदय काहीच बोलत नाही, काहीच करत नाही. "आपणही लाटा आणि आम्हीही लाटतो" असे काही सरकारचे धोरण असेल तर ठीक आहे. तेव्हा याबाबत शासनाचे काही धोरण ठरले आहे काय, नसल्यास ते कधी पर्यंत करण्यात येईल ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यासंबंधातील धोरण ठरलेले नाही. मी आपल्याला दोन गोष्टी सांगू इच्छितो की, गृह विभागामार्फत पोलीस दलाला सदनिका दिल्या जातात. या सदनिकांचे वाटप गृह विभागामार्फत केले जाते. काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना गृह विभागाकडूनही सदनिका दिल्या जातात. वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी गृह विभागाकडे सदनिका उपलब्ध नसतील तर सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारित असलेल्या सदनिका देखील उपलब्ध करून दिल्या जातात. ज्यांनी वेगवेगळ्या शासकीय योजनेतून स्वत:साठी घर घेतले आहे आणि तरी सुद्धा पोलिसांसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकेमध्ये अधिकारी राहतात अशा प्रकारची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणली आहे. मी गृह विभागासंबंधी निश्चितपणाने निर्णय घेईन की, या पुढच्या काळात स्वत:च्या किंवा कुटुंबीयांच्या नावावर घर नाही असे सांगणाऱ्यांनाच गृह विभागाकडील सदनिका उपलब्ध करून देण्यात येईल. एका कर्मचाऱ्याने एका पेक्षा अधिक सदनिका घेऊ नयेत, घेता येणार नाहीत अशा प्रकारची चर्चा देखील मी माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर करेन व शासनातर्फे तसे धोरण जाहीर करण्यासंबंधी त्यांना विनंती करण्यात येईल.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.विक्रमजी काळे, मोहन जोशी, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य डॉ.रणजीत पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी राज्यात प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याचे सांगितले आहे. ही गोष्ट खरी आहे. यासंबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गेल्या काही दिवसांपूर्वीच आपण एमपीएससीला बिंदू नामावली सारख्या ज्या काही छोट्या-मोठ्या त्रुटी होत्या त्या दूर करून 27 विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांचा परिपूर्ण असा प्रस्ताव पाठवून दिला आहे. यासंबंधात येणाऱ्या तीन महिन्यामध्ये कार्यवाही पूर्ण होईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी बीड येथील आदित्य डेंटल कॉलेजसंबधातील प्रश्न उपस्थित केला आहे. आदित्य डेंटल कॉलेजचे प्रकरण पुढे आल्यानंतर ताबडतोब विभागाने त्या कॉलेजची इ.सी.रद्द केली होती. परंतु, या कॉलेजचे मॅनेजमेंट कोर्टात गेले. त्यावेळी कोर्टाने आम्हाला सांगितले की, आपण त्यांची सुनावणी घ्यावी आणि कारण देऊन जी काही कारवाई करावयाची आहे ती करावी. त्याप्रमाणे आम्ही सुनावणी घेतली. सुनावणी घेतल्यानंतर आपण डेंटल कौन्सिल ऑफ इंडियाकडे इ.सी.रद्द करण्यासंबंधातील शिफारस केली आहे. आता डेंटल कौन्सिल ऑफ इंडियाकडे निर्णय प्रलंबित असून आपण त्याची वाट पहात आहोत.

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत .....

होमिओपॅथी डॉक्टरांचे उपोषण सुरू आहे त्यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे चर्चा केली आहे. हा फार जुना विषय असून तो अनेक महिन्यांपासून सुरू आहे. महाराष्ट्र होमिओपॅथी ॲक्टमधून "ओन्ली" हा शब्द वगळून त्यांना ॲलोपॅथी प्रॅक्टीस करण्यासंबंधात मुभा द्यावी अशा प्रकारच्या मुख्य मागण्या होमिओपॅथी डॉक्टरांच्या आहेत. यासंबंधी विभागाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. "ओन्ली" हा शब्द काढण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे नस्ती सादर करण्यात आली आहे. यासंबंधीचा निर्णय झाल्यानंतर कॅबिनेट समोर जाऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल.

आमच्या विभागातर्फे क्रॉस पॅथी एग्झामिनेशनचा प्रस्ताव देखील तयार करण्यात आला आहे. सदर नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आली आहे. जेणेकरून महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाला कोर्स तयार करता येऊ शकेल. तो वर्षभराचा कोर्स केल्यानंतर क्रॉस पॅथी करता येईल. म्हणजे आपल्याला होमिओपॅथीला आयुर्वेद किंवा आयुर्वेदला ॲलोपॅथी अशा प्रकारची यंत्रणा आपल्याला करता येईल. या विषयावर देखील विभाग गंभीरपणे विचार करीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आझाद मैदान येथे गेल्या 15 दिवसांपासून विद्यार्थी डॉक्टर उपोषणाला बसले आहेत. सभागृहाच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांनी त्यांना आवाहन करावे की, आम्ही पॉझिटीव्ह निर्णय घेत आहोत त्यामुळे आपण उपोषण सोडावे.

श्री.डी.पी.पाटील : होय. यासंबंधी आम्ही डॉक्टरांना वेळोवेळी माहिती दिलेली आहे. एवढेच नव्हे तर त्यांना देखील माहिती आहे की, या नस्ती कुठल्या स्तरावर आहेत. विभागाने काय प्रस्तावित केले आहे हे डॉक्टर्सना देखील माहीत आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 17:55

श्री.डी.पी.सावंत....

तरी सुध्दा ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सुचविल्याप्रमाणे आम्ही काय कार्यवाही करीत आहोत याची माहिती देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 418 जागा धोक्यात आल्याचा उल्लेख केला. एमसीआयने निर्णय घेतला आहे की, 50 जागा असतील तेथे 100 जागा करण्यात येतील आणि जेथे 100 जागा असतील तेथे 150 जागा करण्यात येतील. मी या ठिकाणी आश्वासन देऊ इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीमध्ये या जागा धोक्यात येणार नाहीत. आम्ही सर्व डीन्सकडून प्रस्ताव मागितलेले आहेत आणि सर्व डायरेक्टर्सकडे ते प्रस्ताव आलेले आहेत. आपण विद्यापीठांकडून देखील रिकमेन्डेशन्स मागितलेल्या आहेत. आम्हाला खात्री आहे की, आम्ही या जागा जरुर मान्य करुन घेऊ.

सभापती महोदय, आयजीएमजीमधील 40 जागा जाऊ देणार नाही याबाबत मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो.

सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने "नीट" रद्द केली. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपण एमएचटीसीईटी केव्हाही घेऊ शकतो त्यासाठी आपली यंत्रणा सज्ज आहे. "नीट"चा निर्णय मंत्रिमंडळ स्तरावर घेण्यात आला होता. एमसीआयला अशाप्रकारची परीक्षा घेण्याची तरतूद कायद्यात नाही. या तांत्रिक मुद्यावर माननीय सर्वोच्च न्यायालयाने नीट रद्द केलेली आहे. केंद्र शासन ऑर्डीनन्स काढून एमसीआयला एम्पॉवर करु शकतात. केंद्र सरकारने अशी पावले उचलली तर "नीट" पुन्हा सुरु होईल. "नीट"चा निर्णय मंत्रिमंडळ स्तरावर झालेला आहे. विद्यार्थ्यांनी एक वर्षाचा अभ्यास केलेला असल्यामुळे नीट असली पाहिजे अशी अनेक पालकांची इच्छा आहे. या संदर्भात आजच काही बोलणे योग्य होणार नाही. या संदर्भात केंद्र सरकारचा जो काही निर्णय होईल त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही.

सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी युजी अपग्रेडेशनचा मुद्दा मांडला. केंद्र शासनाकडून युजी अपग्रेडेशनसाठी महाराष्ट्र शासनाच्या कॉलेजेसना बराच निधी मिळालेला आहे. युजी अपग्रेडेशनसाठी महाराष्ट्र शासनाचा 111 कोटी रुपयांचा वाटा आहे. यामध्ये अकोला येथील कॉलेज आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत....

सभापती महोदय, प्रत्येक विभागामध्ये एक कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येणार आहे आणि त्यासाठी हा विभाग कटीबध्द आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे मी दिलेली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या बाब क्रमांक 181 ते 189 च्या एकूण 87 कोटी 41 लाख 73 हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना महसूल विभागाच्या मागण्यांसंदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी दोन मुद्दे उपस्थित केले. महसूल विभागाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या आय-सरिता प्रणालीच्या संदर्भात त्यांनी काही शंका व्यक्त केल्या. या प्रणालीकरिता एचसीएल आणि एस्सर या कपंनीकडून हार्डवेअर खरेदी करण्यात आले होते. आपण 1500 संगणकाची खरेदी केलेली आहे. संगणकाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. लीजलाईनमध्ये काही प्रॉब्लेम झाल्यामुळे काही काळ अडचण निर्माण झाली होती. टयुलिप कंपनीला हे काम देण्यात आले होते. या कंपनीची सेवा व्यवस्थित नसल्यामुळे काही प्रश्न निर्माण झाले होते. परंतु सद्य:स्थितीमध्ये एमटीएनएल आणि बीएसएनएलकडून जोडणी सुरु केल्यामुळे ऑनलाईन पध्दतीने आय-सरिता प्रणाली व्यवस्थितरित्या सुरु आहे. राज्यातील 482 नोंदणी कार्यालयांपैकी 472 नोंदणी कार्यालये आय-सरिता प्रणालीने जोडलेली आहेत. 10 कार्यालये दुर्गम भागात असल्यामुळे त्या ठिकाणी जोडणी मिळू शकली नाही. 472 कार्यालयांमध्ये ऑन-लाईन पध्दतीमुळे किती खरेदीपत्रे झाली, किती रक्कम जमा झाली याचे पूर्ण शेडयुल दिसू शकेल अशी व्यवस्था आपण केलेली आहे

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 18:00

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, Tulip कंपनीला आम्ही काळ्या यादीत टाकले आहे.

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शासकीय भूखंडावरील अतिक्रमणाबाबत अतिशय महत्त्वाचा विषय उपस्थित केला. मुंबई आणि उप नगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर शासकीय भूखंड आहेत. त्यामुळे पश्चिम उपनगरांसाठी 1 अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि 4 उप जिल्हाधिकारी तसेच पूर्व उपनगरांसाठी 1 अतिरिक्त जिल्हाधिकारी तसेच 5 उप जिल्हाधिकारी यांना तसेच नियमित अपर जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा या बाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. शासकीय भूखंडांचे नियमित सर्वेक्षण होत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आम्ही अशा जागांचा संपूर्ण डेटा बेस एकत्र केला आहे. गेल्या दोन वर्षात 13,112 झोपड्या निष्कासित केल्या असून, 205 प्रकरणी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच शहरी भागात 2,841 झोपड्या निष्कासित केल्या असून, 295 प्रकरणी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या जागा बहुमोल आहेत हे नाकारता येत नाही. त्यामुळे या जागांचे संरक्षण झाले पाहिजे म्हणून हे काम एमएमआरडीएने देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या दृष्टीने संरक्षणाच्या बाबतीत कार्यवाही सुरु झाली आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी गावठाण विस्तार योजनेच्या संदर्भातील मुद्दा मांडला. त्यांनी सांगितले की, महसूल विभागाकडे पेंढाबे गावाच्या विस्तार योजनेची फाईल आलेली आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, त्या गावची फाईल तपासून त्या बाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

महोदय, आपण स्वत: महसूल विभागाच्या मागण्यांवर दोन मुद्दे उपस्थित केले होते. पुणे परिसरातील दौंड येथे जमिनीच्या मोजणीचे पैसे भरुन सुध्दा मोजणी जलद गतीने होत नाही असे आपण निदर्शनास आणून दिलेले आहे. या बाबतची नोंद आम्ही घेतलेली आहे. अलीकडच्या कालखंडात महाराष्ट्रात जेवढ्या मोजण्या प्रलंबित होत्या त्या मोजण्या पूर्ण केल्या आहेत. आता ई-मोजणी ही नवीन संकल्पना पुढे आली आहे. जमिनीची मोजणी करण्यासाठी नागरिकांनी अर्ज करुन पैसे भरल्यानंतर जमिनीची मोजणी करण्यासाठी कोणते अधिकारी कधी येणार आहेत या बाबतची पावती त्यांना मिळते. या नवीन प्रक्रियेला गती आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. मी सांगू इच्छितो की, दौंड येथील प्रकरणाची तपासणी करुन कार्यवाही केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

महोदय, आपण आणखी एक मुद्दा उपस्थित केला होता. पुणे शहरातील माजी सैनिकांच्या नावे असलेल्या वीर माता, वीर पत्नी यांच्या असलेल्या एका मिळकतीस सर्वसाधारण करातून माफी मिळण्याबाबत महानगरपालिकेच्या मुख्य सभेने 2009 मध्ये मान्यता दिलेली आहे. तेव्हापासून आतापर्यंत हा प्रस्ताव महसूल विभागाकडे प्रलंबित असल्याचे आपण सांगितले. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, तातडीने हा प्रस्ताव तपासून घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी शिंदेवाडी येथे पाण्याच्या लोंढ्यामध्ये आई व मुलगी मृत्युमुखी पडल्याचे सांगितले. या प्रकरणी न्यायालयीन चौकशी सुरु आहे. चौकशीअंती यामध्ये नेमके काय दोष होते हे निदर्शनास येईल. या प्रकरणात जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले होते त्यांचे उत्तर देण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोदजी तावडे, रामदास कदम, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री किरण पावसकर, नरेंद्र पाटील, डॉ.रणजित पाटील यांनी कामगार विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत भाग घेतला.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी प्रिसीजन ॲडेसिव्ह टेप्स प्रा.लि. मुरबाड येथील 35 कामगारांना व्यवस्थापकाने मंदीच्या कारणावरुन कमी केल्याचे सांगितले. या विषयी सहायक आयुक्त, ठाणे यांनी तीन वेळा बैठका घेतल्या आहेत. त्यानंतर संबंधित कामगारांनी मुरबाड येथे उपोषणास सुरुवात केली. तद्नंतर मुरबाडचे तहसीलदार यांनी संबंधित कामगारांशी चर्चा करुन त्यांचे उपोषण सोडविले. बऱ्याच वेळा अनेक कंपन्यांमध्ये जे कंत्राटी कामगार असतात त्यांना कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे निष्कासित करण्यात येते.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित .....

परंतु 1970 चा जो ॲबॉलिशन ऑफ कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट आहे तो महाराष्ट्र शासन राबवित आहे. मुरबाड तालुक्यातील आणि ठाणे जिल्ह्यातील हा प्रश्न आहे. त्यामुळे माझ्याकडे या संदर्भात बैठक घेऊन त्यांना या कंपनीमध्ये कायमस्वरुपी कसे करता येईल यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करीन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी महाराष्ट्र शासनाची रोहयो अंतर्गत फळबाग लागवड योजना होती ती बंद करण्यात आलेली आहे त्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. ही योजना बंद करण्याचे कारण असे आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगा या केंद्र शासनाच्या योजनेमध्ये फळबाग लागवडीची तरतूद असल्यामुळे आपली योजना बंद करण्यात आलेली आहे. 2012-2013 पासून मनरेगाची योजना लागू करीत आहोत आणि तशा प्रकारच्या रेकॉर्डीन्गचे काम चालू आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, प्रत्येक वेळी कोकणावर अन्याय होता कामा नये. आपली पहिल्यापासून 100 टक्के अनुदानाची जी योजना आहे ती आपण तशीच ठेवावी. ती योजना आपण का बंद करीत आहात ? कोकणासाठी जी योजना आहे ती तरी आपण चालू ठेवावी.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, प्रती हेक्टरी 100 टक्के अनुदानाच्या संदर्भातील ही योजना आहे. निश्चितपणे त्या संदर्भात विचार केला जाईल.

श्री. रामदास कदम : पहिल्या योजनेच्या संदर्भात विचार केला जाईल असे आपण सांगावे.

श्री. राजेंद्र गावित : या योजनेच्या संदर्भात निश्चितपणे विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी असंघटित कामगारांना न्याय देण्याच्या संदर्भात मागणी केलेली आहे. केंद्र शासनाने असंघटित कामगारांकरिता सामाजिक सुरक्षा अधिनियम तयार केला असून महाराष्ट्र शासनामार्फत उक्त कायद्यांतर्गत महाराष्ट्र नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी असंघटित, असंरक्षित व नाका कामगारांसाठी तरतूद करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. या ठिकाणी असंघटित कामगारांसाठी केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा अधिनियम 2009 अंतर्गत येणाऱ्या कामगारांच्या यादीमध्ये नाका कामगारांचा समावेश केलेला आहे. अशा प्रकारे एक कल्याणकारी मंडळ तयार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित .....

करुन या असंघटित कामगारांसाठी त्या योजना राबविण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी एक प्रश्न उपस्थित केला. ही वस्तुस्थिती आहे की, घरेलू कामगार, बांधकाम कामगार आणि माथाडी कामगार यामध्ये घरेलू कामगार आणि बांधकाम कामगार मंडळ स्थापन केल्यामुळे त्या ठिकाणी कामगार विभागातील कर्मचाऱ्यांवर मोठा ताण पडतो. त्या ठिकाणी 56 पैकी 2 पदे भरण्यात आली असून महाराष्ट्र शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे एकूण खर्चाच्या 5 टक्के खर्च प्रशासकीय बाबींवर करावा अशी तरतूद आहे. या योजनांवर विशेष खर्च करण्याचे ठरविण्यात आल्याने उर्वरित पदे तीन महिन्यात भरण्यात येतील. राज्यातील सर्व जिल्ह्याकरिता कर्मचारी भरतीच्या संदर्भात 159 पदांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, कामगार विभागाच्या बाब क्रमांक 133 ते 135 वरील 22 लाख 61 हजार रुपयांच्या तीन मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री ) : सभापती महोदय, रोजगार हमी योजना व जलसंघारण विभागाच्या बाब क्रमांक 139, 144, 148 आणि 149 यामधील मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी चर्चा केलेली आहे. या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. संजय सावकारे ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, कृषी विभागाच्या पृष्ठ क्रमांक 35 ते 33 वरील बाब क्रमांक 33 ते 50 यामध्ये 796 कोटी 13 लाख 18 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी सभागृहास विनंती करतो.

सभापती महोदय, या मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, विक्रम काळे, अमरसिंह पडित, रमेश शेंडगे, नरेंद्र पाटील, डॉ. रणजित पाटील या सर्व सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आणि त्यांनी काही महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी महिकोच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले होते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय सावकारे....

महिको कंपनीला तात्पुरत्या स्वरुपात पुनर्स्थापित करण्यात आलेले आहे. त्यांच्याकडून पुढील काळासाठी ॲफिडेव्हिट घेतलेले आहे. पुढील काळात त्या कंपनीकडून अशी घटना घडली तर त्यांच्याविरुध्द कडक कारवाई केली जाईल. श्री.अडसूळ व श्री.दांगट या अधिकाऱ्यांसंबंधी माहिती घेऊन आपल्याला कळविण्यात येईल. इमू पालनासंबंधीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. याबाबत सहकार विभागाशी सल्लासमलत करुन त्यातून मार्ग काढण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी कृषि पर्यटनाचा मुद्दा उपस्थित केला होता. पर्यटन विभागाला लक्ष घालण्यास सांगितले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी ठिबक सिंचन योजनेसाठी 90 टक्के अनुदान मिळण्याची मागणी केली आहे. याबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारला यापूर्वीच विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सिमेंट बंधाऱ्याबाबत तक्रार केली आहे. त्यांची तक्रार तपासून पाहिली जाईल व त्याबाबतचे काम लवकरात लवकर करण्याची सूचना दिली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी पीक विम्याचे पैसे काही जिल्ह्यात मिळाले नसल्याचे सांगितले आहे. राज्य शासनाला पीक विम्याचे 201 कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी 142.52 कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे. उर्वरित पैशाचे वाटप करण्याच्या सूचना विभागाने दिलेल्या आहेत. त्यानुसार तातडीने ही कार्यवाही सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी औरंगाबाद येथील बीज पणन केंद्रातील कामगारांचे पैसे थकित राहिले आहेत. त्याबाबत यापूर्वीच मागणी केलेली आहे. पुढील काळात त्या मागण्या मंजूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील. सन्मानीनय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी एक चांगली सूचना केली आहे. शासनाकडून स्वस्त भाजीपाला केंद्रे सुरु केली होती त्याला चांगला प्रतिसाद मिळाला होता. ही योजना अधिक सक्षमपणे राबविण्याबाबत प्रभागाकडून निश्चितपणे प्रयत्न केले जातील. कृषि विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो आणि माझे उत्तर संपवितो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी पणन विभागाशी संबंधित कोकणामध्ये फळ प्रक्रिया केंद्र सुरु करण्याबाबतचा मुद्दा मांडला होता. त्याचे उत्तर मला मिळाले नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय सावकारे : पणन विभाग माझ्याकडे नाही. परंतु मी संबंधित मंत्री महोदयांना कळवितो. माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे कृषि व पणन मंत्री आहेत. आपली सूचना त्यांच्यापर्यंत मी पोहोचवितो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, पणन विभागाचे मला उत्तर मिळाले पाहिजे. कोकणातील फळ प्रक्रिया केंद्र सुरु करण्यासाठी 1 : 9 या निकषाप्रमाणे मदत देऊ असे आश्वासन दिले होते. शासनाकडे त्याप्रमाणे किती प्रस्ताव आले आहेत, याबाबत मी बाब क्रमांकही सांगितलेला आहे. दुर्दैवाने माननीय पणन मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. माझ्या मुद्याची नोंद कोणत्याही मंत्री महोदयांनी घेऊन ते संबंधित मंत्री महोदयांना सांगावे. शक्य असेल तर त्यांनी माझ्या या मुद्याचे निरसन करुन घ्यावे.

श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितलेल्या मुद्याची माहिती घेऊन त्यांना ती देण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सन 2013-14 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**</u>

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर वि.प.वि.क्र.8, महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक चर्चेसाठी दर्शविलेले आहे. या विधेयकावरील चर्चा आता पुढे सुरु करावयाची का याबाबत सभागृहाने आपले मत द्यावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आता सायंकाळची 6 वाजून 14 मिनिटे झालेली आहेत. त्यामुळे हे विधेयक आज चर्चेसाठी घेण्यात येऊ नये अशी आमची मागणी आहे.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 23 जुलै, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 14 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 23 जुलै, 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही